


# राष्ट्रीय अस्मितेचा सिंदूर

रणांगण
रमेश पतंगे

'ऑपरेशन सिंदूर'च्या बातम्यांनी सर्व देशात आनंदाचे तुफान उठलेले आहे आणि ते स्वाभाविकच आहे. पहलगाम येथे पाकिस्तानी जिहादी दहशतवाद्यांनी हिंदू पुरुषांना वेचून वेचून ठार मारले. त्याची तीव्र वेदना सर्व देशभर उमटली. इतरवेळी आपल्या देशातील जनता कधी जातीवरून आपापसात भांडत बसते, कधी नदीच्या पाण्यावरून भांडणे होतात, तर कधी भाषिक कलह होतात. असे असले तरी या देशाचे चैतन्य मात्र एक आहे. त्या चैतन्यावर जेव्हा आघात होतो, त्याची कळ सर्व देशभर सारखी उमटते. हे आपले राष्ट्रीयत्व आहे. पाकिस्तानी जिहादी दहशतवाद्यांनी या राष्ट्रीयत्वावरच गोळ्या घातल्या.

राष्ट्राच्या आत्मसन्मानाचा विषय उफाळून वर आला आणि सर्व देशाने एकमुखाने मागणी केली की, 'या घटनेचा सूड घेतला पाहिजे. पाकिस्तानला जन्माची अद्दल शिकविली पाहिजे. गरज पडली तर युद्ध केले पाहिजे आणि अंतिम उपाय म्हणून अण्वस्त्रांचा वापरही केला पाहिजे. जी काही मनुष्यहानी होईल, त्याला घाबरू नये. अपमानित होऊन रोज मरत जगण्यापेक्षा पराक्रम करून जगण्यात पुरुषार्थ आहे,' अशी देशाची भावना झाली. ही भावना जातीनिरपेक्ष, पंथनिरपेक्ष आणि राजकीय विचारधारानिरपेक्ष आहे. भारताच्या सन्मानाचे रक्षण झालेच पाहिजे, ही तीव्र आच त्यामागे होती.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. अंतर्बाह्य राष्ट्रीयता ही त्यांची ओळख. त्यांचा जन्मच मुळी भारतमातेची परिपूर्ण सेवा करण्यासाठी झालेला आहे. भारतमातेचा अपमान सहन करण्याची त्यांची प्रवृत्ती नाही. त्यांच्यावर झालेले संघसंस्कार तसे नाहीत.'जगायचे ते मातृभूमीसाठी, देह झिजवायचा मातृभूमीसाठी, वैभवाची कामना करायची मातृभूमीसाठी' ही त्यांची प्रवृत्ती असल्यामुळे हा दहशतवादी हल्ला मोदी सहन करणार नाहीत, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. मोदी संवेदनशील नेता आहेत, पण भावनाविवश नेता नाहीत.

मनुष्य भावनाविवश झाला की, त्याची सारासार विवेकशक्ती गोठून जाते आणि तो जर संवेदनशील असेल, तर त्याची विचारशक्ती प्रखर होते. मोदींनी पाकिस्तानला ठोकण्याची शिवछत्रपतीनीती अवलंबली. शत्रूला गाफील ठेवायचे, संभ्रमित ठेवायचे, हल्ला कुठून करणार याचे आभासी चित्र निर्माण करायचे आणि शत्रू कल्पनाही करणार नाही अशाप्रकारे वार करायचा, ही महाराजांची रणनीती होती. नरेंद्र मोदी छत्रपती शिवाजी महाराजांचे भक्त आहेत. शिवनीतीचा अवलंब करणारे महाराजांचे अनुयायी आहेत. भारताकडून पहलगाम हल्ल्याचे सैनिकी उत्तर दिले जाईल, असे पाकिस्तानला वाटले आणि त्यांनी आपले सैन्य सीमेवर आणून ठे भारतानेदेखील समुद्रात नौदलाचा युद्ध सराव केला, सीमेवर हवाई दलाचा सराव केला आणि आपण हल्ला करण्याच्या तयारीत आहोत, असे आभासी चित्र निर्माण केले. सीमेवर बसलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या डोक्यावरून २४ भारतीय क्षेपणास्त्रे निघाली आणि त्यांनी अचूकपणे 'लष्कर-ए-तोयबा', 'जैश-ए-मोहम्मद', 'हिजबुल्ला' इत्यादी पाकिस्तानी दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून टाकले. केवळ २५ मिनिटांची कारवाई झाली. छत्रपती शिवाजी महाराज दीड-दोन लाखांचा सैनिकी तळ असणाऱ्या शाहिस्तेखानाच्या वाड्यात म्हणजे लाल महालात घुसले. आजच्या भाषेत याला 'सर्जिकल स्ट्राईक' म्हणावे लागेल. त्याची पुनरावृत्ती नरेंद्र मोदी यांनी आता केली. या हल्ल्यात दहशतवादी मौलाना मसूद अजहर याच्या परिवारातील १४ जण ठार झाले. तोही मरायला पाहिजे होता, पण वाचला. शिवशंभूंची इच्छा त्याला स्वतंत्रपणे संपविण्याची असावी.

**ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले की, आताचा भारत हा बदललेला भारत आहे. दहशतवादी कारवाया खपून घेणारा नाही. चिमूटभर लाल सिंदूरचा वचपा दहशतवाद्यांचा खात्मा करून कसा असतो, हे भारताने न बोलता करून दाखविले. त्यामुळेच पाकिस्तानला भारताकडे शस्त्र संधीची विनंती करणे भाग पडले, हा खऱ्या अर्थाने भारताचा विजयच आहे.**


पाकिस्तानला घडा शिकवणे ही सोपी गोष्ट नव्हती. त्याचे अनेक आंतरराष्ट्रीय पदर आहेत. नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्रनीतीची कमाल आहे. त्यांनी पाकिस्तानला 'दहशतवाद' या मुद्द्यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पाडले. अमेरिका, रशिया, चीन आणि 'युनो' कोणीच पाकिस्तानला साथ दिली नाही. याप्रकारे पाकिस्तानला १९६५ आणि १९७१ सालच्या युद्धातदेखील एकाकी पाडण्यात आलेले नव्हते. आज सारे जग दहशतवादाविरुद्ध उभे राहिले आहे. हा 'इस्लामी जिहादी दहशतवाद' आहे. 'हमास', 'हिजबुल्ला' यांच्याशी इस्रायलची वर्षभर लढाई चालू आहे. अमेरिकेने इस्रायलला सर्व प्रकारची मदत केली. पाकिस्तान हा इस्लामी दहशतवाद्यांचा आश्रयदाता देश झालेला आहे. ओसामा बिन लादेनला त्यानेच लपवून ठेवले होते आणि आजही अनेक खतरनाक दहशतवाद्यांना त्याने आपल्या देशात लपवून ठेवले आहे. भारताने म्हणजे नरेंद्र मोदी यांनी एक रणनीती आखली. या रणनीतीप्रमाणे फक्त दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला करायचा, हे निश्चित करण्यात आले. आमची लढाई पाकिस्तान या देशाशी नसून, पाकिस्तानी जनतेशी नसून दहशतवाद्यांशी आहे. दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून भारताने लष्करी कारवाईचे क्षेत्र अतिशय मर्यादित ठेवले. आंतरराष्ट्रीय राजकारण करत असताना या सर्वांची अत्यंत काळजी घ्यावी लागते. सामान्य माणसाला वेगळे वाटू शकते. पाकिस्तानी जनता, पाकिस्तानी लष्कर आणि दहशतवादी यांच्यात तो फरक करीत नाही. त्याच्या दृष्टीने सगळेच एका माळेचे मणी आहेत आणि वास्तव जरी तसे असले तरी, आंतरराष्ट्रीय रणनीती आखताना दूरदर्शी राष्ट्रनेत्याला सामान्य माणसासारखा विचार करता येत नाही. त्याला मुत्सद्दीपणाचा विचार करावा लागतो आणि नरेंद्र मोदी हे त्यातील 'मास्टर' आहेत. युद्धाच्या कथा ऐकायला गोड असतात, युद्धाचा विध्वंस पचवायला फार कडू असतो. युद्ध हा अंतिम पर्याय असतो. मुत्सद्दी राजकारणी युद्ध न करता प्रश्न सोडविण्याचा उपाय शोधत राहतो.

नरेंद्र मोदी यांनी युद्धाची सिद्धता तर ठेवली आहे, पाकिस्तानाने युद्ध लावले तर लढावे लागेल. युद्ध करणे ही आपली प्रवृत्ती नाही, पण युद्धातून पलायन करणे हा आपला स्वभावदेखील नाही. आपली परंपरा शूरवीर आणि वीरांगनांची आहे. आताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये वीरांगनादेखील सहभागी झाल्या. राणी दुर्गावती, झाशीची राणी, जिजाऊ यांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही.

ऑपरेशन सिंदूर भारतीयांच्या चिरकाल स्मरणात राहील, पराक्रम करण्याची परंपरा आपण विसरत चाललो होतो. १९६५, १९७१ आणि कारगीलचे युद्ध पराक्रमाचे इतिहास असले तरी, त्यानंतर झालेले दहशतवादी हल्ले आपली प्रतिमा अत्यंत खराब करणारी झाली होती. मात्र, 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले की, तो आता इतिहास झालेला आहे पराक्रमाची आणि एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची ही ऊर्जा अशीच ओजस्वी आणि तेजस्वी राहिली पाहिजे. तिला क्षीण करणाऱ्या आवाजांना जनतेने शांत केले पाहिजे. हा दहशतवाद एका 'ऑपरेशन सिंदूर'ने संपला, या भ्रमातही ग्रहू नये. निरंतर जागरूकता ही स्वातंत्र्याची हमी असते. नित्य, सिद्ध, समर्थता ही आत्मरक्षणाची गुरुकिल्ली असते.

# कष्टे करोनि घसरावे म्लेंच्छावरी...

**'ऑपरेशन सिंदूर'द्वारे एकीकडे भारतीय सैन्य दले पाकला बेचिराख करत आहेत, त्याचवेळी भारतातील राजकीय पक्षांचीदेखील एकजूट दिसून आली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे सर्व (काही अपवाद वगळता!) नेते हे एकाच सुरात बोलत आहेत. पाकला पुढील अनेक वर्षे उठता येणार नाही, अशी अद्दल घडविण्याचा चंग भारताने बांधला आहे. या सर्व प्रकाराचे वर्णन करण्यासाठी समर्थ रामदासांची 'बहुत लोक मेळवावें। येक विचारे भरावें। कष्टे करोनि घसरावे। म्लेंच्छावरी।' ही उक्तीच योग्य ठरते.**



वेधक
पार्थ कपोले

भारतीय लष्कर, हवाईदल आणि नौदलाने बुधवारी 'ऑपरेशन सिंदूर'चा शंखनाद केला. 'ऑपरेशन'ची ही केवळ सुरुवातच. त्याचे कारण म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' अद्याप संपलेले नाही. 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर (पीओजेके) आणि पाकमधील २१ दहशतवादी तळांची यादी बुधवारी दाखवली होती. नऊ ठिकाणांवर हल्ला करून ती ठिकाणे भारताने उद्ध्वस्त केली आहेत. दि. ७ ते दि. ८ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास भारताने लाहोरमध्येही हल्ला करून पाकची हवाई सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे उद्ध्वस्त केली. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर' पाकला चांगलेच महागात पडल्याचे आता स्पष्ट झाले. त्याचप्रमाणे, पाकद्वारे डागण्यात आलेली क्षेपणास्त्रे भारताने आपल्या 'एस-४००' या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने निष्प्रभ करून टाकली. यातील आणखी एक मेख म्हणजे, पाकची सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणा अतिशय सुमार असल्याचेही स्पष्ट झाले. अर्थात, आणखी बरेच काही घडत आहे आणि घडणार आहे. पाकला पुढील अनेक वर्षे उठता येणार नाही, अशी अद्दल घडविण्याचा चंग भारताने बांधला आहे. या सर्व प्रकाराचे वर्णन करण्यासाठी समर्थ रामदासांची '**बहुत लोक मेळवावें। येक विचारे भरावें। कष्टे करोनि घसरावे। म्लेंच्छावरी।**' ही उक्तीच योग्य ठरते.

'ऑपरेशन सिंदूर' सुरू असतानाच, भारतातील राजकीय पक्षांनीदेखील या कारवाईविरोधात एकजूट दाखवली. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष, सर्व नेते हे एकाच सुरात बोलत आहेत. विशेष म्हणजे, विरोधी पक्षातील काही अतित्रासदायक घटकही अगदी कधी नव्हे ते शहाण्या मुलासारखे वागत आहेत. पहलगामच्या हल्ल्यात इस्लामी दहशतवाद्यांनी हिंदूंना लक्ष्य केले. त्यामुळे भारतभर असलेला संताप आणि त्याची तीव्रता किती आहे, याची जाणीव सर्वच राजकीय पक्षांना झाली आहे. त्यामुळेच 'स्ट्राईकचे पुरावे कुठे आहेत' असा संतापजनक प्रश्न एकाही राजकीय पक्षाने विचारलेला नाही. त्यामुळे राजकीय आघाडीवर देशात निर्माण झालेले हे ऐक्य भारताच्या कारवाईसाठी अतिशय महत्त्वाचे ठरले. एकीकडे भारतीय सैन्यदले पाकला बेचिराख करत आहेत, त्याचवेळी भारताविरोधात खोट्या बातम्या पसरविण्याच्या नापाक कुरापती सुरुच आहेत. भारतीय सशस्त्र दलांनी सुरू केलेली ही मोहीम अचूक आणि प्रभावी असली, तरी आता त्याचे रुपांतर ऑनलाईन प्रचार युद्धातही झालेले दिसते. पाकसमर्थित सोशल मीडिया अकाऊंट्स आणि काही प्रमुख राजकीय व्यक्तीदेखील जाणूनबुजून बनावट बातम्या पसरवत आहेत, बनावट लष्करी विजयांच्या आणि काल्पनिक सूड उगवण्याच्या कथा रचत आहेत, ज्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. जुन्या प्रतिमांचा पुनर्वापर करणे, दिशाभूल करणारे जुने व्हिडिओ सादर करणे आणि पूर्णपणे बनावट दावे तयार करणे, त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. जाणूनबुजून अशा प्रकारे खोट्या गोष्टी पसरवणे की, लोकांना सत्य आणि खोटे यात फरक करणे कठीण होईल. ही केवळ चुकीची माहिती नाही; ही एक सुनियोजित आणि समन्वित मोहीम आहे, ज्याचा उद्देश वास्तवाचे विकृतीकरण करणे, जनतेची दिशाभूल करणे आणि संपूर्ण प्रदेशातील विचारसरणीची दिशा बदलणे आहे. मात्र, त्यातही 'पीआयबी'द्वारे 'इन्फोर्मेशन वॉर'मध्ये पाकला तडाखे देण्यात येत आहेत.

'ऑपरेशन सिंदूर' हे नाव केवळ एक सैनिकी मिशनचे शीर्षक नव्हते, तर भारतीय परंपरेतील शक्ती, प्रतिकार आणि स्वाभिमानाचे प्रतीक होते. 'सिंदूर' हे केवळ सौंदर्य किंवा पवित्रतेचे नव्हे, तर प्रतिशोधाचे, पराक्रमाचे आणि लढाऊ मानसिकतेचे प्रतीक ठरले. या नावाने शत्रूंना स्पष्ट संदेश दिला, भारतीय सैन्याला भडकवू नका, अन्यथा उत्तर आक्रमक आणि निर्णायक असेल! रक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहता, 'ऑपरेशन सिंदूर' ही केवळ एक सामरिक कारवाई नव्हती, तर भारताच्या बदलत्या लष्करी धोरणाची प्रतिमा होती. ही कारवाई केवळ प्रादेशिक सामर्थ्याचे प्रदर्शन नव्हते, तर एक स्पष्ट संदेश होता की, भारत आता फक्त संरक्षणासाठी नाही, तर आघात करण्यासाठीही तयार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, निर्दोष गुप्तचर माहिती आणि अत्यंत प्रशिक्षित जवानांची समन्वयित कारवाई हे या 'ऑपरेशन'चे प्रमुख घटक होते. हे केवळ क्षेत्रीय आक्रमण नव्हते, तर मनोवैज्ञानिक दडपण टाकणारे पाऊल होते, ज्यामुळे शत्रूंच्या मनोबलाला तडा जाईल.

भारताचे परराष्ट्र सचिव विवेक मिस्री, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी ज्या पद्धतीने भारताच्या ऑपरेशनची माहिती दिली, ते मनोवैज्ञानिक युद्धाचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरते. या परिषदेने भारताच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणाच्या धोरणात्मक परिवर्तनाची स्पष्ट जाणीव करून दिली. महिलांचा सहभाग केवळ साहाय्यक नव्हता, तर सामरिक निर्णयांमध्ये भाग घेणार्या नेतृत्वकर्त्यांचा होता. हा बदल भारताच्या सामरिक नेतृत्वाची नवी, आक्रमक ओळख घडवणारा आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी अंमलबजावणीचा पाकिस्तान आणि इस्लामी कट्टरपंथी गटांवर खोलवर मानसिक परिणाम होणे अपरिहार्य आहे. महिला अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या 'ऑपरेशन'ने त्यांच्यासाठी एक धक्का दिला. पाकिस्तानच्या सैन्याने नेहमीच आपली रणनीती धार्मिक उन्माद आणि कट्टरपंथी विचारसरणीवर आधारलेली आहे. त्यांच्या प्रचारयंत्रणेचा एक मोठा भाग 'मर्दानगी'वर आधारित आहे, ज्यामध्ये महिलांना दुर्बल समजले जाते. अशा वेळी भारतीय सैन्याच्या दोन महिला अधिकाऱ्यांनी 'ऑपरेशन'ची माहिती जगाला देणे, हे पाकच्या इस्लामी मानसिकतेवर आघात करणारे ठरते. हा एक प्रकारे त्यांच्या सैनिकांचे मनोबल खचवणारा आणि नेतृत्वाची क्षमता कमी करणारा फटका आहे. महिला अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या सामरिक कारवाईमुळे त्यांच्या प्रचार यंत्रणेतील 'मर्दानी वीरता'चा मुखवटा आता उघड झाला आहे, ज्याचा दूरगामी परिणाम त्यांच्या नवीन भरती मोहिमांवर होऊ शकतो.

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

# एम.आय. ६ ची विजयध्वजा आणि कर्नल गोर्दियेव्हस्की

कर्नल गोर्दियेव्हस्की हा नुकताच म्हणजे ४ मार्च २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी लंडनमध्ये मरण पावला. साम्यवादी राज्यव्यवस्था म्हणजे पृथ्वीवर अवतरलेला स्वर्ग आहे, असे मानून देशोदेशींच्या अनेक नामवंतांनी स्वदेशाशी बेईमानी केली. म्हणजे स्वदेशातील गुप्त माहिती सोव्हिएत रशियाला पुरवली. कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्की यांचे मत नेमके उलटे होते. साम्यवादी राज्यव्यवस्था म्हणजे निखळ गुंडगिरी आहे हे प्रत्यक्ष अनुभव घेऊन कळल्यावर त्याने रशियन गुप्त माहिती ब्रिटनला पुरवली. लेखाच्या या पहिल्या भागात आपण या घटनेचा पूर्ववृत्तांत पाहू. दुसऱ्या भागात गोर्दियेव्हस्कीने गुप्त माहिती देण्यासाठी काय-काय युक्त्या लढवल्या, याबद्दल जाणून घेऊ...

सन १९८८ च्या जून महिन्यातली ती एक छानशी संध्याकाळ होती. लंडनच्या वॅक्झॉल क्रॉस परिसरातील एम.आय. ६ च्या मुख्यालयात म्हणजेच ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या कार्यालयात नेहमीप्रमाणेच कामे चालू होती. खरे पाहता आज तिथे प्रचंड जल्लोष असायला हवा होता. विजय दिन साजरा केला जात असायला हवा होता. हाच विजय जर उघड-उघड राजकीय किंवा लष्करी क्षेत्रातला असता, तर कदाचित प्रचंड मोठी जाहीर सभा, नेत्यांची भाषणे, लष्करी मानवंदना, संचलने, सैनिकी पथकांच्या थरारक कसरती वगैरे नेत्रदीपक कार्यक्रम झाले असते. पण वॅक्झॉल क्रॉस मुख्यालयात यापैकी कसलाही हासभाससुद्धा नव्हता. कारण तो गुप्तहेर खात्याच्या एका मोठ्या कामगिरीचा विजय होता. तो गुप्तपणेच साजरा करणे आवश्यक होते.

ब्रिटिश हेरखात्याचा एक निवृत्त हेरप्रमुख म्हणतो, ''आमच्या अपयशाचे जाहीर वाभाडे काढले जातात; आमच्या यशाचा मात्र कुणालाही पत्ताच नसतो.'' हे अगदी खरे आहे. पण त्याला इलाजच नसतो. कारण त्यांचे यश जाहीर झाले तर शत्रू सावध होणार आणि ज्या मार्गाने ते यश मिळाले, तो मार्ग बंद होणार. परंतु, १९८८ सालचे ते यश इतके मोठे आणि इतके दूरगामी परिणाम करणारे होते की, ते साजरे करण्यासाठी एक मेजवानी देणे आवश्यक होतेच. त्यासाठी ठिकाण मुद्दामच मुख्यालयापासून खूप दूर उत्तर लंडनमधले एक हॉटेल निवडण्यात आले. एम.आय. ६ चे अनेक उच्चपदस्थ अधिकारी तिथे जमले. सगळ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू होता एक उंच, धिप्पाड, कपाळावरून केस मागे फिरलेला, चष्मिस, टिपिकल रशियन चेहऱ्याचा वयस्कर माणूस; त्याचे नाव कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्की. सोव्हियत रशियाच्या के. जी. बी. या कुख्यात गुप्तहेर खात्याच्या लंडन कार्यालयाचा प्रमुख. मेजवानीला अपेक्षित असलेले सर्व लोक जमल्यावर पाश्चिमात्य पद्धतीनुसार दारूचे ग्लास घेऊन सगळे जण गोर्दियेव्हस्कीभोवती जमले. एक जण म्हणाला, ''अफगाणिस्तानातून रशियन सैन्याच्या सुरू झालेल्या केविलवाण्या माघारीकरिता...!'' सगळ्यांनी चिअर्स म्हणत ग्लास उंचावून गोर्दियेव्हस्कीला अभिवादन केले. या प्रकाराला 'टोस्ट' असे म्हटले जाते. हे सगळे इतक्या सहजतेने, सफाईने झाले की, हॉटेलमधल्या इतर बघ्यांना तो माणूस काय बोलला आणि हे सगळे कोण आहेत, याचा कसलाही थांगपत्ता लागला नाही.

एम.आय. ६ चे ते सगळे अधिकारी मात्र त्या दिवशी कमालीचे खुशीत होते. त्यांना कळून चुकले होते की, ही रशियन सैन्याची नुसतीच माघार नाही; तर एका सैतानी साम्राज्याच्या एका एव्हिल एम्पायरच्या पतनाची सुरुवात आहे आणि खरोखरच आणखी जेमतेम अडीच-तीन वर्षांत ते साम्राज्य कोसळले. १९८८ ते १९९१. ब्रिटिशांचा आणि लोकशाहीवादी जगाचा एक जबरदस्त शत्रू खलास झाला. खरोखरच हा फार मोठा विजय होता. ही सगळी काय भानगड आहे हे नीट समजून घेण्यासाठी आपण इतिहासावर एक वेगवान दृष्टिक्षेप टाकू या.

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या बळावर युरोपातल्या देशांमध्ये जग जिंकण्याची स्पर्धा लागली. ती मुख्यतः इंग्लंडने, पण अधिकृत भाषेत इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड आणि वेल्स हे चार



प्रांत मिळून बनलेल्या ब्रिटनने जिंकली. नेपोलियन बोनापार्टने ब्रिटनसमोर जबरदस्त आव्हान उभे केले होते, पण ब्रिटनने त्यालाही यशस्वीपणे संपवले. तेवढ्यात ब्रिटनला जाणीव झाली रशियाच्या वाढत्या बळाची.

रशियन सम्राट म्हणजे झार पीटर द ग्रेट (जन्म १६७२, राज्यारोहण १६८२, मृत्यू १७२५) याने अतिशय योजनाबद्धरीतीने रशियाला अत्याधुनिक बनवले. त्याला संपूर्ण पूर्व युरोप आणि स्कँडिनेव्हियन देश (नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क) तर हवेच होते; पण रशियाच्या दक्षिणेकडचे कझाकस्तान, उझबेकिस्तान ते अफगाणिस्तानपर्यंतचे सर्व देश जिंकून थेट भारतापर्यंत पोचायची म्हणजे भारत जिंकण्याची त्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी ब्रिटिशांनी अफगाणिस्तान जिंकून तिकडची सरहद्द सुरक्षित करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. ते जमेना. मग त्यांनी मुत्सद्देगिरी चालवून अफगाणांच्या शहाला कायमचा मित्र बनवले. रशियात १९१७ साली साम्यवादी क्रांती झाली. झारशाही संपली. पण साम्यवादी नेते लेनिन आणि त्याच्याही पेक्षा स्टॅलिन हे झार राजे फिके पडावेत इतके सत्तापिपासू होते.

झारशाहीप्रमाणेच साम्यवादी राजवट आणि ब्रिटन यांचे जुने हाडवैर चालूच राहिले; किंबहुना त्याला अधिकच धार चढली. तेवढ्यात जग जिंकू पाहणारा एक नवाच महाखलनायक जगाच्या रंगभूमिवर अवतरला. ॲडॉल्फ हिटलर. त्याने निर्माण केलेल्या महाभयानक उत्पाताने त्याच्या स्वतःच्या देशासकट सगळेच युरोपीय देश खिळखिळे झाले. पण स्टॅलिन अधिकच प्रबळ झाला. पाहता पाहता त्याने संपूर्ण पूर्व युरोप आणि अफगाणिस्तानपर्यंतचे देश आपल्या पंजाखाली आणले.

साम्यवादी तत्त्वज्ञान नावाच्या मायावी आवरणाखाली त्याने जगभरच्या विचारवंत, बुद्धिवंतांना भुलवून आपल्या कच्छपी लावले. स्टॅलिननेच निर्माण केलेल्या के. जी. बी. या रशियन गुप्तहेर खात्याने स्वदेशासकट जगभर विश्वासघात, फंदफितुरी आणि घातपात यांचा नुसता कहर उसळून दिला. साम्यवादाच्या मायावी तत्त्वज्ञानाने भ्रमित झालेले जगभरचे विचारवंत, बुद्धिमंत, साहित्यिक, कलावंत आपापल्या देशाशी बेधडक बेईमानी करायला उद्युक्त झाले. पुढे स्टॅलिनच्याच काही चेल्याचपाट्यांना त्याची दादागिरी असह्य होऊ लागली. त्यांनी बंड केले. तेव्हा सोव्हियत रणगाडे दणाणत आले नि त्यांनी ते बंड अक्षरशः चिरडून टाकले. उदा. १९५६ साली हंगेरीचा साम्यवादी नेता इम्रे नागी आणि १९६८ साली झेकोस्लोव्हाकियाचा अलेक्झांडर ड्युबचेक यांनी बंड केले. त्याची प्रचंड लष्करी बळावर साफ वासलात लावण्यात आली. ब्रिटन-अमेरिका दातओठ चावत फक्त बघत राहिले आणि उरलेले जग भयचकित होऊन पाहात राहिले.

१९७९ साली अफगाणिस्तानात यादवी सुरू झाली. तेव्हा तिथल्या साम्यवादी पक्षाची पाठराखण करायला पुन्हा एकदा सोव्हियत रणगाडे काबूलमध्ये उतरले. पण आता हे १९५६ किंवा १९६८ साल नसून १९७९ साल होते. रणगाड्यांना घाबरायला पठाण म्हणजे हंगेरियन किंवा झेकोस्लोव्हाक पांढरपेशे नागरिक नव्हते. एक जबरदस्त गनिमी युद्ध सुरू झाले, जे पुढची ९ वर्षे सतत सुरू राहिले. ओलेग गार्दियेव्हस्की १९६८ सालीच के. जी. बी. हस्तक म्हणून डेन्मार्क देशाची राजधानी कोपनहेगनमध्ये कामाला लागला. उत्कृष्ट काम केल्याबद्दल १९७३ साली त्याची बढती आणि बदली लंडन केंद्राचा प्रमुख म्हणून करण्यात आली. डॅनिश गुप्तहेर खात्यातील म्हणजे एम.आय. ६ मधील योग्य व्यक्तीपर्यंत पोचला आणि त्याने ब्रिटनला गुप्त माहिती देण्याचे काम सुरू केले. केवढे आश्चर्य! के. जी. बी. चा लंडन केंद्रप्रमुख स्वतः होऊन ब्रिटिश हस्तक बनला.

१९५० आणि ६० च्या दशकात हेरॉल्ड ॲड्रियन रसेल उर्फ किम फिल्बी हा उच्चपदस्थ ब्रिटिश हेर स्वत होऊन के. जी. बी. चा हस्तक बनला होता आणि त्याने फार महत्त्वाची माहिती रशियाला पुरवली होती. हे त्याने केले, यात त्याला देशद्रोह वाटला नाही. कारण तो साम्यवादी होता. आपण हे केलेच पाहिजे असे त्याला वाटत होते. गोर्दियेव्हस्कीची भूमिका नेमकी त्याच्या उलट होती. साम्यवादी तत्त्वज्ञान आणि त्याहीपेक्षा म्हणजे के. जी. बी.च्या कारवाया ही चक्क गुन्हेगारी, गुंडगिरी आहे आणि ती संपवलीच पाहिजे, असे त्याचे मत बनले होते. १९७३ ते १९८५ पर्यंत गोर्दियेव्हस्कीने एम.आय. ६ ला फार मौल्यवान माहिती पुरवली. त्यातला मुख्य भाग हा की, सोव्हियत रशियन नेते कायम जी दादागिरी करतात त्यामागे सामर्थ्याचा अहंकार हा भाग नसून युरोप-अमेरिकेच्या विज्ञानतंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ते मनातून घाबरलेले आहेत, ही गोष्ट मार्गारेट थॅचर आणि रोनाल्ड रीगन यांना पटवून दिले.

१९८३ साली रीगन यांनी उघडपणे सोव्हियत राजवटीला एव्हिल एम्पायर म्हटल्यावर तर रशियन नेतृत्वाची पाटलोण सुटायची वेळ आली होती. हे गोर्दियेव्हस्कीकडून एम.आय. ६ ला समजले. १९८५ नंतर सगळेच वेगाने बदलले. सत्तेवर आलेल्या मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी मे १९८८ पासून अफगाणिस्तानातली पठाणांकडून हग्या मार खाणारी सोव्हियत सेना काढून घ्यायला सुरुवात केली. १९८९ साली त्यांनी पूर्व युरोपातल्या आपल्या मांडलिक चमच्यांना वाऱ्यावर सोडले. त्यासरशी पूर्व जर्मनी ते ताजिकीस्तानपर्यंतचे सोव्हियत साम्राज्य धडाधडा कोसळले आणि १९९१ साली तर यू. एस. एस. आर. नावाच्या सैतानी राजवटीची संपूर्ण इतिश्री होऊन रशियन फेडरेशन हा नवा देश अस्तित्वात आला. बेन मॅकिंटायर हा एक नाव ब्रिटिश इतिहासक-लेखक आहे. 'द स्पाय ॲन्ड द ट्रेटर' या नावाने त्याने कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्कीचे चरित्र आणि एकंदर त्या काळाचा लिहिलेला वृत्तांत नुकताच प्रकाशित झाला आहे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म
डॉ. अविनाश मोहरील

# काय काय शिकवाल?



हा लेख वाचू शकणाऱ्या प्रत्येकाला मी आज एक छोटीशी गंमत करायला लावणार आहे. प्रत्येकाने काही क्षणापुरते आपले आयुष्य टाईम मशीनमध्ये टाकल्यागत मागे न्यायचे आणि मनाने थेट बालपणात पोहोचायचे... पोहोचलात? अरेरे... लगेच स्वप्नाळू होऊ नका. लगेच 'बालपण देगा देवा' वगैरे तूर्तास नको. कारण मला एका महत्त्वाच्या विषयावर तुमच्याशी बोलायचे आहे. चला तर मग! झालात मनाने लहानगे?

ठीक! आता आठवा पाहू आपल्याला कोणत्या कोणत्या गोष्टी आपल्या आईवडिलांनी किंवा गुरुजींनी किंवा स्पेशल ट्रेनरने शिकविल्या? आणि आपणच आपल्या किती गोष्टी शिकलो? जसे, आपल्याला पाढे आणि इंग्रजी ग्रामरचे नियम गुरुजींनी शिकविले. सायंकाळी देवाजवळ 'शुभम् करोति' म्हणायला आजीने शिकविले. आकडेमोड करायला आजोबांनी शिकविली. नीट वागणे-बोलणे आई-बाबांनी शिकविले. साधारणपणे आपल्या प्रत्येकाच्याच बाबतीत जीवनाचे हे सारे प्राथमिक धडे याच मंडळींकडून आपण शिकलो. परंतु, आता मी आपल्या बालपणीच्या काही गोष्टी सांगणार आहे, ज्याचे ट्रेनर आपल्याला सापडत नाहीत. कोणत्या गोष्टी होत्या त्या? लोकांच्या बागेतून पेरू किंवा चिंचा गुपचूप तोडून आणणे आणि त्या फस्त करणे, कंचे खेळणे, गारा खेळून ढोपर फुटणे, लपाछपी, एकमेकांच्या खोड्या काढणे, मित्रांच्या नकला करणे, भांडणे करणे; त्यात सपाटून शिव्या देणे, आपल्या गुरुजींच्या नकला करणे, त्यापायी त्यांच्या हातचा मार खाणे, मातीत खेळणे, एकमेकांचे शर्ट ओढणे, अंगावर शाई उडविणे, होळीच्या दिवशी इतके रंगणे की आईलाही ओळखायला न येणे; सर्वात महत्त्वाचे म्हणजे धुमाकूळ करणे. ज्या घरांमध्ये पोरे आहेत त्या घरात केवळ हैदोस चालायचा, ते घर नीटनेटके राहण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु परत आमची पोरे किती मस्ती करतात म्हणून कौतुकही असायचे. या साऱ्या गोंधळ व गडबड करण्याच्या गोष्टी आपल्याला कुणी शिकविल्या का? या गोष्टी काय शिकवायच्या असतात का? या सर्व मुलांच्या अंगभूत बाबी आहेत; किंबहुना मुलांचे धमाल बालपण याच बाबींनी सिद्ध होते.

या सर्व गोष्टी मुलांनी कराव्या म्हणून आजकाल मुलांना या सर्व गोष्टींचे ट्रेनिंग दिले जाते व ते देखील पालकांकडून फी घेऊन, या गोष्टीवर विश्वास बसेल का? माझाही विश्वास नव्हता. खरे तर असे काही होऊ शकते, ही गोष्ट मी मानायलाच तयार नव्हतो. अशा पद्धतीचे ट्रेनिंग प्रत्यक्ष बघितल्यानंतर मात्र मी चक्रावून गेलो. आधुनिक काळात आपण प्रोफेशनॅलिझम स्वीकारायला हवा व त्याकरिता लहानपणापासूनच मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे ट्रेनिंग द्यायला हवे, हे मी काही प्रमाणात समजू शकतो. मी बघितला तो प्रकार मात्र वेगळा व धक्कादायक होता.

आधुनिक काळात बरेच पालक आपल्या मुलांच्या विकासाबद्दल जागरूक राहतात. स्पर्धेच्या युगामध्ये ते योग्यच आहे. म्हणूनच बऱ्याच लहान वयापासून मुलांना नीटनेटके राहणे, चांगले कपडे नीट परिधान करणे, जेवण नीट करणे वगैरे शिकविले जाते. या गोष्टींमुळे खरे तर मुले अकारणच बालपण हरवून बसतात. मुंबईच्या त्या चमकदार शाळेमध्ये जवळपास मशीन झालेली साधारण १०० पिटुकली मुले मला मैदानावर उभी दिसली. एका शिबिरांतर्गत ही मुले तेथे होती. माझ्या बहिणीने मला त्या प्रकाराबद्दल कल्पना दिली होती; प्रत्यक्षात असे काही घडू शकते, हे बघून मला काही सुचेना. या साऱ्या मुलांचे मायबापदेखील त्या दिवशी हजर होते. शिबिराचा तो शेवटचा दिवस होता. त्या दिवशी जे काही १० दिवसांमध्ये त्या मुलांना शिकविण्यात आले त्या सर्व गोष्टींचे सादरीकरण केले जाणार होते.

प्रत्येकच पालक मोठमोठ्या चमकदार गाड्यांमधून आलेले होते. गाड्यांची मोठी रांग शाळेसमोर होती. कारण ज्या पोरांचे सादरीकरण होते ती पोरे नर्सरीतील होती व नर्सरीची त्या शाळेची फी पावणेदोन लाख रुपये आहे. ज्या शिबिराचा समारोप होता त्या शिबिराची १० दिवसांची फी ३० हजार रुपये होती. इतकी फी घेऊन त्या छोट्या छोट्या पोरांना काय शिकवितात, हे बघण्याची उत्सुकता मला लागलेली होती. सादरीकरण सुरू झाले व मी जे काही बघितले, त्यावर माझा अजूनही विश्वास बसलेला नाही. पालक आपल्या मुलांसोबत असे काही करू शकतात, हे कल्पनेच्या पलीकडे आहे. त्या शिबिराचे नाव होते 'बी-ऑड.' नावावरून काही लक्षात येत नव्हते. प्रत्यक्षात तो सारा प्रकार बघून मीच स्वतः त्या परिसरात 'ऑड व्यक्ती' भासू लागलो. त्या साऱ्या पोरांनी पांढरा शुभ्र गणवेष परिधान केला होता. त्यांच्या ट्रेनरने सादरीकरण सुरू केले. त्या बघत असताना त्यांचे पालक त्यांचे फोटो काढीत होते, हसत होते, टाळ्या वाजवत होते व त्यांच्यात ऑड ठरलेला मी डोक्यावर हात मारून त्यांची कीव करीत बसलो होतो. सूचना देण्यात येत होती.

**सूचना १ :** एकमेकांच्या डोक्यावर हात फिरवून भांग मोडा. पोरे दोनच्या जोडीमध्ये एकमेकांच्या केसांवरून हात फिरवत होती. सूचना २ : एकमेकांचे इन केलेले शर्ट खेचून बाहेर काढा. मुलांनी तेदेखील केले.

**सूचना ३ :** बाजूच्या टेबलवर ठेवलेला शाईचा पेन उचलून एकमेकांच्या शर्टवर उडवा. मुलांनी असे केल्यावर अंगावर पाल पडल्यागत तोंडे त्यांच्या आयांनी केली.

**सूचना ४ :** एकमेकांना वाकुल्या दाखवा. मुलांनी तसे पण केले. आता आपणा सर्वांच्या लक्षात आलेच असेल, तो वर्ग मुलांना खोड्या शिकविण्याचा वर्ग होता! खोड्या शिकवण्याचा वर्ग? होय. साधारण १० प्रकारच्या खोड्या या वर्गामध्ये शिकविल्या गेल्या व त्याचे सादरीकरण करण्यात आले.

सारे काही संपल्यावर ट्रेनरने मुलांना सूचना दिली की, आता हे सारे विसरून जायचे व पुन्हा 'गुड बॉय' आणि 'गुड गर्ल' बनायचे. साऱ्यांना परत नीट ड्रेस अप करण्यासाठी आत नेण्यात आले व माती-शाई इत्यादींनी खराब झालेले कपडे बदलून ही पोरे पुन्हा नवा नीट आणि क्लीन ड्रेस घालून आलीत. मग बक्षीस समारंभ झाला व सर्वात चांगले खोड्यांचे सादरीकरण करणाऱ्या मुलांना बक्षिसे देण्यात आली. आपल्या चिमुरड्यांना बक्षिसे स्वीकारताना बघून काही पालकांना भरून वगैरे आले.

खोड्यांच्या सादरीकरणाचा कार्यक्रम आटोपल्यावर जवळपास पालकांच्या वेडाचाराचे बळी ठरलेली, प्रोफेशनॅलिझमच्या नावाखाली सुरू असलेल्या विकृत प्रकारामध्ये भरडून निघालेली व यांत्रिकतेच्या जगामध्ये जवळपास यंत्रांमध्ये परावर्तित झालेली ती १०० कोवळी मुले शिस्तीत परत गेली. सारेच जवळपास गेले होते. मी एकटा सुन्न होऊन त्या मैदानाच्या एका टोकावर उभा होतो. कोणते भविष्य बघितले मी? कोण आहेत हे लोक जे लहान कोवळ्या मुलांना व्यापारी दृष्टिकोनातून वापरतात, त्यांच्यातले बालपण करपून टाकून त्यांना खोड्या करायला शिकविण्यासाठी वर्ग चालवितात आणि या वर्गामध्ये आपल्या मुलांना पाठवून त्याचा आनंद घेणारे हे पालक कोण आहेत? काय हक्क आहे त्यांना या कोवळ्या मुलांना लहानपणीच प्रोफेशनल बनविण्याचा? केवळ जन्म दिला म्हणून!!

त्यांना मुले म्हणून जगण्याचा अधिकार त्या सर्वशक्तिमान परमपित्याने दिलाय. तो अधिकार हरवून घेण्याचा हा प्रकार म्हणजे अमानवीय कृत्य आहे. परंतु हे सारे होत आहे. हे थांबवायला हवे. प्रोफेशनॅलिझमचा खरा अर्थ शिक्षितांनाच कळत नसेल तर त्यांना सुशिक्षित तरी कसे म्हणायचे? यासंबंधी काय म्हणावे व काय बोलावे हे सुचतच नाहीये! वाचकांना सुचत असल्यास सांगावे!! एकच म्हणावे वाटते, अजून आपल्यालाही समज आलेली नाहीये, बालपणीचं निखळ सुख कळलेलंच नाहीये. खरं सांगायचे तर सुख म्हणजे नक्की काय असतं... तेच कळलेलं नाहीये!

---

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर

# पितृदेवो भव



लहान मूल जसं जसं वाढू लागतं तसं तसं त्याच्या मेंदूला सभोवतालाचं भान येतं. इंग्रजी भाषेत त्याला 'ओरिएन्टेशन' म्हणतात. आईच्या गर्भाशयाशी जुळलेली नाळ जन्मल्याबरोबर कापली जाते आणि नवजाताला सुटं करण्यात येतं. काही दिवसांनी नाभीत उरलेलं नाळेचं टोकदेखील गळून पडतं, पण आईशी असलेला बंध मात्र नित्य असतो. कापून वेगळा केलेला हात किंवा पाय प्रत्यक्षात अस्तित्वात नसूनही होता त्या जागी तो अवयव तसाच आहे असा भास त्या व्यक्तीला नेहमीच होत असतो. मग तो दुखतो, खाजवतो आणि इतरही संवेदना त्यात तशाच आहेत, असं वाटत असतं. म्हणजे तो आहेच ही जाणीव सतत होत असते. या आभासी संवेदनेला आजच्या आधुनिक विज्ञानात 'फॅण्टम फूट' म्हणतात.

आई आणि बाळाला जोडणारी नाळ प्रत्यक्षात कापून टाकली असली, तरीही ती जुळलेलीच भासते ती याच एका कारणामुळे. हा प्रकृतीचा नियम आहे. लैंगिक प्रजोत्पादन करणाऱ्या प्राणिमात्रांच्या मादीच्या शरीरातली सर्वात मोठी पेशी बीजांड असते. या उलट नराच्या शरीरातली आकारानं सर्वात लहान असलेली पेशी म्हणजे शुक्राणू. नवीन संशोधनात दोन गोष्टी प्रकर्षानं उजेडात आल्या आहेत. त्यातली पहिली गोष्ट पुरुष वीर्यात करोडोंच्या संख्येनं असलेल्या शुक्राणूंपैकी कोणत्या शुक्राणूचा स्वीकार करायचा हा निर्णय सर्वस्वी त्या बीजांडाचा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे ज्यावेळी तो निर्णय होऊन बीजांड त्या शुक्राणूला त्यात प्रवेश करण्याची परवानगी देते आणि निवडल्या गेलेला तो शुक्राणू त्यात प्रवेश करून त्याला फलित करतो, त्यावेळी जैवरासायनिक प्रक्रिया होऊन तेजाची एक ठिणगी (स्पार्क) उत्पन्न होते. शिवाय इतर शुक्राणूंना मज्जाव करणारे रासायनिक संदेशही बीजांडाकडून प्रक्षेपित केले जातात. फलन प्रक्रियेत तो शुक्राणू फक्त २३ गुणसूत्रं बीजांडाला देऊ करतो. ही देवाणघेवाण सुरू असताना जर 'एक्स' हे स्त्री गुणसूत्र देण्यात आलं तर मुलगी आणि 'वाय' हे पुरुष गुणसूत्र दिल्या गेलं तर मुलगा हे निश्चित करून त्याची भूमिका तात्पुरती संपते. नंतरचा सगळा सोपस्कार मातेच्या शरीरात घडत असतो. माता प्रसूत होते, बाळाचं संगोपन करते.

वयाच्या पाचव्या वर्षी तिचं/त्याचं अनौपचारिक शिक्षण सुरू होतं, ते आईच्या मांडीवर बसूनच. जीवनाचा हा सुरुवातीचा काळ आईच्या पदराआड, तिच्या सुरक्षित कुशीत, तिचा हात धरून पूर्ण होतो. तोवर जवळचे सगळेच नातेवाईक आईला संगोपनात मदत करतात, पण या दोघांच्यात फारसं कोणी येत नाही. वयाच्या आठव्या वर्षीपासून मूल आईपासून विलग होण्याची प्रक्रिया सुरू होते. आईवर विसंबून असलेल्या आयुष्यात बदल घडून येतात.

औपचारिक शिक्षण देत बालक/बालिकेला स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण करण्यात पित्याची भूमिका सुरू होते. यास्काचार्यांनी 'निरुक्त' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. त्यात ते लिहून जातात - पिता हा शब्द 'पा म्हणजे रक्षणे' या धातूपासून तयार होतो. 'यः पाति स पिता' जो रक्षण करतो तो पिता. 'पिता पाता वा पालयिता वा' म्हणजे जो पालन करतो तो पिता. त्यामुळे पिता कोणाला म्हणावं किंवा मानावं याचीही व्याख्या करण्यात आलेली आहे- '**शरीरकृत् प्राणदाता यस्य चान्नानि भुंजते। क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने।।**' जो गर्भाधानाच्या माध्यमातून शरीर निर्माण करतो तो प्रथम, जो अभय देत प्राणांचं रक्षण करतो तो द्वितीय आणि ज्याचं अन्न भक्षण केलं आहे तो तिसरा असे तिघेही पिताच असतात.

आपल्या पूर्वजांनी आईला पृथ्वी आणि पित्याला स्वर्गाची उपमा दिलेली आहे. तर, पिता आणि स्वर्ग आपल्या जीवनाला उदात्तता आणि नैतिकतेची चौकट देतात, मानसिक बळ आणि संरक्षक छत्र देतात, आयुष्याला दिशा आणि उद्देश देऊन आपल्या अस्तित्वाला अर्थ देतात. आठव्या वर्षी मौंजीबंधन अर्थात उपनयन संस्कार पित्याच्या मांडीवर करतात तो याच कारणामुळे. वडिलांच्या बटूच्या मधला अंतरपाट दूर सारल्यानंतर बटू त्यांना पुष्पमाला अर्पण करतो. त्यांच्या सारखंच तेजस्वी, कणखर, विद्यासंपन्न, सामर्थ्यवान आणि कर्तृत्ववान होणं हा जीवनाचा उद्देश वरतो, असा या कर्मकांडाचा अंतरनिहित अर्थ होतो. 'वरणे' या क्रियापदाचा अर्थ होतो उपलब्ध पर्यायांतून सर्वोत्तम निवडणं. '**तत् सवितुर्वरेण्यम् = वरण्यास योग्य असा तो सवितृ (सूर्य)...**' यानंतर बटू विद्यार्थी म्हणून विद्या आणि ज्ञानार्जन करण्यासाठी व्रतबद्ध होतो. या खडतर जीवनातला संघर्ष यशस्वीपणे करता यावा म्हणून जे जे काही विद्या- ज्ञान- गुण- कौशल्य- सिद्धी आवश्यक आहेत ते ते सारं आत्मसात करण्याची सुरुवात पित्याच्या मांडीवर बसून होते. म्हणूनच सर्वसामान्य कुटुंबात पिता हा नीतिमत्ता आणि जीवनमूल्यांचा आदर्श असतो. त्यामुळे पिता या संकल्पनेत पाच प्रकारच्या व्यक्ती सामील करण्यात आल्या आहेत- '**जनकश्चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति। अन्नदाता भयत्राता पश्चैते पितरः स्मृताः।।**'

अर्थात जनक, उपनेता, विद्यादाता, अन्नदाता आणि भयापासून रक्षण करणारा ही पाच कार्ये करणारा तो पिता, हे लक्षात ठेवा. याचा अर्थ असा की, आई जर नौका असेल तर तिचं शीड, सुकाणू आणि वल्ही वडील आहेत. हे पुरते लक्षात आलेल्या युधिष्ठिर धर्मराजानं यक्षाला काय उत्तर दिलं बघा.

महाभारताच्या वनपर्वातली ही कथा उद्बोधक आहे. वनवासात असलेल्या पांडवांना तहान लागते म्हणून सहदेव पाण्याच्या शोधात निघतो. खूप वेळ गेला तरी तो परत येत नाही म्हणून नकुल त्याला शोधायला जातो. तोही परतत नाही म्हणून अर्जुन आणि मग त्या तिघांना शोधायला भीमही निघतो. ते चौघेही परत आले नाहीत हे बघून शेवटी युधिष्ठिर जातो.

एका तळ्याकाठी चौघेही अस्ताव्यस्त पडलेले दिसतात. अखेर तो त्या तळ्याला नमस्कार करून चारही भावांची अशी अवस्था का झाली, असा प्रश्न विनम्रपणे करतो. तळ्यात राहणारा यक्ष त्याच्यासमोर प्रकट होतो. त्याच्या चारही भावांनी यक्षाची अनुमती न घेताच तळ्यातलं पाणी घेण्याचा प्रयत्न केला. यक्षानं आक्षेप घेताच दुरुत्तरं केली आणि त्याचा अनादर केला. परिणामी त्या चौघांनाही आपले प्राण गमवावे लागले. युधिष्ठिरानं आपल्या भावांच्या दुर्व्यवहारासाठी यक्षाची क्षमा मागितली आणि भावांना उःशाप देऊन जीवनदान द्यावं, अशी विनंती केली. त्यावर यक्षानं एक अट घातली की, तो युधिष्ठिराला काही प्रश्न विचारेल. त्या सगळ्या प्रश्नांची यथायोग्य उत्तरं द्यावीत आणि आपल्या भावांना जिवंत करवून घ्यावं. चारही भावांचा जीव पणाला लागलेले असताना त्यांचा मोठा भाऊ म्हणून जितक्या शांततेनं, गांभीर्यानं, स्थिरमनानं युधिष्ठिर उत्तरं देतो, त्याला तोड नाही.


(पान ६ वर)

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# जुळल्या सगळ्या 'त्या' आठवणी...!

६ ऑगस्ट १९४५ ची गोष्ट. जपानच्या एका शाळेतील कार्यक्रमात १८ वर्षांचा हारुकी व्हॉयोलीन वाजवणार होता तर त्याच्या सोबत त्याची मैत्रीण अमिको पियानो वाजविणार होती. दोघांनी मिळून त्याचे संगीत तयार केले होते. दोघेही कार्यक्रमापूर्वीची उजळणी करीत होते. कार्यक्रमानंतर तो अमिकोजवळ त्याचे प्रेम व्यक्त करणार होता. पण, त्यांचा कार्यक्रम झालाच नाही! कारण सकाळी बरोबर सव्वाआठ वाजता त्यांच्या हिरोशिमा शहरावर अमेरिकेने जगातील पहिला अणुबॉम्ब टाकला. यात १ लाख ६६ हजार लोक मृत्यू पावले व ८० हजार जखमी झाले. त्याच्या शब्दात सांगायचे तर तेव्हा त्याने आकाशातून सूर्य पडताना पाहिला! म्हणजे प्रचंड आवाज करत डोळे दिपवणारा प्रकाश सगळीकडे पसरला आणि त्याची शुद्ध हरपली.



अणुबॉम्बचा स्फोट
६ ऑगस्ट १९४५



२०२५ : हारुकी व अमिको कार्यक्रम सादर करताना

काही दिवसांनी हारुकी एका हॉस्पिटलमध्ये शुद्धीवर आला तेव्हा त्याला काय घडले आहे, तेच कळत नव्हते. मग कळले की, तो अणुबॉम्ब हल्ला होता व त्याचे आई-वडील, भावंड, मित्र सगळे त्या हल्ल्यात मृत्यू पावले. अमिकोचासुद्धा त्या हल्ल्यात मृत्यू झाला, असे त्याला वाटले. अशी ७० वर्षे गेलीत. आता तो ८८ वर्षांचा होता. एक दिवस त्याला सरकारी पत्र मिळाले की, अमिको नावाची वृद्धा त्याला शोधते आहे. पत्रात तिचा नंबर दिलेला होता. त्याला धक्काच बसला. ७० वर्षे भोगलेले एकटेपणाचे दु:ख, विरह यामुळे तो सतत रडत होता. कारण ती जिवंत नाही हे स्वत:ला पटवण्यात तारुण्य, प्रौढत्वाचे टप्पे पार करून आता तो म्हातारा झाला होता. शेवटी थरथरत्या बोटांनी त्याने तिला फोन केला. अनेक वेळा रिंग वाजल्यावर तिने फोन उचलला आणि तिचा आवाज ऐकू आला. प्रयत्न करूनही त्याच्या घशातून आवाजच निघेना. पण त्याने जी बोलण्याची धडपड केली, ती तिला बरोबर कळली. थरथरत्या आवाजात तिने म्हटले, ''हा..हा.. हारुकी?'' तो 'होय' म्हणाला. मग दोघेही फक्त हुंदके देत रडलेत. जुन्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्यात. मनात तेच जुने स्वर झंकारलेत. 'स्वर आले दुरुनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी' यशवंत देव यांनी लिहिलेल्या, प्रभाकर जोग यांच्या संगीतात सुधीर फडके यांनी गायलेल्या या मराठी भावगीतासारखीच परिस्थिती प्रत्यक्ष तयार झाली. ७० वर्षांनी का होईना दोन जीव पुन्हा भेटलेत. त्याने तिला विचारले, ''तुला आपलं संगीत आठवतंय का?'' तिने हसून मान डोलावली आणि मग त्या तारुण्यातील जुन्या आठवणींच्या शक्तीने दोघांनीही पुन्हा त्यांचे संगीत वाजवायचे ठरवले. ज्या देशाच्या अणुबॉम्बमुळे त्यांचा कार्यक्रम झाला नव्हता, त्या अमेरिकेतच जेव्हा त्यांनी कार्यक्रम सादर केला.

### महत्त्वाचा प्रश्न

**मुलांच्या भविष्यासाठी अशा शक्तिदायक आठवणींचा खजिना, संस्कार आपण देऊ शकतो का?**

**नष्टचक्र :** मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा शोध लागण्यापूर्वीच्या काळात कुटुंब व्यवस्था जास्त सशक्त होती. अगदी एकाच खोलीत बसलेले असूनही आज प्रत्येक जण स्वत:चा मोबाईल हातात घेऊन बसलेला असतो. दुसऱ्यांना संदेश पाठवण्यात किंवा वाचण्यात, पाहण्यात गर्क असतो. अतिजास्त स्क्रीन टाईम वाढल्यामुळे म्हणजे लॅपटॉप, डेस्कटॉप, टीव्ही, टॅब किंवा मोबाईल या गॅजेट्सच्या स्क्रीनकडे सतत पाहण्यामुळे खालील मानसिक, शारीरिक व सामाजिक समस्या तयार होतात.

१. मेंदू अतिजास्त उत्तेजित अवस्थेत जास्त वेळ राहिल्यामुळे मेंदू आणि पूर्ण शरीरावर, मनावर तणाव वाढतो.

२. झोपेची गुणवत्ता व प्रमाण खालावते. मेंदूवर अतिताण वाढून झटके येतात व ब्रेन अटॅक येऊन मुलांचा मृत्यूसुद्धा होतो.

३. मनाची एकाग्रता शक्ती, स्मरणशक्ती, धारणाशक्ती, समस्या निराकरण शक्ती, कल्पनाशक्ती कमी होऊन अभ्यासात अपयश व निराशेत वाढ होते. मोबाईलच्या रेडिएशनमुळे शरीराची वाढ खुंटते. प्रजननशक्ती कमी होते.

४. सतत वेगात हलणारी चित्रे व व्हिडीओ स्क्रीनवर पाहण्याची सवय मनाला लागल्यामुळे प्रत्यक्ष जीवनातील प्रसंग व शिक्षकांचे शिकवणे खूपच कंटाळवाणे वाटू लागते व मोबाईलचे व्यसन लागते. याशिवाय आपल्या अनुपस्थितीत फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअ‍ॅप, एक्स वगैरे ग्रुपवर काही महत्त्वाचा(?) मेसेज किंवा चॅट आपण मिस तर नाही केला ना? या भावनेतून असुरक्षितता वाढून लोकांना 'फोमो' म्हणजेच 'फियर ऑफ मिसिंग आऊट' हा मानसिक रोग होतो व मोबाईल-सोशल मीडियाचे व्यसन अजून वाढत जाते.

५. सातत्याने मेंदू व मज्जासंस्था तणावात राहिल्यामुळे भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी होऊन चिडचिड किंवा पटकन राग येण्याचे प्रमाण वाढते. इतके की, चांगला मोबाईल घेऊन दिला नाही किंवा मोबाईल वापरू दिला नाही म्हणून १२ ते २० वर्षे वयाच्या मुलांनी स्वत:च्या आईवडील किंवा जवळच्या व्यक्तीचा जीव घेतल्याची किंवा आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. दुर्दैवाने अशा गुन्ह्यांची संख्या वाढत चालली आहे.

६. आई, वडील, भावंडे सगळेच आपापल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्यामुळे कुटुंबाचा आपसातील संवाद हरवला आहे. त्यामुळे नात्यांची ओढ कमी होते. बेपर्वा वृत्ती व उर्मटपणा वाढतो. स्वभाव रागीट बनत जातो. याचा परिणाम स्वरूप सहनशीलता, कार्यातील समरसता, आपलेपणा कमी झाल्यामुळे पती-पत्नीतील दुरावा वाढून घरातील हिंसाचार व घटस्फोटाची संख्या वाढते. याच्याही पुढे एकल पालकत्व असणाऱ्या मुलांची संख्या वाढते आहे. घरात प्रेमळपणे लक्ष द्यायला कुणीच नाही. प्रकृती, खानपान, आराम, व्यायाम, संस्कृती याबद्दलची काळजी घेणारे कुणीच नाही. कारण एकतर दोन्ही पालक नोकरीवर किंवा एकच आई पालक व ती घरी नाही. आईशी किंवा पालकांशी ऑफिसातून बोलता यावे म्हणून कोवळ्या वयाच्या हातात सतत हातात स्मार्ट फोन दिला जातो!

७. अशा घरातील मुले शाळेत, महाविद्यालयात किंवा समाजात आक्रमक-हिंसक वृत्तीने वागल्यामुळे समाजातील इतर लोकांना त्याचा त्रास भोगावा लागतो. अनेकदा ज्या मुलांना हातात मोबाईल मिळत नाही त्यांना इतर बिघडलेली मुले किंवा मुली त्यांच्या मोबाईलवर सेक्स किंवा गुन्हेगारीचे आक्षेपार्ह व्हिडीओ दाखवतात किंवा पाठवतात. त्यामुळे कोवळ्या वयातील मुले चुकीच्या संगतीत अडकून स्वत:चे व इतरांचे आयुष्य खराब करतात. त्यांना अशा संगतीतून सिगारेट, सेक्स किंवा ड्रग्सचे व्यसन लागते. दुर्दैवाने अशा मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी मुलांच्या तक्रारी घेऊन अनेक पालक आमच्याकडे येतच असतात.

### शिकायचे काय? करायचे काय?

उत्तम आठवणी अमोल आहेत. बालपणीच्या किंवा आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या सोबत घालवलेल्या चांगल्या क्षणांच्या आठवणी आपल्याला कायम शक्ती व स्फूर्ती देतात. पुढे त्या व्यक्ती जरी देवाघरी गेल्यात तरी जुने संस्कार व आठवणी आपल्याला वर्तमान व भविष्यकाळात मार्गदर्शन करतात किंवा आपल्या मनावरील ताण हलका करतात. मुलांच्या आणि मोठ्यांच्या मनात अमूल्य व सकारात्मक आठवणी जोपासण्यासाठी खालील प्रसंग घडवून आणण्याची आज गरज आहे.

१) मुलांच्या सोबत जेवा. आपल्या ताटात अन्न पोहोचविण्यासाठी ऊन, पाउस, थंडीची पर्वा न करता शेतकरी किती मेहनत घेतात ते त्यांना पटवून द्या. तसेच ही भाजी हवी की ती हवी असे पर्याय न देता ताटात वाढलंय ते पूर्ण खायचेच आहे. ताटात उष्टे टाकायचे नाही हे पहा.

२) त्यांना कपडे व खोली स्वच्छ करायला सांगा.

३) हौसेने स्वयंपाक करायला शिकवा. जी मुले आईसोबत घरात मदत करतात किंवा स्वयंपाक करायला शिकतात ती कुटुंबाशी जास्त जुळलेली असतात, असे आढळले आहे. सुरुवातीला जरी मुलांनी कुरकूर केली तरी नंतर पुढच्या आयुष्यात मुले पालकांना धन्यवाद देतात. मात्र जे पालक मुलांचे अवाजवी लाड करतात त्या पालकांची मुले आयुष्यात कमजोर व घरात हट्टी असतात.

४) घरात आजी-आजोबा असतील तर त्यांच्याशी आदराने वागायला शिकवा. आजी-आजोबांशी गट्टी जमल्यामुळे मुलांचा बुद्ध्यांक वाढतो व आजी-आजोबांचे आरोग्य छान राहते. तुमचे बालपण, कुटुंबाचा इतिहास व विस्तार याबद्दल त्यांना सांगा. विविध खेळ, संगीत, नृत्य, विनोद यापैकी जमेल त्या पद्धतीने घरातील वातावरण छान खेळीमेळीच ठेवा.

५) त्यांना रोज मंदिरात न्या. संध्याकाळी देवाजवळ काही मिनिटे मुलांसोबत बसून दैनंदिन उपासना, साधनाबद्दल शिक्षण व आपल्या धर्माची व संस्कृतीची व्यवस्थित माहिती द्या. गीता पाठांतर, मनाचे श्लोक अशा स्पर्धांचे आयोजन करा.

६) दर आठवड्यात आपल्या शेजारच्या वेगवेगळ्या कुटुंबांना भेट देत चला. त्यांच्या घरच्या मंडळींची ओळख नसेल तर करून घ्या.

७) आपल्या सणांची व त्या मागच्या विज्ञानाची माहितीचा स्वत: नीट अभ्यास करून मुलांना शास्त्रोक्त पद्धतीने व उत्साहाने सण साजरे करायला शिकवा. सणांच्या काळात बाजारात कशी वर्दळ असते ते दाखवा. सगळ्या वस्तू स्वदेशी निवडा. अनेक लोक ग्राहकांना फसविण्यासाठी दुकानाची व हॉटेलांची नावे हिंदू ठेवतात. पैसे देण्यापूर्वी दुकानाचा क्यूआर कोड स्कॅन केल्यास दुकानाचा मालक कोण ते कळेल.

८) गीता, रामायण, महाभारत, चाणक्य सोबतच चित्रे असलेली गोष्टीची पुस्तके व आपल्या भारतीय स्वातंत्र्यवीरांची माहिती देणारी पुस्तके आणून त्यांना वाचनाची गोडी लावा.

९) अष्टांगयोग, सूर्यनमस्कार व व्यायामाची गोडी लावून स्वत:चे रक्षण करता येईल असे मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण द्या.

१०) वृक्षारोपण, संवर्धन व पर्यावरणाचे रक्षण करायला शिकवा. शक्य असल्यास घरीसुद्धा भाजीची लागवड करता येते.

(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## तुकोबाची वारी । अभंगात ।।

मनाच्या शेजारी । असावा एकांत ।।
येईन निवांत । नाम तुझे ।।१।।

आत्म्याशी संवाद । साधेल त्रीकाळ ।।
नाही ताळमेळ । संसारात ।।२।।

वाचाळाची वस्ती । साधनेस बाधा ।।
फुकाचाच सौदा । दांभिकाशी ।।३।।

आत्ममग्न होता । मौन लिपी कळे ।।
विरक्तीची फळे । नाथ दावी ।।४।।

समाधिस्थ ज्ञाना । प्रगटे अंतरी ।।
तुकोबाची वारी । अभंगात ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## महिमा हिंदुत्वाचा

आम्ही कधी न कापले
बाग कुणाचे केळीचे
आम्ही कधी न कापले
बाग कुणाचे पोळीचे मग,
का आम्ही शिकार झालो गोळीचे...?
केवळ आम्ही हिंदू आहोत म्हणून...?
की, आम्ही भारत वासी
माणूस आहोत म्हणून...?
भ्याड तुम्ही, पाठीत सुरा
खुपसणाऱ्याची जात तुमची माणूस
म्हणून जगण्याचा हक्क नाही तुमचा
चला रे आता धरा त्याला ओढा
यरातून दाखवा त्याला महिमा हिंदुत्वाचा !
दाखवा त्याला महिमा हिंदुत्वाचा !!

## अरण्यरुदन

आसवे ढाळू नकोस आता मी तुझी नच राहिले ऐकू येणार
नाही मजला कितीही मज तू बाहिले तुझे नि माझे किनारे
आता झालेत सख्या रे वेगळे दिसणार नाही कधी तुला
मी कितीही मज तू पाहिले अबोल झाली सतार माझी
संगीतसंगत संपली साथ देऊ शकणार नाही कितीही गीते तूं
गायिली कोंडुनि ये तुं कढत उमाळे वाट मोकळी करू नको
सांगू नको रे व्यथा जनासि किती दु:ख तू साहिले विसर
सख्या रे झाले गेले आवर तुझे तूं हुंदके अरण्यरुदन होईल
सारे कितीही अश्रू तूं वाहिले

रमेश ढाकुलकर

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# शेतकरी : संस्कृतीचा मूलस्रोत

भारतीय समाजमनाचा पहिला हुंकार म्हणजे प्राचीन काळातली हिरव्यागार अरण्यात वसलेली आपली चिमुकली खेडी. आपण असंही म्हणू शकतो, आपल्या सामाजिक जाणिवेचा पहिला आविष्कार आपण प्राचीन ग्राम संस्कृतीतून अनुभवला. पुरातत्त्व शास्त्राच्या चष्म्यातून बघायचं तर इ. स. पूर्व सहाव्या शतकात मेहरगड येथे आपल्याला या ग्राम संस्कृतीची चिमुकली पावलं दिसली. तेथील उत्खननात मृगया करणारा, रानावनातून अन्न गोळा करून आणणारा माणूस शेती आणि पशुपालनाकडे वळताना आढळतो. रानाच्या कुशीत खेड्यात विसावलेला दिसतो.

आपली ग्राम संस्कृती शेतातल्या भरड पायवाटेनेच आपल्यापर्यंत पोहोचली. ऋग्वेद काळात काही समुदाय एका जागी स्थिर राहून पशुसंवर्धन करीत असताना शेतीचाही प्रयोग करीत असल्याचे उल्लेख आहेत. ऋग्वेदातील प्रथम मंडळ सर्वात प्राचीन मंडळ समजले जाते. त्यातील ३८ व्या सूक्तात घौर नावाच्या ऋषींनी दुष्काळाची तीव्रता कमी व्हावी, अन्नधान्याची टंचाई होऊ नये म्हणून मरुताची आणि इंद्राची करुण आळवणी केली आहे. घौर ऋषींप्रमाणेच कण्व ऋषींच्या परंपरेतील २३ व्या सूक्ताच्या १५ व्या ऋचेत शेतीचा पहिल्यांदा उल्लेख केलेला दिसतो. 'गोभिर्यवं न च कृर्षृत' (१.२३.१५) 'बैलांच्या साहाय्याने यवासारखा (रानात आपोआप उगवलेल्या अन्नधान्यासारखा) धान्य प्रकार आम्ही उत्पन्न केला आहे.' याच पहिल्या मंडळात विखुरलेल्या मोत्यांच्या दाण्यांप्रमाणे शेतीचे उल्लेख आहेत. 'यवं न च कृषन वृषा' म्हणजे आम्ही बैलांच्या मदतीने यवासारखा धान्य प्रकार निर्माण केला किंवा वसिष्ठ कुळातल्या शक्तिपुत्र पराशरने म्हटल्याप्रमाणे 'यवो न पणर्वा' म्हणजे कापणीसाठी तयार झालेल्या यवासारखं, नैसर्गिकरीत्या उगवलेल्या धान्यासारखं हे पीक आहे. ऋग्वेदातले शेतीचे हे तीनही उल्लेख अतिशय बोलके आहेत. या ऋचांवरून असं दिसून येतं की, शेती हा व्यवसाय ऋग्वेद काळात निश्चितच होता. त्याही काळात सर्व प्रकारचे, सर्व वृत्तींचे लोक होते. त्यामध्ये जुगारी व व्यसनीही होते. एवढ्या प्राचीन काळात जुगाऱ्याला व्यावहारिक सल्ला देण्यात आलेला आहे की, ''जुगार सोड आणि शेती कर. शेतीमुळे पत्नी, संपत्ती आणि पशुधनही मिळते.'' या काळात शेतीची संपन्न अवस्था आपल्याला दिसून येते. सहा, आठ आणि कधी कधी तर बारा बैल नांगराला जोडल्याचे उल्लेख वेदिक वाङ्मयात आलेले आहेत. भगवान गौतम बुद्धानेही शेती हा महत्त्वाचा व्यवसाय असल्याचे सांगितले आहे. पाणिनीच्या 'अष्टाध्यायी'मध्ये लागवडीखालच्या जमिनीला क्षेत्र आणि केदार असं म्हटलेलं आहे. जमिनीचे मोजमाप आणि सर्व्हे क्षेत्रकार करायचे. क्षेत्र या शब्दावरूनच क्षेत्रफळ हा शब्द निर्माण झाला असावा. क्षेत्रावर किती बीजे पेरली जाऊ शकतात, यावरूनही जमिनीचे मोजमाप केले जायचे. 'तुझ्या नांगराला भाग्य लाभो.' असे तोंडभरून आशीर्वाद दिले जायचे. या आशीर्वादानेच समजतं की, नांगर समृद्धीचे प्रतीक होतं. घरात अनेक नांगर असणं ही प्रतिष्ठेची गोष्ट होती. बलराम खांद्यावर नांगर घेऊन फिरायचे म्हणूनच ते 'हलधर' होते. राजा जनक स्वतः शेती करायचे. नांगराची चोरी करणे हा फार मोठा अपराध होता. 'इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी'ने प्रकाशित केलेल्या 'हिस्टरी ऑफ टेक्नॉलॉजी इन इंडिया' या पुस्तकात शेती अवजारांचा इतिहास अतिशय बारकाईने टिपला आहे. वेदिक वाङ्मयात 'अभ्री' या जमीन खणण्याच्या अवजाराचा उल्लेख आहे. अभ्री आणि नांगर दोन्ही अवजारे वेगळी आहेत बरं. नांगराला 'सिरा' म्हणायचे.



औदुंबर किंवा खदिराच्या पवित्र खोडापासून सिरा बनवायचे. अमरकोष आणि कृषिपराशर वाङ्मयात नांगराचे तपशीलवार वर्णन केले आहे. इशा म्हणजे मुख्य लाकडी पट्टी, युग म्हणजे नांगराचा फाळ, निर्योला म्हणजे तुळई, निर्योलपासिका म्हणजे हँडल यासारखे अनेक शब्द प्राचीन नांगराचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर हुबेहूब उभे करतात. पाणिनीने शेतकऱ्यांचे तीन प्रकार सांगितले आहेत. अहली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे नांगर नाही, सुहली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे चांगले नांगर आहेत आणि शेतजमीनही सुपीक आहे. दुऱ्हली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे जुने नांगर आहेत. अथर्ववेदामध्ये शेतकऱ्यांना शिक्षण देण्यावर भर आहे. वार्ता विद्या शिकली की पीक चांगलं येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. 'अष्टाध्यायी'मध्ये व्रिही नावाच्या तांदळाला व्रैहेय आणि साळी जातीच्या तांदळाला साळिया म्हणायचे. हे तांदळाचे प्रकार आहेत, पण व्रिही तांदूळ म्हणजे प्रक्रिया न केलेले, टरफले न काढलेले आणि साळी तांदूळ म्हणजे स्वच्छ धुतलेले, स्वयंपाकासाठी योग्य असेही अर्थ निघतात. आजही साळीचे तांदूळ आपण बाजारात शोधत असतो आणि मिळाले की जग जिंकल्याचा आनंद होतो. कौटिल्यानेदेखील साळी, व्रिही तांदळाचा उल्लेख केला आहे. जातक कथांमध्ये वाराणसीजवळच्या कापसाच्या शेतीची रसभरीत वर्णने आहेत. पाणिनी हायन आणि षष्ठिका (ज्याला पिकण्यासाठी ६० दिवस लागतात) अशा तांदळाचे वर्णन करतो.

ग्रीक वाङ्मयात भारतातल्या दोन पिकांची वर्णने आहेत. हिवाळ्यात येणारे तांदूळ आणि कडधान्य आणि उन्हाळ्यातले गहू आणि बार्ली ही पिके. कौटिल्याच्या काळात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याला जपलं गेलं. खेड्यांना निर्मितीची स्वयंभू केंद्रे बनवली गेलीत. त्याच्या म्हणण्यानुसार, कोणतेही बाहेरचे व्यावसायिक मंडळ किंवा संस्था खेड्यात शिरकाव करणार नाही. फक्त स्थानिक हित जपलं जाईल. बाहेरच्या नृत्यांगना, गायक-गायिका, नट-नट्यांना खेड्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. कारण त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होऊ शकतो. प्राचीन काळातल्या खेड्यांची जडणघडण शेतीमुळे झाली. शेतीमुळे कधी त्यांची भरभराट झाली तर कधी दुष्काळामुळे खेडी ओस पडली. पूर, दुष्काळ, लुटारू, दरोडेखोर, रोगराई, पाणीटंचाई अशी अनेक कारणे होती; ज्यामुळे खेड्यातल्या शेतकऱ्यांना राहते घर सोडून जावे लागे. विनयपीटिकेमध्ये अमानुष ग्रामाचे वर्णन आहे. तेथे एकही माणूस राहात नव्हता. संपूर्ण खेडे यक्ष-यक्षिणींनी व्यापले होते. अलेक्झांडर राजाच्या सतत बरोबर असणारा ॲरिस्टोबुलस या अधिकाऱ्याने लिहून ठेवले आहे की, एकेकाळी दाट वस्ती असणारी हजारो खेडी त्याने भग्नावस्थेत बघितली आहेत. प्राचीन वाङ्मयात अंगुलिमाला डाकूच्या भीतीने हजारो खेडी ओस झाली, अशी वर्णने आहेत. शेतकऱ्याची आपल्या जमिनीवर माया असते.

जमिनीला तो आपले सर्वस्व मानतो. प्राचीन वाङ्मयात खेडी ओस पडल्याची हजारो उदाहरणे दिली आहेत. पण स्वतःचं राहतं घर, शेती सोडल्यावर त्या शेतकऱ्याची झालेली ससेहोलपट, त्याने भोगलेल्या यातना, त्याने जिद्दीने केलेला पुढचा प्रवास याबद्दल मात्र इतिहास मूकपणे अश्रू ढाळत उभा आहे. कदाचित शेजारच्या खेड्यांनी त्यांना आसरा दिला असेल. कदाचित त्यांचे गुलाम बनूनही त्यांनी त्यांच्या शेतात नांगरणी केली असेल. त्यांची जगण्याची केविलवाणी धडपड काळाच्या आवरणाखाली चिरडल्या गेली असेल आणि त्याच राखेतून कदाचित संस्कृतीचे इवलुसे रोप वर येऊन आज आपल्याकडे टकमक पाहत असेल. काळाची गुपिते काळालाच माहीत! परिस्थिती पालटल्यावर शेतकरी त्यांच्या मूळ खेड्याकडे परत येण्याचा प्रयत्न करीत असतीलही. जमीन आपल्या लेकराला स्वत:जवळ अक्षरशः ओढते म्हणतात.

मोहेंजोदारोच्या उत्खननात एक आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली होती. प्रचंड पूर आल्यामुळे सात वेळेस लोकांनी त्यांचे मूळ वस्तिस्थान सोडले आणि पूर नियंत्रणात आल्यावर सातही वेळेस ते परत आपल्या मूळ जागेवर परत आले. माणूस नावाचा प्राणी खरोखरीच अगम्य आहे. प्राचीन काळात शेतजमिनी तयार करण्यासाठी घनदाट जंगल नष्ट करावे लागत असे.

महाभारत काळात यामुळेच जनपदे अस्तित्वात आली. त्यांचे रूपांतर नंतर महाजनपदांत आणि कालांतराने राज्यांमध्ये झाले. लोखंडाच्या शोधामुळे नांगर, कुऱ्हाड ही हत्यारे शेतकऱ्यांच्या हातात आली आणि धनधान्याने कोठारे गजबजली. नांगर-कुऱ्हाडीमुळे शेतीमध्ये क्रांतिकारी बदल झाले हे मान्य; पण खरी लक्षणीय क्रांती तोड आणि जाळ पद्धतीने (स्लॅश अँड बर्न मेथड) झाली. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना विस्तीर्ण जमिनी नांगरण्यासाठी मिळाल्या आणि संपूर्ण राज्याला पुरेल एवढे धान्य कोठारांमध्ये साठू लागले.

प्राचीन इतिहास संशोधक ए. घोष म्हणतात की, प्राचीन काळात सगळीकडे घनदाट जंगलच होते. शेतीसाठी जमीन काही भागाला आग लावून तोड आणि जाळ पद्धतीने झाली. यामुळेच प्राचीन अर्थकारणामध्ये खरी क्रांती आली. अरण्याच्या कुशीत खेडी जन्माला आली. शेतकरी विस्तीर्ण शेतीची नांगरणी करू लागले. महाभारतातल्या कृष्णार्जुनाच्या खांडव वन दाहचे हे खरे रहस्य आहे. खांडव वन दाहातल्या प्रलयाला समाजशास्त्रीय चष्म्यातून बघितले तर असे लक्षात येते की, महाभारत काळात राज्य ही संकल्पना मूळ धरू पाहत होती. शेती करण्यासाठी आणि खेडी वसविण्यासाठी अरण्ये जाळण्याचा तेव्हा प्रघात असावा. भटक्या टोळ्या कमी झाल्या होत्या. शेती करणारे लोक एका जागी स्थिरावत होते. अथर्ववेदात म्हटलेलं आहे की, जो जमीन कसतो तोच खरा शेतकरी आहे. ऋग्वेदात म्हटलेलं आहे, क्षेत्रपती म्हणजेच शेतकऱ्याशी आमचा संबंध आला तर आम्ही कायम विजयी होऊ. त्यांच्या ऋणात राहू. आयुष्यात नेहमी आनंदी राहू. शेती करणे म्हणजे यज्ञ करणे. जमीन कसणारा शेतकरीच फक्त भूपती होऊ शकतो. त्याने पिकवलेलं अन्न हे पूर्णब्रह्म आहे. आपल्या संस्कृतीत जेवण झाल्यावर तृप्तीने म्हटलं जातं; 'अन्नदाता सुखी भव!' आद्य शेतकऱ्याने जमिनीची मशागत केली. धनधान्याचा मळा फुलवला. खेडी वसवली. मनुष्यवंशाची वृद्धी केली. तो आहे म्हणून आज आपण आहोत. म्हणूनच त्याच्या सुखातच आपलं सुख दडलेलं आहे. 'शेतकरी सुखी तर जग सुखी हेच खरं!'

# वैशाखाच्याही अंतरंगी असतात ओलाव्याचे क्षण

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

आमच्या बालपणी मात्र वैशाखात ओलावा जाणवावा एवढा याचा आणि नात्यांचा साठा प्रत्येकाच्या ओंजळीतून ओसांडून वाहत असे. बहिण आणि भाचे येणार म्हणून झाडावरच आंब्याचा सौदा करून उतरलेला आंबा गवतामध्ये पिकू घालणारा मामा खरोखरच मातृकुळातील कर्तृत्ववान आणि मायाळू नायक असायचा. परिस्थिती आपल्या ऐपतीप्रमाणे बहिणीची चोळी बांगडी करायला तो बांधील असायचा असे नव्हे पण त्याला मिळणाऱ्या अतीव समाधानाचे ते एक कारण असायचे.

पाहता पाहता मामाचे पत्र हरवले, मामाच्या गावाला जाणारी गाडी हरवली, सुगरण असणारी मामाची बायको केवळ स्वतः खोप्यापुरता विचार करायला शिकली आणि आता अनेक माहेरवाशीनी वैशाखातल्या दुपारी माहेरच्या उन्हाळ्याची आठवण काढून सासरच्या उन्हाळ्यात रणरण जळत असतात. मात्र उन्हाची भट्टी पेटवलेला वैशाख त्यांच्या मनातील कढ आसवांचा रूपाने डोळ्यात जमा होता क्षणी आटवून टाकतो, सुकवून टाकतो. आणि माहेरच्या आठवणी व्याकुळ झालेल्या त्या माहेरवाशीनीला, का उतरला बाई चेहरा तुझा? असे कोणी विचारलेच म्हणून झालेल्या चेहऱ्याचे खापर ती आरशासारख्या स्वच्छ आणि चकचकीत उन्हावर फोडून मोकळी होते. नव्यानवतीच्या काही माहेरवाशीने मात्र अजूनही गाव खेड्यात परततात. ज्या देवळाच्या पारावर परकर पोलक्यात नाचल्या, खेळल्या बागडल्या त्याच देवळाच्या गाभार्यात (जर त्या देवाला स्त्रियांचा प्रवेश मान्य असेल तर) पोक्तपणाच्या खाणाखुणा घेऊन स्वतःच संसार सुख मागतात आणि मंदिराला प्रदक्षिणा मारत असतांना उगाच हळवेपण जागे करणाऱ्या अल्लड सावल्या आठवल्या की त्यांचेही डोळे पाणावतात मन उगाच विसरलेल्या आठवणींना साद घालू लागते. प्रदक्षिणा पूर्ण होते तेव्हा एखादेवेळी मनाच्या कोपऱ्यातली हळवी सावली साकार होऊन मंदिराच्या पारावर बसलेली असते. बिंबाची आणि प्रतिबिंबाची ओळख लगेच पटते. मात्र किंचित नजरा नजर होताच तिची नजर आपसूक दिशा बदलते. अल्लड वयातील निरागस भातुकली पोक्तपणात अनोळखी होऊन जाते. आणि मग त्या दिवसापासून तिला वैशाखातल ऊन सहन होईनास होत आणि महिनाभराच्या बोलीने आलेली माहेरवाशीण चौथ्या पाचव्या दिवशी माहेरघर सोडून स्वतःच्या संसार विश्वाकडे निघते. मग ती लवकर मग ती लवकर मग ती लवकर माहेराच्या दिशेने निघत नाही अगदी वैशाखातले उन्हासारखे, एकदा चढले की लवकर उतरायचे नाही असे काहीसे! मग वैशाखच्या उन्हाच्या नाकावर टीच्चून ह्या बाया काही कामे काढतात, कधी एकमेकांच्या घरी पापड लाटतात, आज सांडया, उद्या खारोड्या, परवा कोरुडे, कधी तीळाची तर कधी बाजरीची नवलाई सांगत त्यांचे हे कार्य सुरू असते. खरे म्हणजे गहू भिजत घालावे तसे सारे आयुष्य भारतातील स्त्री वर्गाने भिजू घातलेले असते, सडलेल्या गव्हाप्रमाणे आपल्या सर्व इच्छा आकांक्षा त्यांनी मुरु घातलेल्या असतात, पाण्यात भिजलेल्या सडलेल्या गव्हातून जसा पांढरा शुभ्र चीक बाहेर काढावा तशा त्यांच्या सुखाच्या परिकल्पना मनामध्ये आकार घेत असतात. पुन्हा पुन्हामध्ये वाळून कुरकुरीत व्हावे तसे आयुष्य दुःखाच्या उन्हामध्ये वाळून कुरकुरीत झालले असत असो काहीसा संदर्भ मला एका मारवाडी आजीने तिच्या भाषेत समजून सांगितला होता. तिची ती प्रतिभा कल्पनाशक्ती आणि वैचारिक पातळी माझ्या तेव्हा लक्षात आले नाही, मात्र आज तो प्रसंग आणि ती आजी आठवली की सृजनशक्तीची पहिली वारसदार स्त्री का आहे? याचे वेगळे उत्तर शोधावे लागत नाही.



> कधीकाळी उन्हाळ्याची सुट्टी लागली म्हणजे वैशाखात मामाच्या गावाकडे धुरांच्या रेषा हवेत काढणार्या गाडीचा प्रवास सुरू होत असे. पुढे या प्रवासाची दिशा मामाच्या गावाकडून पर्यटन स्थळाकडे कधी आणि कशामुळे वळली हे सांगत बसले म्हणजे वैशाखात नदी नाल्यांना आलेला कोरडेपणा परवडला पण नात्यात आलेला कोरडेपणा नाही असे म्हणण्याची वेळ येते.



चैत्रात पळसाचा भगवा केसरी साज झडून गेल्यावर हिरव्या गार पळसाच्या पानावर कुरडया तयार करणाऱ्या स्त्रिया आता कुठे सापडत नाही. मात्र प्लास्टिकच्या कापडावर कुरड्या अजूनही घातल्याचे दिसते. मात्र पळसाच्या पानावरच्या कुरडया जितक्या सहजतेने निघत आणि जितक्या चवदार लागत ती सहजता आणि चव प्लास्टिक वर झेपावताच गमावली आहे असे वाटते. कुरडया सारखे वाळवणाचे पदार्थ करत असताना कुणा एकीला गहू भिजवायला टाकताना दिसू नये, भिजलेले गहू पाटा वरवंट्यावर वाटण्याचे दिवस संपले आणि चक्कीवर ते काम होऊ लागले मात्र तरीही तो सगळा प्रकार त्या कुणा एका बिचारीला दिसू नये यासाठी घरधनीण आटोकाट प्रयत्न करत असते. तिने पाहिले की तिची नजर लागून तिचा पदार्थ बिघडतो असा काहीसा समज तिच्या मनात पक्का बसलेला असतो. अर्थात आपल्या हातातील पदार्थ बिघडला तर त्याचे खापर कुणावर तरी फोडता आले पाहिजे यासाठी त्यांनी तो एक सोयीचा पर्याय निवडून ठेवलेला असतो. काहीच सापडले नाही तर कधी वैशाखाचे ऊन कमी तापले किंवा वैशाखाची ऊन जास्त तापले असा आरोपही वैशाखाच्या उन्हावर करायला त्या मागेपुढे पाहत नाहीत. नाही म्हणायला वैशाखात एखादेवेळी वळीवाचा पाऊस ओलावा पेरण्यासाठी येतो पण त्याचे प्रमाण फारच कमी असते.

वैशाख येतो तो नेमका शाळेला सुट्टी घेऊन, म्हणजे दोन महिन्याचा निवांत असा विचार करून आम्ही परीक्षा झाल्यापासूनच या उन्हाळ्याची वाट पाहत असू. शासनाची सरसकट सर्वांना पास करण्याची योजना त्या काळात नसली तरी साधारणपणे परीक्षेत आपण उत्तीर्ण होणारच हा आत्मविश्वास असल्यामुळे जुनी पुस्तके अर्ध्या किमतीत, फार चांगली असतील तर पाऊण किमतीत विकून स्वतःसाठी पुढील वर्गाचे असेच पुस्तके मिळवून त्यांना कव्हर लावले की मराठीतील पाठांना गोष्टीसारखे वाचून काढायचे, हिंदीतील कथात्मक पाठही असेच वाचायचे. शक्य झाले तर इंग्रजीची एखादी गाईड मिळवून त्यातील इंग्रजी पाठाचे मराठीतील भाषांतर गोष्ट म्हणून वाचायचे. आणि हे गोष्टी सारखे सर्व वाचणे झाले की या तिन्ही विषयांचा पुन्हा कधीही अभ्यास करायचा नाही, हा आमच्या काळातील पायंडा. म्हणजे पुढे चालून थोड्याफार प्रमाणात कवी साहित्यिक म्हणून ओळख निर्माण झाल्यावर माझ्या मराठीच्या विषय शिक्षेकेने, काय रे बाबा तू मराठीत कविता बिविता कसा लिहायला लागलास? असा प्रश्न आवर्जून विचारला होता. तर परीक्षा झाल्यावर अभ्यासाचं देणं घेणं नसणारा, दिवसभर खेळायचं, चार दोन दिवस झालंच तर मामाच्या घरी जायचं, आंबे, रस, टरबूज खरबूज काकड्या यांची चंगळ करायची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सकाळी उशिरापर्यंत झोपायचे. असे बेत ठरवून महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण आणि शाळेचा निकाल ह्याची आम्ही वाट पाहायचो. सुट्टी लागल्यावर दोन-चार दिवस उन्हात खेळणे झाले की दिवस त्या मानाने लवकर संपत नाही हे लक्षात यायला लागायचे. सकाळी उशिरा उठावे तर सूर्य सकाळी उगवून सर्व जगाला कामाला लावायचा. अगदी सकाळी सहा पावणेसहाला सूर्य उगवला म्हणजे साडेसहानंतर अंथरूणात पडून राहिले तरी झोपेचे खोबरेच झालेले असते. असं चार दिवस हुंदडून झालं की पाचव्या सहाव्या दिवशी वाचनालयातील पुस्तकाशिवाय पर्याय नसायचा. नाही म्हणायला चित्रपटगृहात जाऊन आठ पंधरा दिवसात एखादा सिनेमा बघायला मिळायचा पण त्याचे पोस्टर घरच्या लोकांना आवडायला हवे. म्हणजे आम्हाला आवडायचा फायटिंग करणारा धर्मेंद्र पण घरचे दाखवत फुल कौटुंबिक असा माहेरची साडी... त्याकाळी शिकवणी वर्ग लावणे ही खास कमीपणाची बाब, त्यामुळे उन्हाळ्यात शिकवणी वर्ग लावणे वगैरे कोणाला माहीत नव्हते. बरे शिक्षकांचे आहे त्या पगारात भागत होते. त्यामुळे मुलांप्रमाणे आपल्यालाही उन्हाळ्याची सुट्टी असते असे समजून आमचे बहुतांश शिक्षक सुट्ट्यांचा मनमुराद उपभोग घ्यायचे. त्यामुळे एखाद्याने शिकवणी लावावी म्हटली तरी ती घेणारे कोणी सापडत नसे. हे अल्पसमाधानी, पैशाची हाव नसणारे आमचे शिक्षक वृंद आणि त्यांच्याच वयातील आमचे काही काका, मामा म्हणावे तर बापलोक शोभावे असे नातलग, आज आम्ही पन्नाशीत पोहोचलो तरी आमच्या समोर ताठ मानेने, ताठ कण्याने अगदी खंबीरपणे चालताना दिसतात आणि साधारणतः वयाच्या ८५ ते ९० च्या दरम्यान, आता कोणतीही इच्छा उरली नाही, सारा संसार सोन्याचा झाला असं म्हणत आमच्याशी गप्पा मारत असतात. ह्या अशा समाधानी लोकांना पाहून वैशाख असूनही फुलून आलेल्या गुलमोहराचे गुपित उलगडत जाते. चैत्रानंतर वैशाखापर्यंत ऊन हळूहळू चढत जाते मात्र एकदा ग्रीष्म माथ्यावर चढला की तो जेष्ठापर्यंत आपल्या खानाखुणा जिवंत ठेवतो. कधीकधी तर दुष्काळजन्य परिस्थितीत आषाढ श्रावणातही वैशाख रेंगाळतो आहे की काय? असे प्रश्नचिन्ह उभे राहते.

(पान ६ वर)

# युद्ध - सामरिक आणि राजनैतिक!

> भारतावर भयानक दहशतवादी हल्ले होऊनही केंद्रातील काँग्रेस सरकारने त्याविरोधात पाकिस्तानवर कारवाईचे धाडस दाखवले नाही. भारतावर जागतिक महासत्तांचा दबाव असल्याची सबब मनमोहन सिंग यांनी पुढे केली. पण, काँग्रेस सरकारवर जागतिक महासत्तांचा नव्हे, तर देशातील मुस्लीम मतपेढीचा दबाव होता, हे आज स्पष्ट झाले, अन्यथा मोदी सरकारने तीन-तीनदा पाकिस्तानवर लष्करी कारवाई करूनही कोणत्याच देशाने किंवा अमेरिकेनेही भारतावर दबावापोटी निर्बंध कसे लादले नाहीत?

वेधक
प्रतिनिधी

पहलगाममधील निरपराध हिंदू पर्यटकांच्या हत्याकांडाचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून जो दुबळा प्रतिकार होत आहे, हे पाहता या संघर्षाला 'युद्ध' म्हणणे ही अतिशयोक्ती होईल. भारताच्या सामर्थ्याचा विचार करता त्याच्यासाठी ही तर लुटुपुटूची लढाई आहे, असेच म्हणावे लागते. लुटुपुटूची असली, तरी भारत सरकारने त्यासाठी पूर्ण जय्यत तयारी केली आहे. ही तयारी केवळ सामरिक साहित्याची नव्हे, तर राजनैतिक डावपेचांचीही आहे. म्हणूनच भारताच्या जबरदस्त लष्करी हल्ल्यानंतर जगातील एकाही देशाने भारतावर टीका केलेली नाही किंवा ही कारवाई तत्काळ थांबविण्याचे आवाहन केलेले नाही. पाकिस्तान हा जगात पूर्णपणे एकाकी पडला आहे. हे कसे घडले?

आधुनिक काळात युद्ध हे केवळ रणभूमीवर खेळले जात नाही, तर ते विविध देशांच्या परराष्ट्र खात्यांमध्ये आणि विदेशी राजदूतांच्या कार्यालयांमध्येही खेळले जाते. त्याला 'राजनैतिक डावपेच' किंवा 'मुत्सद्देगिरी' म्हणतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अशा राजनैतिक डावपेचांमध्ये कसलेले योद्धे आहेत, हे आतापर्यंत अनेकदा सिद्ध झाले. त्यांच्या यशात त्यांचे प्रामाणिक हेतू आणि निखळ राष्ट्रप्रेम आहे, हे परदेशातील शासकांच्याही लक्षात आले. पाकिस्तानशी चार युद्धे खेळल्यावरही भारताने सिंधू पाणीवाटप करार स्थगित केला नव्हता. यावेळी मात्र भारताच्या सहनशक्तीचा अंत झाल्यामुळे त्याने हा करार स्थगित केला असून, झेलम आणि चिनाब नद्यांचे पाणी रोखून धरल्याने पाकिस्तानात खळबळ माजली.

भारतावर दहशतवादी हल्ले हे केवळ मोदी यांच्या काळातच झाले, असे नव्हे. पूर्वी संपुआच्या सरकारमध्ये तर दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला, तो आजवरचा सर्वांत भीषण हल्ला होता. पण, तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग सरकारने त्या हल्ल्यास प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानवर लष्करी कारवाई केली नव्हती. पाकिस्तान हा अण्वस्त्रसज्ज देश असल्याने त्यावर लष्करी कारवाई करून अणुयुद्धाचा धोका निर्माण करण्याविरोधात भारतावर जागतिक समुदायाचा दबाव आहे, अशी सबब त्यांनी दिली होती. पण, आजही त्या वस्तुस्थितीत काहीच फरक पडलेला नसताना मोदी यांनी तीन-तीनदा पाकिस्तानवर लष्करी हल्ले चढविलेच ना? त्यामुळे सिंग सरकारवर जागतिक समुदायाचा नव्हे, तर भारतातील अल्पसंख्याकांच्या मतपेढीचा दबाव होता, ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे.

मोदी यांना अमेरिकेनेच नव्हे, तर बहुसंख्य मुस्लीम देशांनीही पाठिंबा दिला. त्यामागे मोदी यांनी पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांचे सादर केलेले भरभक्कम पुरावे आहेत. सौदी अरेबिया असो की संयुक्त अरब अमिरात, या सर्व मुस्लीम देशांनी भारताविरोधात एक शब्दही काढलेला नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी या कारवाईच्या दोन दिवस आधी मोदी यांना फोन करून त्यांना हवा तो निर्णय घेण्यास पाठिंबा दिला होता. मोदी यांना जगभरातून मिळालेल्या या व्यापक पाठिंब्यामागे त्यांची ही मुत्सद्देगिरी आहे. मोदी परदेशात भटकतात, असा आरोप करणाऱ्या विरोधकांना त्या 'भटकण्या'मागील खरा हेतू अजूनही उमगलेला नाही. मोदी यांनी अनेक देशांशी सलोख्याचे संबंध राखले आहेत.

अनेक देशांना त्यांनी त्यांच्या संकटकाळात सढळ हस्ते मदत केली. तुर्कीयने आता आपली एक युद्धनौका पाकिस्तानात आणून उभी केली. पण, दोन वर्षांपूर्वी सीरिया, तुर्कीय या देशांमध्ये झालेल्या भीषण भूकंपानंतर सर्वप्रथम भारतानेच तुर्कीयेला मदत पाठविली होती. यावरून त्या देशाच्या शासनकर्त्यांची मानसिकता दिसून येते. काही वर्षांपूर्वी आलेल्या 'कोविड'च्या साथीत तर भारताने अनेक देशांना औषध आणि लसपुरवठा करून वाचविले होते. त्यात काही विकसित देशांचाही समावेश आहे. हे सारे करताना मोदी यांचा उद्देश स्पष्ट होता. परराष्ट्र धोरणात भारताने 'वसुधैव कुटुम्बकम्' हे तत्त्व स्वीकारले. भारतात झालेल्या 'जी २०' देशांच्या बैठकीचीही तीच मध्यवर्ती संकल्पना होती. मोदी यांनी पाकिस्तानकडून दहशतवादाला पोसण्याचे भरभक्कम पुरावे संयुक्त राष्ट्रांना आणि अन्य देशांनाही सादर केले होते. त्यामुळे जागतिक मत पाकिस्तानच्या विरोधात गेले.


आज पाकिस्तान सार्या जगात एकाकी पडला, त्यामागे मोदी सरकारचे हे राजनैतिक प्रयत्नच कारणीभूत आहेत. भारताच्या निरपेक्ष आणि सात्विक हेतूंबद्दल जगाची खात्री आहे. पाकिस्तानला धडा शिकविण्यास भौगोलिकदृष्ट्या भारतच सक्षम आहे, हे जगालाही शतप्रतिशत पटलेले. भारत आपल्या सामर्थ्याचा वापर पाकिस्तानी भूमी बळकाविण्यासाठी किंवा त्या देशाला नष्ट करण्यासाठी करणार नाही, याचीही खात्री जगाला आहे. म्हणूनच भारताकडे शक्तिशाली अण्वस्त्रे असतानाही पाकिस्तानवर सलग दोन दिवस केलेल्या लष्करी हल्ल्यांनंतरही जग शांत आहे. पाकिस्तान हा अण्वस्त्रसज्ज देश आहे, त्या देशात लष्करशहांची हुकुमशाही आहे आणि हे लष्कर रोग म्हणजे कुटिल प्रवृत्तीचे आहे, हे सारे ठाऊक असूनही मोदी यांनी पाकिस्तानवर बेधडक लष्करी कारवाई केली. केवळ नियंत्रण रेषाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय सरहद्द ओलांडून पाकिस्तानच्या मुख्य भूमीवरही हल्ले केले. इतके होऊनही कोणत्याच देशाने भारतावर ना टीका केली, ना त्याला आपल्या लष्करी कारवाईवर नियंत्रण आणण्याचे आवाहन केले. भारतही अण्वस्त्रसज्ज देश आहे. तरी भारताकडून या शक्तीचा वापर प्रथम केला जाणार नाही, याचा विश्वास जागतिक समुदायाला होता. हे यश मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या राजनैतिक डावपेचांचेच!



> खरं सांगायचं तर, कृष्णाविषयी असलेल्या माझी कुतुहलाची तृष्णा कधी भागलीच नव्हती. आजवर कृष्णाविषयी मिळेल ते वाचत गेले, परंतु तो पुरता कधी आकळलाच नव्हता. मैत्रेय स्वामीजींनी लिहिलेली सहाशे बहात्तर पानांची 'कृष्णमनोगत' ही महा कादंबरी हातात आली. जणू एका तहानलेल्या माणसासमोर काठोकाठ भरून ठेवलेला घटच होता. मी त्या घटातलं पाणी अधाशासारखं घटाघटा पिऊन कधी संपवलं ते कळलंच नाही. ही प्रदीर्घ कादंबरी नुकतीच वाचून संपवली. साक्षात कृष्णाच्या सोबत इतक्या दिवसापासून असलेला सहवास संपुष्टात आला आणि एक अनामिक हुरहूर माझ्या मनाला लागून राहिली होती. कृष्ण सहवास कधीच संपत नसतो. तो मनामनात व्यापून राहतो हे आताशी जाणवायला लागले आहे त्याचे श्रेय या कादंबरीला आहे.

# कृष्णमनोगतः भावस्पर्शी कादंबरी

पुस्तक परिक्षण
सुलेखा जक्कल
भ्र. ९२७०० ६४७२९




महाभारताचं युद्ध सुरू असताना संजय दूरचित्रवाणीवर पाहून धृतराष्ट्राला तटस्थपणे चतुर्वेसत्यम घटनाक्रम सांगत होता. इथे कृष्ण मनोगत या कादंबरीच्या माध्यमातून मैत्रेय स्वामीजी आपल्याला थेट कृष्णाची गाठ घालून देतात. त्यानंतर वाचक आणि कृष्ण दोघेच उरतात. कृष्ण आपला जीवनपट उलगडून सांगत असतो. साक्षात कृष्ण आपल्याला त्याच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तिची भेट घडवून देतो आणि प्रत्येक प्रसंगात आपण दर्शक म्हणून एका कोपऱ्यात राहून सगळं बघत असतो आणि ऐकत असतो. पुस्तकाचे लेखक स्वामीजी मात्र कुठेच दिसत नाहीत. लेखकाचे स्वतःचे असे कुठलेही कसलेही भाष्य नाही. लेखक आहेत हे जाणवण्यासाठी अधूनमधून कृष्णाच्या संवादातील काही वाक्ये मात्र ठळक अक्षरात उमटवत जातात एवढेच.

विराटरूप कृष्ण व्यक्तिरेखेची व्याप्तीच इतकी अगाध आणि असीम आहे की तो एका कादंबरीत मावणारच नाही. कितीही लिहिले तरी तो अगम्य, गूढ, घननीळा, लडिवाळ कृष्ण अंगुळभर उरतोच. परंतु मैत्रेय स्वामीजींनी मात्र ह्या भावस्पर्शी कादंबरीत मात्र सारं काही एकवटण्याचा ठायी ठायी प्रयत्न केलेला दिसून येतो. कृष्ण कन्हैयाचा जन्मापासूनच सुरू झालेला चित्तथरारक, रोमहर्षक प्रवास आपल्या समोर उलगडत जातो, गोकुळातील विविध प्रसंग, कौरव पांडवात समेट घडवून आणण्यासाठी त्याची मध्यस्थाची भूमिका, महाभारतातील युद्ध प्रसंग, अर्जुनाला सांगितलेली भगवद्गीता, अखेरच्या प्रवासात उद्धवाला सांगितलेली गीता असे कित्येक प्रसंग आपल्यासमोर जिवंत उभे करण्यात स्वामीजी पूर्णपणे यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल. कृष्णाची भाष्य जीवनसूत्रे, त्याने सांगितलेला कर्मयोग, कर्ताभाव समर्पण, परमात्म्याला जाणण्यासाठी आवश्यक असणारे प्रेम, भक्ती आणि ध्यानमार्गाचे मार्गदर्शन, सहज योगाचे सखोल दिशादर्शन ते अतिशय सहजतेने कुठलाही धीरगंभीर आव न आणता आपल्यापुढे मांडत जातात. शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहांची अखेर...

युद्धातील रक्तरंजित हानी... चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यूची शौर्य गाथा, अर्जुन आणि जयद्रथ यांच्यातील युद्ध, शेवटच्या श्वासापर्यंत दुर्योधनाशी असलेला मैत्र जपणारा दानवीर शूर कर्ण, हे सारे काही प्रसंग आपल्या नजरेसमोर घडत आहेत असे वाटण्याइतके जिवंत उभे झालेले आहेत. कर्ण, अर्जुन, दुर्योधन, पितामह भीष्म, गुरु द्रोण, अश्वत्थामा, द्रौपदी, माता कुंती ह्या सगळ्याच व्यक्तिरेखा आपल्याला भेटतात आणि आपली व्यथा सांगतात. त्यांची सुखदुःखे काळजाला भिडतात. स्वामीजींनीया कादंबरीत प्रत्येक व्यक्तिरेखेला उचित न्याय दिला आहे. मी लहानपणी कॅलिडोस्कोपच्या नळीत एखादा काचेचा तुकडा टाकून ती नळी हळूहळू फिरवत रंग आणि आकार सतत बदलत असताना निरनिराळी जटिल प्रतिबिंबे पाहताना हरखून जायचे. इथेही कृष्ण तोच, परंतु त्याचा जीवनपट पाहताना सतत बदलत जाणारी अनेक विविधरंगी व्यक्तिमत्वांची प्रतिबिंबं ह्या पुस्तकातून आपल्या नजरेसमोर फिरत असतात. कृष्णाचे प्रत्येकाशी स्नेहबंध वेगळे असले तरी तेवढेच मनमोहक आणि वेधक वाटणारे आहेत. किंबहुना कृष्णाच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तिरेखेला कृष्णामुळेच महत्व लाभले असे म्हणता येईल. कृष्ण आणि बलराम, कृष्ण आणि सुदामा, कृष्ण आणि अर्जुन, कृष्ण आणि कर्ण, कृष्ण आणि सखी द्रौपदी, कृष्ण आणि रुक्मिणी, कृष्ण आणि राधा, कृष्ण आणि उद्धव अशा अनेकांशी कृष्णाचे स्नेहबंधच इतके उत्कट होते की त्यातील कृष्ण हे नाव आपण विलग करूच शकत नाही. किंबहुना त्यांचे कृष्णाशी असलेल्या स्नेहबंधामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वांना एक वेगळीच झळाळी लाभली आहे, हे या कादंबरीतील विविध प्रसंग वाचताना प्रकर्षाने जाणवत राहते.

आजवर भगवद्गीतेवर अनेक भाष्य ग्रंथ लिहिली गेली आहेत. मला या कादंबरीतील अखेरचे उद्धव पर्व मात्र फारच लोभसवाणे वाटले. उद्धवाच्या असंख्य प्रश्नांना योगेश्वर कृष्णांनी दिलेली सहज सोपी उत्तरे पाहून अचंबित व्हायला होते. कृष्णाच्या जीवनाचं सुंदर, वेधक आणि देखणं रूप आणि कृष्णाची समग्र जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आपल्याला पानोपानी जाणवत राहते. भगवद्गीतेत कृष्णाने सांगितलेली गहन, गंभीर वचने स्वामीजी मात्र वाचकांसमोर अतिशय हळुवारपणे सहज सुंदर, मनभावन शब्दांतून मांडत जातात, त्यातूनच सिद्धहस्त लेखणीचा प्रत्यय जाणवायला लागतो. कृष्णाचे मृदू तसेच प्रसंगी न्यायासाठी लढताना कठोर होणारे स्वभावविशेष, सत्याचा जय होण्यासाठी वेळप्रसंगी तत्वांना मुरड घालणारा कृष्ण, इतरांच्या सुखदुःखात समरस होणारा, प्रत्येकाची बाजू, मनोव्यथा आत्मीयतेने समजून घेणारा, अनुकूल आणि प्रतिकूल निर्णयांचा समान सन्मान करणारा, अनेक मान मिरविणारा, अनेक अपमान रिचवणारा असा कृष्ण आणि त्या युगंधर कृष्णाचे वास्तवदर्शी विविध पैलूंचे सूक्ष्म चित्रण करताना लेखकाच्या भावकोमल लेखनशैलीचा खरा कस लागतो.

अंतिम समयी जेव्हा कृष्णाच्या पायात जराकडून विषारी बाण रुततो आणि विष हळूहळू भिनत जाते, त्या क्षणीही उद्धवाच्या शंकांचे निरसन करतो. अतिशय शांतपणे, स्थिर चित्ताने मृत्यूचा अनुभव घेत, त्या क्षणाचासुद्धा महोत्सव करणारा आणि ज्या सहजतेने तो अंतिम क्षणी मृत्यूला आलिंगन देतो. तो योगेश्वर अलौकिकच. आपल्या मृत्यूनंतर, कुणाकडूनही कसलाही त्रास होणार नाही याची काळजी घेणारा विशाल हृदयी कृष्ण जाता जाता क्षमाशीलतेचं संस्कार भिनवत जातो, हे सारं मुळातूनच वाचायला हवे.

(पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर

# ‘शुद्ध ज्याचा भाव झाला, दुरी नाही देव त्याला ।’

वैशाख महिना लागला की, तीव्रतेने आठवण येते ती माय मुक्ताबाईची. विचलित आणि विषण्ण मनाला शांत करणाऱ्या आणि योग्य मार्गावर आणणाऱ्या तिच्या ताटीच्या अभंगांची! मन विचलित होण्याचे, संभ्रम निर्माण होण्याचे, अवसान गळून पडण्याचे, किंकर्तव्यमूढ होण्याचे, दिशाहीन होण्याचे असे अनेक प्रसंग व्यक्तीच्या आयुष्यात येत असतात. त्यावेळी त्याला, त्याच्या अंतरंगातील कौशल्याची जाणीव करून द्यावी लागते. त्याच्या आतील शक्तीची ओळख करून द्यावी लागते. संभ्रमावस्थेने किंवा अन्य कोणत्याही कारणाने व्यक्ती स्वतःचीच ओळख विसरते. त्याच्या आतील आत्मशक्तीचा त्याला विसर पडतो. तो दिशाहीन होतो. अशावेळी त्याला कुणीतरी सांभाळून घेणारे हवे असते. त्याला योग्य मार्ग दाखविणारे हवे असते. एकदा का त्याला, त्याच्या अस्तित्वाची आणि त्याच्या प्रयोजनाची जाणीव झाली की, अशी व्यक्ती महान कार्य करून जाते. असे दीपस्तंभ आणि मार्गदर्शक आज समाजात हवे आहेत.

प्रत्यक्ष महाबली हनुमंतालाही त्याच्या शक्तीची आठवण जाम्बुवंताने करून दिल्याची त्रेतायुगातील कथा आहे. युद्धापासून निवृत्त होण्याच्या मनःस्थितीत असलेल्या अर्जुनासारख्या महापराक्रमी धनुर्धराचा मोह नष्ट करून भगवान श्रीकृष्णाने त्याला, त्याच्या निहित कर्माची जाणीव करून दिली आणि युद्धप्रवृत्त केले ही कथा द्वापारयुगात आहे... जाम्बुवंताने हनुमंताला केलेल्या उपदेशाने रामायणाची दिशा बदलली. भगवंताने अर्जुनाला केलेल्या उपदेशाने महाभारताने वेगळेच वळण घेतले. अगदी तसेच संत मुक्ताबाईने करुणासागर ज्ञानदेवांना केलेल्या उपदेशाने महाराष्ट्राच्या भाग्याला उज्ज्वल वळण मिळाले. ही कथा कलियुगात घडलेली आहे ७०० वर्षांपूर्वी. गावात माधुकरी मागायला गेलेल्या ज्ञानोबांच्या झोळीत, गावातील विघ्नसंतोषी मंडळींनी शेणमाती कालविली. आपल्या झोळीत लोकांनी कालविलेल्या शेणमातीने तो शांतिब्रह्म योगीश्वर संतापून गेला, दुखावला. आपल्या झोपडीत जाऊन बसला. झोपडीची ताटी बंद केली. नदीवरून परतलेल्या मुक्ताईने ती बंद ताटी पहिली. ती ब्रह्मचित्कला आदिशक्ती होती. तिला परिस्थितीची कल्पना आली. तिने ज्ञानोबांची समजूत काढली. त्यांच्या अंगीकृत ईश्वरी कार्याची आठवण करून दिली. तेच ताटीचे अभंग! कुणाच्याही सुखाच्या झोळीत माती कालविण्याचे कसब असलेली मंडळी आजही समाजात विद्यमान आहेत. सर्वच क्षेत्रात असे लोक आजही आहेत. पण ज्यांच्या झोळीमध्ये आजही अशी विघ्नसंतोषी माती कालविली जाते, त्या प्रत्येकाच्या वाट्याला मुक्ताई येतेच असे नाही.

मायेचा अपरंपार ओलावा मनात साठवून, वाणीने मात्र अत्यंत परखड आणि यथातथ्य उपदेश करणे या वृत्तीलाच मुक्ताई म्हणतात. या वृत्तीला कोणत्याही व्यावहारिक लोभाची आस नसते. आपपरभावाच्या पल्याड गेलेली, नातेसंबंधांच्या पलीकडे पोचलेली ही माया असते.ज्ञानदेवांच्या भिक्षेच्या झोळीत तत्कालीन समाजकंटकांनी शेण आणि माती कालावल्याची कथा सांगितली जाते. ज्ञानदेव संतापून गेले. त्यांना वाईट वाटले आणि ते आपल्या झोपडीत येऊन बसले. रागावलेल्या ज्ञानमाउलीला मुक्ताईने हळुवारपणे समजावले. त्यांच्यातील योगसामर्थ्याची, संतत्वाची, एका यथार्थ अधिकाराने मुक्ताईने जाणीव करून दिली. ताटीचे अभंग हे त्याचे शब्दरूप आहे.

मुक्ताई, ज्ञानोबांना ते संत असल्याची जाणीव करून देतात. त्यांना त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून देतात. त्यांचे आत्मभान जागृत करतात. ताटीच्या अभंगांचा एकूण सूर जरी विनवणीचा असला, तरी त्यात आग्रह, आर्जव आणि ज्ञानाचा अधिकार आहे. मोठ्या भावाचा रुसवा दूर करणारी लडिवाळ बहीण असे जर या उपदेशाचे दृश्य रूप असेल, तर एका योगिनीने दुसऱ्या एका योगीश्वराला त्याच्या साधनेची आणि कर्तव्याची जाणीव करून देणे हे त्याचे अंतर्निहित रूप आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे यातून मुक्ताईने संत लक्षणे सांगितलेली आहेत... **“योगी पावन मनाचा। साही अपराध जनांचा।। विश्व रागे झाले वन्ही। संती सुखे व्हावे पाणी।। शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश ।। विश्व पट ब्रह्म दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।”** मुक्ताई ही सर्व भावंडात लहान आहे. निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपान यांची ती लहान बहीण आहे, असे म्हणण्यापेक्षा हे तिघे, तिचे मोठे भाऊ आहेत, असेच म्हणावे लागेल. तिचा अधिकार असामान्य होता. “ज्या सामान्य लोकांचा उद्धार करायला तुझा जन्म झाला आहे, त्यांचा राग कशाला करतोस?” असा प्रश्न विचारत ती ज्ञानोबांना म्हणते, “तुला जगाचा आणि जगायचा कंटाळा आला? असा विचार योग्य नाही. तुझी आजवरची साधना या जगाच्या उद्धारासाठीच कामी येणार आहे. आता तुला आलेला जगाचा राग त्यांच्याच कामी येणार. तुला कुणाशीही बोलावेसे वाटत नाही ना, मग नको बोलू की कुणाशी. स्वतःशी बोल. मग आपोआप सगळ्यांशी बोलायला लागशील. तू साक्षात ज्ञानाचा अवतार आहेस. ज्ञानच आमच्यावर रुसून बसले तर आम्ही जायचे कुठे?” **“संत तोचि जाणा जगी। दया क्षमा जायचे अंगी।। लोभ अहंता नये मना। जागी विरक्त तोचि जाणा।। इह परलोकी सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी।। मिथ्या कल्पना मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।”** ताटीच्या अभंगात मुक्ताई ही ज्ञानदेवांची लहान बहीण राहिलीच नाही. ती झाली होती त्यांची आई! तो संवाद केवळ दोन बहीण भावांचा नव्हता, तर नाथपंथातील दोन सिद्ध साधकांचा होता. परंपरेमध्ये प्रक्षेपक अभंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या ताटीच्या अभंगातून मुक्ताईने संपूर्ण योग उभा केलेला आहे. मुक्ताईने केलेला हा उपदेश म्हणजे एकप्रकारे भागवत धर्माची विचारपरंपराच आहे.



ज्ञानदेवांच्या हातून “सुखसागर आपण व्हावे। जग बोधे निववावे” या उक्तीला अनुसरून लोकोद्धार घडला. हे सुखसागर होणे सोपे नसते. त्याला आवश्यक असते सहनशीलता. ताटीच्या अभंगांच्या निमित्ताने मुक्ताईने ज्ञानोबांना ही सहनशीलता, ही सहनसिद्धी दिली, असे नाही का वाटत? आज समाजात आणि कुटुंबातही ही सहनशीलता नष्ट झालेली आहे. प्रत्येकच जण फक्त आणि फक्त स्वतःभोवतीच गरगरतो आहे. स्वार्थ हाच एकमेव परमार्थ झाला आहे. आपले भले व्हावे हे प्रत्येकालाच वाटते, पण त्याच सोबत इतरांचेही भले व्हावे, ही भावनाच नष्ट झालेली आहे.

अशा वेळी मुक्ताईचेच शब्द आठवतात **“एक आपण साधू झाले। येर कोण वाया गेले।। उठे विकार ब्रह्मी मूळ। अवघे मायेचे गबाळ।। तेथे कोणी शिकवावे। सार साधुनिया घ्यावे। लडिवाळ मुक्ताबाई। जीव मुद्दलाचे ठायी।। तुम्ही तरून विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।”** करुणेचा सागर असलेला तो शांतिब्रह्म योगीश्वरही संतापून जावा, अशी मंडळी त्या काळात होती. त्यांची वळवळणारी पिलावळ आजही समाजात आहे, फक्त नाही ती मुक्ताई! तिच्या उपदेशानेच माउलीच्या मनात करुणा जागृत झाली. स्वतःसोबत अवघ्या मानवजातीचे कल्याण करणारी ‘भावार्थदीपिका’ त्यांचा मुखातून प्रकट झाली. विश्वाचे आर्त प्रकट झाले. **“वरी भगवा झाला नामे। अंतरी वश्य केला कामे।। त्याला म्हणू नये साधू । जगी विटंबना बाधू।। आप आपण शोधूनि घ्यावे । विवेक नांदे त्याचा सवे।। आशा दंभ अवघे आवरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।”** शेवटी परमेश्वर भक्ती म्हणजे तरी काय? स्वतःचे अंतरंग शोधणे. प्रत्येकाच्या वाटा जन्मसिद्ध असतात. परंतु त्यात एक वाट नक्कीच देवाकडे जाण्याची असते. देवाकडे जाण्याची म्हणजे नेमकी कुठे? ही वाट असते आपल्याच अंतरंगात जाण्याची. आपलाच शोध घेण्याची. स्वतःचा शोध हाच परमेश्वराचा शोध. जो स्वतःला शोधतो तोच विवेकी असतो. कुठलीही अपेक्षा-आशा कुणाकडूनही ठेवू नका आणि अहंकार तर पूर्णतः विसर्जित करा, असा माउलीला उपदेश करणारी मुक्ताई म्हणजे केवळ त्या भावंडांचीच नव्हे तर संपूर्ण मानवजातीची प्रेरक शक्ती आहे. आपण आपलीच कठोर चिकित्सा करायला लागलो की, आपल्या जाणिवा स्पष्ट व्हायला लागतात. आपण कशासाठी जन्मलो याचे भान येते. आपले मन सर्वशक्ती समन्वित होते. म्हणून अस्थिर आणि चंचल मनाला समजावण्याचा उपदेश मुक्ताईने या ताटीच्या अभंगांच्या माध्यमातून केलेला आहे.

संपूर्ण विश्वाला तुम्हाला तारून न्यायचे आहे, असे मुक्ताई ठामपणे सांगते. माउलीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देते. तो क्षण मराठी जगताच्या आणि साहित्याच्या इतिहासातील सुवर्णक्षण आहे.भावार्थदीपिकेच्या म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या निर्मितीची बीजे या ताटीच्या अभंगांमध्ये आहेत, असे सहजपणे वाटून जाते.

महाराष्ट्राच्या मातीचा उद्धार करून गेली. याला कारण मुक्ताईचा उपदेश, तिचे द्रष्टेपण! मुक्ताईचे आयुष्य होतेच किती? आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १२०१ चा जन्म आणि वैशाख वद्य दशमी शके १२१९ हा समाधी दिन! लौकिक वय म्हणाल तर अवघे पावणेअठरा वर्षांचे आयुष्य. चांगदेवांना तिने केलेला उपदेश, संत नामदेवांचे केलेले अहंकारहरण, तापी नदीच्या तीरावर फुलविलेला भक्तीचा मळा असे अनेक प्रसंग तिच्या लौकिक आयुष्यात घडले. या प्रसंगांवर एकेक ग्रंथ लिहिता येईल. संत नामदेव लिहितात की, संत निवृत्तिनाथांनी तिला विचारले... **“निवृत्तीने एकांत केला मुक्ताईसी। गमन कोणे एके दिवशी आरंभिले।। मुक्ताई म्हणे जावे यावे कोठे। अवघे निघोट स्वरूप स्वामी ।। गर्जता गगन कडाडली वीज । स्वरूपी सहज मिळियेली।। मावळला दीप ज्योत कोठे होती । सहज सामाविती निरंजनी।।”** ऐन वैशाखाच्या जळत्या उन्हात, तापी तीराच्या वाळवंटावरील कोरड्याठण्ण आकाशात ढग दाटून आले. गडगडाट झाला. प्रचंड कडकडाटासह विजेचा चकाकता प्रचंड लोळ वाळवंटी आला आणि मुक्ताई त्यात विलीन झाली.

संत नामदेव लिहितात... **“कडाडली वीज निरंजनी जेव्हा। मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली।। वैकुंठी लक्षघंटा वाजती एक घाई। झाली मुक्ताबाई स्वरूपाकार।। नामा म्हणे देवा कैचे आता काही। आम्हा मुक्ताबाई बोलली नाही ।।”**

ललित

रश्मी वाघमारे

# तू त्याची सांगाती

‘इतनी शक्ती हमे दे ना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना...’ सुमधुर आवाजात उमा गात होती. सारं वातावरण भारावून गेलं होतं. विद्या मंदिर शाळेच्या वार्षिक उत्सवाचे आयोजन होते. ज्या माजी विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळविले त्यांचा आज सत्कार होता. उमाने मानसशास्त्रात सुवर्ण पदक मिळविले होते. रावसाहेब देशमुख यांनी सुरू केलेली विद्या मंदिर ही मुलींची एक आदर्श शाळा होती. परंतु आई-वडील गमावलेली एक अभागी मुलगी म्हणून सतत हेटाळणी. काका-काकूंनी नाईलाजाने आश्रित म्हणून सांभाळले, एक हक्काची मोलकरीण मिळाली जणू! ती हुशार असल्यामुळे शिकली, उत्तम गुणांमुळे शिष्यवृत्ती मिळवत पदवीधर झाली मानसशास्त्र विषय घेऊन. त्यानंतर बी.एड केले आणि तिथल्याच विद्या मंदिर या नामवंत शाळेत रुजू झाली.

रावसाहेब देशमुख या गावातील एक बडे प्रस्थ! त्यांनी त्यांच्या मुलासाठी महेशसाठी उमाचा हात मागितला. काका-काकूंना आनंद झाला. मोठ्या घरात उमाची सोयरीक होणार, गावात आपला दबदबा वाढणार. महेश पुण्याला होता शिकायला, त्यामुळे कुणाला फारसा माहीत नव्हताच. रावसाहेबांनी लग्नाची जरा घाईच केली. पण एक शंका तिच्या डोक्यात सारखी येत होती, महेश शिकलेला देखणा.. मग आपल्या सारख्या एका अनाथ मुलीमध्ये रावसाहेबांना असे काय दिसले की, त्यांनी घरी येऊन तिला एकदम मागणीच घातली. रावसाहेब देशमुख आणि त्यांची पत्नी सावित्री लगोलग तिला कुंकू लावायला आले, तेव्हा त्यांनी उमाला भरजरी पैठणी, सोन्याचे गळाभर दागिने आणि मोठमोठ्या भेटवस्तू देऊन काका-काकूंना अक्षरशः दिपवून टाकले. पुढच्या आठ दिवसात एका आटोपशीर समारंभात उमा रावसाहेब देशमुख यांची सून म्हणून गृहप्रवेश करती झाली.

सजवलेल्या वाड्यात गृहप्रवेशाचा देखणा समारंभ झाला. महेश पण आनंदी दिसत होता; मात्र त्याने तिच्याकडे सरळ असे एकदाही बघितले नाही. सावित्रीबाईंनी उमाला एक भले मोठे दालन दाखविले. त्या म्हणाल्या, “तुम्ही आपले सामान इथे ठेवा आणि आता आराम करा. ती विचार करू लागली. आठ दिवसात इतका बदल माझ्या आयुष्यात? गेले अनेक दिवस अव्याहत चाललेली दगदग, गडबड, गोंधळ आणि डोक्यात विचारचक्र, तिचा थकून डोळा लागला. जाग आली तेव्हा चक्क संध्याकाळ झाली होती. ती संकोचली आणि घाईघाईने जिना उतरून खाली आली. “...ते मला जरा.” चाचरत ती म्हणाली. “काही हरकत नाही सूनबाई, आम्हाला माहीत आहे तुम्ही खूप दमला आहात.” एक दमदार आवाज आला, रावसाहेब देशमुख यांचा! ती किंचित आश्वस्त झाली.

दुसऱ्या दिवशीची सकाळ, सुस्नात उमा सकाळी भल्या मोठ्या स्वयंपाकघरात गेली. तयार असलेला नाश्ता सर्वांना वाढला; “महेश, चल ये, तूही नाश्ता करायला” सावित्रीबाई म्हणाल्या. महेश खाली पाहात टेबलाजवळ आला. आपल्या प्लेटमधील पदार्थ खाऊ लागला. कोणीतरी त्याला मदत केली; मात्र त्याच्या चमच्यातला पदार्थ त्याच्या कपड्यांवर सांडला. त्याच्या मागे उभा असलेला एक गडी रुमालाने ते सगळं साफ करू लागला. तो अजिबातच उमाकडे बघत नव्हता. उमाच्या डोक्यात किंचित प्रकाश पडला आणि ती ताडकन उभी राहिली... ‘रावसाहेब...’ तिच्या तोंडून शब्द फुटेना. “हे काय? महेश नॉर्मल नाही काय?” ती मटकन तशीच खुर्चीवर बसली. “सूनबाई, आम्ही तुम्हाला मुद्दाम सांगितलं नव्हतं, महेश तसा चांगला आहे. पण तो आत्ममग्न आहे. तुमच्यामध्ये आम्हाला एक कर्तबगार मुलगी दिसली जी पुढे महेशला सावरून घेऊ शकेल म्हणून आम्ही हे घोर पाप केले तुम्हाला न सांगता.” दोघेही हात जोडून माफी मागू लागले. ती धावत धावत जिन्यावरून तिच्या दालनाकडे पळाली. हे सर्व रावसाहेबांना आणि सावित्रीबाईंना अपेक्षितच असावं. त्यांनी महेशला म्हटले, “जा, वर जाऊन त्यांची समजूत काढा.” महेश खाली मान घालून तिच्या दालनाकडे निघाला. ती उशीत डोकं खुपसून रडत होती. तिने मान उचलून पाहिले तेव्हा त्याने स्वतःच्या खिशातून एक रुमाल काढून दिला, आणि तिला ‘जाऊ नका, जाऊ नका’ असे एकच वाक्य दोन-तीनदा म्हणाला. त्याच्या डोळ्यातले आर्त भाव बघून तिचे मन हेलावले. पण आपले संपूर्ण आयुष्य कसे काढायचे या विचाराने तिचे डोके गरगरू लागले.

बराच वेळ ती तशीच पडून होती. डोळे उघडले तेव्हा पाहिलं महेश तिथेच बसून होता. तिच्या पायाजवळ! अरेरे!.. ती उठली आणि खाली आली. तोंडावर पाण्याचा शिपका मारला. सध्या तरी कोणताही विचार करायचा नाही असा तिच्या मनानं कौल दिला. असाच एक आठवडा गेला. त्याला तिच्याशी सलग संवाद करता येत नसे. रावसाहेबांनी आतापावेतो त्याच्यावर केलेल्या उपचारांची संपूर्ण कागदपत्रे तिला दाखवली. ती शाळेतून यायच्या ठरावीक वेळी महेश तिची वाट पाहत राही. त्याला त्याच्या भावना व्यक्त करता येत नसत; मात्र त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असे. दोन महिन्यांनी तो तिच्याकडे थोडेफार बघू लागला, किंचित हसू लागला. उमाने ठरवले जे काही शक्य आहे ते सारं काही करायचं, महेशसाठी! नियमित कौन्सिलिंगचे सेशन, त्यासाठी ती त्याला घेऊन मुंबईच्या एका मोठ्या सेंटर फॉर ऑटिस्टिकमध्ये गेली. तिथे अनेक प्रकारच्या नवीन चाचण्या झाल्या. ती शाळा, घर, जबाबदाऱ्या आणि महेशच्या उपचारांमध्ये गरगर फिरू लागली. महेशचे त्या विशिष्ट डिझाईनमधले ज्ञान अफाट होते. त्याचे अचूक ज्ञान, चिकाटी पाहून रावसाहेबांनी ठरवले त्याला एक छोटासा कारखाना काढून द्यायचा! बघता बघता एक वर्ष झालं! आता उमा आणि महेशमध्ये बऱ्यापैकी दोस्ती झाली होती. आज त्यांच्या लग्नाचा दुसरा वाढदिवस होता. महेश आता तिच्याकडे प्रेमभरल्या नजरेने पाहू लागला. त्याचा छोटासा कारखाना व्यवस्थित चालू लागला.

आज देशमुख परिवारासाठी आनंदाचा दिवस होता. महेशला ‘तरुण उद्योजक’ असे शासनाचे बक्षीस मिळणार होते. उमा-महेश आणि देशमुख परिवार दिल्लीला निघाले होते. महेश मोठ्या गर्दीतून पारितोषिक घेऊन पुढे आला आणि त्याने ते मेडल उमाच्या हातात दिले. उमाने त्याला प्रेमाने एका जोडीदाराला मारतात तशी मिठी मारली. रावसाहेब आणि सावित्रीबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. ते म्हणाले, “पोरी, तू जिंकलीस.

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

## शांतिनिकेतन ते विश्वभारती

(भाग ४५)

शिक्षण कसे असावे याबद्दल रवींद्रनाथांच्या स्वतःच्या काही कल्पना होत्या. त्यांना लहानपणी आलेला शाळेतील आलेला कटू अनुभव त्याच्या जोडीला होताच. शाळेत दिले जाणारे साचेबद्ध औपचारिक शिक्षण त्यांना आवडत नव्हते. हे शिक्षण मुलांचा बौद्धिक आणि भावनिक विकास करण्यास असमर्थ आहे अशी त्यांची भावना होती. शिवाय त्यांचा मुलगा रथींद्रनाथ याचे देखील शाळेत नाव दाखल करण्याचे वय झाले होते. आपल्याला अपेक्षित त्यालाही शिक्षण देता यावे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या चिंतनातून झालेला मानवता धर्माचा साक्षात्कार त्यांना समाजाची निष्काम सेवा करावी अशी प्रेरणा आतून देत होताच. या सगळ्या कारणांमुळे आपल्याला अपेक्षित असणारे उत्तम शिक्षण देणारी एखादी संस्था आपणच का निर्माण करू नये असे त्यांना वाटू लागले आणि त्यातूनच १९०१ मध्ये शांतिनिकेतनची स्थापना झाली.

प्राचीन गुरुकुल पद्धतीच्या धर्तीवर शिक्षण देणारी संस्था असे शांतिनिकेतनचे स्वरूप होते. हळूहळू या संस्थेची वाढ आणि विकास होऊ लागला. शांतिनिकेतनचा विकास होत असतानाच्या काळात रवींद्रनाथ परदेशात भारताचे सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून जात होते.

जगातील विविध देशात लोकांना भारतीय संस्कृतीचा परिचय करून देत होते. विदेशातील लोकांच्या हे लक्षात आले होते की एक व्यक्ती म्हणून नव्हे तर भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी या नात्याने रवींद्रनाथ आपल्याशी बोलत आहेत. ते केवळ भारताचा संदेश बाहेरच्या जगात पोहोचवण्याचे कार्य करीत नसून भारतीयांच्या गरजा परिणामकारकपणे मांडून जागृती करण्याचा प्रयत्न करत आहेत.



रवींद्रनाथांची जी व्याख्याने परदेशात होत होती, त्यामुळे त्यांना अफाट लोकप्रियता मिळत होती. त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होत होते. परंतु त्यांना या गोष्टीची जाणीव होती की आपल्यामार्फत भारताचा आवाज जगापर्यंत पोहोचतो आहे. याबाबत त्यांनी स्वतःच एका ठिकाणी असे म्हटले आहे की ज्यांनी माझा सन्मान केला तो खरं म्हणजे माझ्याकरवी भारताचा सन्मान झाला आहे आणि माझं जीवन संपल्यावरही हे बंद होऊ नये कारण मला जो आदर सन्मान मिळाला आहे तो व्यक्तिगत माझ्याशी संबंधित नाहीच. त्यांना हेही जाणवले की परदेशात भारताच्या आध्यात्मिक ज्ञानाबद्दल विलक्षण भूक आहे. ही भूक भागवण्यासाठी अशी एखादी संस्था असावी की जिच्यामार्फत हे कार्य सातत्याने करता यावे. आणि ही संस्था शांतिनिकेतनच असावी असे त्यांना प्रकर्षाने वाटू लागले आणि ती नावारूपाला येण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली.

पुढे आणखी काही वर्षांनंतर जगातील विविध देशात भारताचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अग्रदूत म्हणून कार्य करीत असताना शांतिनिकेतनचे रूपांतर एका विशिष्ट प्रकारच्या विद्यापीठात करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली असावी. या विद्यापीठाची स्थापना करून उदात्त आणि व्यापक अशा भारतीय संस्कृतीचे उदाहरण जगासमोर ठेवण्याचा त्यांचा विचार होता. भारतीय पारंपारिक संस्कृतीचे रवींद्रनाथांना विलक्षण कौतुक होते. त्यांची अशी इच्छा होती की जगातील लोकांचा शिक्षणाच्या निमित्ताने अशा विद्यापीठाची संबंध यावा आणि भारतानेही जगभरातील अशी इच्छा असणाऱ्या लोकांना येथे शिकण्यासाठी आमंत्रित करावे.

भारताची संस्कृती वैदिक, पौराणिक, बौद्ध, जैन, मुस्लिम, शीख इत्यादी अनेक धर्मांवर आधारलेली आहे आणि अशा प्रकारच्या संमिश्र अशा भारतीय संस्कृतीचे ज्ञान विविध विषय आणि कलाप्रकारातून देण्याची व्यवस्था अशा प्रकारच्या विद्यापीठातून व्हावी असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या मनाशी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आणि संस्थेसाठी विशिष्ट अशा प्रकारचा आराखडा तयार केला.त्यांनी आपल्या मनाशी या विद्यापीठाचे जे नाव निश्चित केले ते अत्यंत समर्पक असे होते ते म्हणजे विश्वभारती!’

यत्र विश्वं भवत्येकनिडम’ या वैदिक ऋचेतून त्यांना हे नाव ठेवण्याची प्रेरणा मिळाली असे दिसते. त्याचा अर्थ असा की ही संस्था अशी असावी की जिथे संपूर्ण विश्व एखाद्या घरट्याप्रमाणे आपण एकत्र करू शकू. या संस्थेचा असा विकास झाला पाहिजे की जगातील विविध भागातील लोक आध्यात्मिक संपत्तीची देवाणघेवाण करण्यासाठी इथे आकृष्ट झाले पाहिजेत.

जगभर प्रवास करताना रवींद्रनाथांनी हे पाहिले होते की जगातील विविध विद्यापीठे शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना केवळ बौद्धिक ज्ञान किंवा खाद्य पूरवत होते. परंतु व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर केवळ बौद्धिक विकास होऊन चालणार नाही तर भावनिक विकासही होईल अशा प्रकारचे शिक्षण विद्यापीठातून दिले गेले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

विद्यापीठांनी विज्ञान, शास्त्र इत्यादी विषय शिकवत असतानाच ललित कला आणि त्या समूहात येणाऱ्या इतर विषयांना देखील तसेच मानाचे स्थान मिळवून द्यावे त्यायोगेच विद्यार्थ्यांचा खरा विकास होईल. शिक्षणाचा हेतू केवळ ज्ञानासाठी ज्ञान असा मर्यादित न राहता मानवाला समजून घेऊन इतरांना त्याचा मानव म्हणून परिचय होण्यासाठी असावा. बहिणाबाईंच्या शब्दात सांगायचे तर’ माणसा माणसा कधी होशील माणूस’ असं माणूस बनवणारं, माणूस घडवणारं शिक्षण विद्यापीठांनी देणं त्यांना अपेक्षित होतं.

आपल्या विश्वभारती या विद्यापीठात अशा प्रकारचं शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावं म्हणून त्यांनी जगभरातील नामवंत विद्वानांना भारतात आमंत्रित केलं. २२ डिसेंबर १९२१ रोजी या विद्यापीठाचे उद्घाटन झाले प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. ब्रजेंद्रनाथ सील, प्रो. सिल्वान लेव्ही हे याप्रसंगी उपस्थित होते. प्रो. सिल्वान लेव्ही यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यापीठात चिनी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करण्याची योजना आखली गेली. विद्यापीठाच्या किरकोळ खर्चाची हातमिळवणी करण्यासाठी संस्थेची काही जमीन विश्वभारतीला रवींद्रनाथांनी देणगी म्हणून दिली.

आपल्या शिक्षणविषयक कार्याच्या आयुष्यभर केलेल्या धडपडीतून रवींद्रनाथांची प्रतिमा एक थोर शिक्षणतज्ज्ञ म्हणून जगासमोर आली होती. शांतिनिकेतन ते विश्वभारती हा रवींद्रनाथांचा जो प्रवास झाला त्याचा आढावा या छोट्याशा लेखात घेण्याचा प्रयत्न केला असला तरी रवींद्रनाथांनी आपले संपूर्ण आयुष्य याच्यासाठी खर्ची घातले आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, ११ मे ते शनिवार, १७ मे २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, ११ मे-** श्री नृसिंह जयंती, मदर्स डे, राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन, पद्मावती यात्रा करंजखेड, गोविंद महाराज पुण्यतिथी देगाव, * **सोमवार, १२ मे-** बुध्द पौर्णिमा, कुलधर्म, कुर्म जयंती, वैशाख स्नान समाप्ती, पुष्टपती, विनायक जयंती, अन्वाधान, आंबिका उत्सव ओझर, साईबाबा उत्सव शिर्डी, परिचारिका दिन * **मंगळवार, १३ मे-** इष्टि, नारद जयंती, वीणादान, दिगंबर दास महाराज पुण्यतिथी पुणे, शेखागौरी यात्रा मालवंडी (बार्शी), विरक्त बिळूर महास्वामी पुण्यतिथी बिळूर (ता.जत), सिध्देश्वर महाउत्सव कोल्हापूर * **बुधवार, १४ मे-** छत्रपती संभाजीराजे जयंती, सद्गगुरू माणिकनाथ महाराज पुण्यतिथी सोलापूर * **गुरुवार, १५ मे-** अगस्ती लोप, जागतिक कुटुंब दिन * **शुक्रवार, १६ मे-** संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २२:२८, अहिल्यानगर- २२:२०, कलबुर्गी-२२:०७, कोल्हापूर-२१:४२, जालना-२२:२८, धाराशिव-२२:१३, नांदेड-२२:०९, पंढरपूर-२२:१४, परभणी-२२:१२, पुणे-२२:२३, बीड-२२:१६, बीदर-२२:०६, लातूर-२२:११, विजापूर-२२:११, छत्रपती संभाजीनगर-२२:२०, सांगली-२२:१६, सातारा-२२:२०, सोलापूर-२२:१२). बिरदेव जन्मोत्सव पट्टणकोडोली, जानूबाई यात्रा भोसे * **शनिवार, १७ मे-** संत चोखामेळा पुण्यतिथी मंगळवेढा

**मुहूर्तः-** * **साखरपुडा-** १३, १६ मे (१६ पर्यंत) * **डोहाळ जेवण-**१३ मे (९ नंतर ), १४ मे (१२ पर्यंत), १६ मे (१६ पर्यंत), * **बारसे-** १४ मे (१२ पर्यंत) ***जावळ-** १४ मे (१२ पर्यंत) * **गृहप्रवेश-** १४ मे (१२ पर्यंत)

### मेष :- मनासारखी प्रगती

सुखी रहायचे असेल, तर कानावर आलेली प्रत्येक गोष्ट मनावर नाही घ्यायची. राशी स्वामी मंगळ सुखस्थानी असल्याने फार दगदग करू नये. अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. १२, १६

### वृषभ:-अडचणींची चिंता नको

मनात तेच लोक राहतात, ज्यांच मन साफ आहे. राशीत गुरू असल्याने विविध समस्यांतून मार्ग निघत जाईल. उत्साहवर्धक घटना घडतील. गृहसजावट, गृहबांधणी अशा व्यवसायात मनासारखी प्रगती होईल. अपेक्षित फलप्राप्ती होईल. सरकारी कामासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघेल. शुभ ता. १७

### मिथुन:-वादाचे प्रसंग टाळावेत

सर्व वेळेचा खेळ आहे. कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते. धनस्थ मंगळामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या संधीचे स्वागत कराल. अपेक्षित कामे मनासारखी होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. प्रतिकूलतेवर मात कराल. शुभ ता. १३, १६

### कर्क:-घाईने निर्णय नको

रूप आणि रूपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही. कर्मस्थ रवि- बुधामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. उपजत कला गुणांचा विकास होईल. नव्या ओळखी पारखून घ्या. शुभ ता. १६

### सिंह:-प्रकृतीची दखल घ्यावी

एखाद्याच्याजवळ तितकचं जायचं असतं जितकं ते आपल्याला जवळचे मानतात. शनि, मंगळाचे सध्या सहकार्य आपल्या राशीस नाही. त्यामुळे सर्वबाबतीत विचाराने रहावे. नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. डोळ्याच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. अनावश्यक खर्च टाळावा. शुभ ता. १७

### कन्या:-कौटुंबिक समस्या

जीवनाची परीक्षा अचानक होते. त्यासाठी अभ्यासक्रम, वेळ नसते. लाभात मंगळ असल्याने वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनातील समस्या विचाराने, सामंजस्याने सोडवाव्यात. अपेक्षित कामे झाल्याने समाधान वाटेल. सरकारी कामे लांबणीवर पडतील. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. शुभ ता. १७

### तुला:-संधीचे स्वागत करावे

समस्यांशी झगडत राहणे हाच प्रगतीचा मार्ग आहे. धनेश सप्तमेश, मंगळ दशमात आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. कला-गुणांच्या प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. नव्या संधीचे स्वागत करावे. जुने येणे वसूल करण्यासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. शुभ ता. १६

### वृश्चिक:-महत्त्वाची कामे करावीत

सुखात त्यांनाच निमंत्रण द्यावे, जे दुःखात न बोलविता येतात. षष्ठातील रवि- बुधामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना विशेष लाभदायक ठरतील. महत्त्वाची कामे करून घ्यावीत. स्पर्धांमध्ये यश मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. शुभ ता. १७

### धनु:-विचाराने रहावे

आपला विचार प्रामाणीक असेल तर दोस्त कमी पण विरोधक जास्त भेटतात. चतुर्थात शनि, अष्टमात मंगळ त्यामुळे मार्गक्रमण सुलभ नाही. कार्यक्षेत्रात अधिक विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. पोटाच्या तक्रारी संभवतात. दूरचे प्रवास टाळावेत. त्रास संभवतो. शुभ ता. १३, १६

### मकर:- कला-गुणांचा विकास

आज काही नसताना जे तुमच्या सोबत आहेत, ते खरे आहेत. पैसा, प्रसिध्दी आल्यावर सगळेच जिवलग होतात. राशीसमोर मंगळ असल्याने सर्व बाबतीत विचाराने रहावे. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात कला-गुणांचा विकास होत जाईल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. शुभ ता. १६, १७

### कुंभ:- चिंता नको

मन नाजुकच असतं. आयुष्यात आलेली काही चुकीची माणसं त्याला दगड बनवतात. पराक्रमातील रवि- बुधामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढत जाईल. चिंता नको. शुभ ता. १६

### मीन:-फार काळजी करू नका

सर्व यशाची वेळ निर्धारित असते. कधीही हिम्मत हारू नका. राशीतील विविध ग्रहांमुळे अपेक्षित फलप्राप्ती होत नसली तरी फार काळजी करू नका. चालतच राहिल्याने केव्हा तरी प्रगतीचा टप्पा गाठता येतो. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. १६, १७

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# स्वातंत्र्यसूर्य उगवला!



हिंदुस्थानात परकीय सत्ता आल्या. त्यांनी आपल्या सुजलाम् सुफलाम् भूमीचे लचके तोडून हिंदू धर्मीयांवर अनन्वित अत्याचार केले. मुसलमान आणि पोर्तुगीज छळ करून धर्मपरिवर्तन कार्य जोमात करू लागले. त्याचा परिणाम असा झाला की, समाजातील नित्य आचारधर्म लोप पावत गेले. जनतेवर काहीही धर्मकार्य करताना भीतीचे सावट असे.

जाधवांची लेक आणि भोसल्यांची अत्यंत महत्त्वाकांक्षी परंतु तितकीच विवेकी सून जिजाबाई, सतत मराठी रयतेवर होणाऱ्या सुलतानी अत्याचाराने व्यथित होती. शहाजी राजे अत्यंत मानी होते. त्यांनाही स्वराज्याची आस होती. सुलतानी सत्तेची चीड येई. मात्र परिस्थिती पूरक नव्हती. अवतीभोवती कुणी साथीला नव्हते. सुलतानी चाकरी म्हणजे विष होते. बंडखोरी केली असती तर परिणाम भयंकर होते. शहाजी राजांच्या मनात मराठी रयतेसाठी अपार प्रेम होते. त्यांच्या कल्याणासाठी त्यांची सतत धडपड असे. जिजाबाई सतत रामायण-महाभारत वाचत. त्यांना वाटे या सुलतानांचा नायनाट करण्यास श्रीराम- श्रीकृष्णासारखा अवतार पृथ्वीवर पुन्हा जन्माला यावा. शुद्ध हेतू असला की, आपल्या मनातील इच्छा आपल्याला सतत ध्येयाकडे ओढत असते तसेच जिजाऊच्या बाबतीत घडत होते. वैशाखात काही काळ शहाजीराजे मोहिमा करून घरी आले. त्यांच्या सहवासात जिजाऊंचा काही काळ सुखात गेला. आषाढ महिन्यात जिजाऊच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज झळाळू लागले. आई भवानीने त्यांची आर्त हाक ऐकली होती. बाळाच्या आगमनाची चाहूल लागली. शहाजी राजांच्या लाडक्या जिजाऊला डोहाळे लागले. हा आनंद साजरा होतच होता की, इकडे देवगिरीच्या दरबारात वडील आणि भावांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. ही बातमी आली अशा नाजुक काळात, जिजाऊला झालेल्या वेदनांचे शाब्दिक वर्णन अशक्य आहे. लखुजीराव जाधव आणि त्यांच्या पुत्रांची देवगिरीच्या दरबारात झालेली हत्या शहाजी राजांच्याही जिव्हारी लागली. त्यांच्या मनात सुलतानी सत्तेविरुद्ध बंडाचे झेंडे फडकू लागले. त्यांनी ठरविले की, आता गुलामगिरीच्या बेड्या तोडायच्या. ते परांड्याला होते. तेथून संगम नेरला आले आणि पुढे पुण्यात पोहोचले. पुण्याची जहागीर त्यांचीच होती. त्यांनी बंड केले. पुण्याच्या आसपासचा आदिलशाही परिसर ताब्यात घेण्यास सुरुवात केली. शहाजी राजांनी बंड केल्यामुळे सर्वत्र धामधूम होती. सतत आक्रमणे, लढाई यामुळे वातावरण अस्थिर झाले होते. त्यांना अशा युद्धजन्य परिस्थितीत, उघड्या मुलूखात जिजाऊला ठेवणे धोक्याचे वाटले. त्यामुळे त्यांनी जुन्नर परिसरातील बुलंद दुर्ग शिवनेरीवर त्यांना पाठवायचे ठरविले. शिवनेरीचे किल्लेदार विजयराव त्यांच्या नात्यात होते; शिवाय गडदेखील दुर्गम व सुरक्षित होता. जिजाबाई शिवनेरीकडे निघाल्या. त्या सुरक्षित पोहोचल्या होत्या. इकडे सुलतानी आक्रमणाची बातमी आली. पुण्यात घरादारांच्या होळ्या पेटल्या. शहाजी राजांनी आदिलशाहीविरुद्ध बंड केले, ही बातमी समजल्यावर पुण्यात आदिलशाही फौज घुसली. शहाजी राजांच्या स्वराज्याच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली. दृष्ट सुलतानी सत्तेने पुण्यावरून गाढवाचे नांगर फिरविले. जिजाबाईंना पुण्यातील या बातम्या ऐकून प्रचंड वेदना झाल्या. त्यांच्या मनात क्रोधाग्नी भडकली. तितक्यात नाशिकवरून अजून एक अत्यंत वाईट बातमी आली, शहाजीराजांच्या चुलत भावाची बायको पंचवटी येथे गोदावरी स्नान करण्यास गेली असताना, मोगल सरदार महाबत खानाने तिला पळवून नेले. भोसल्यांच्या घरच्या सुनेची ही परिस्थिती होती तर सामान्य स्त्रियांची हिंदुस्थानात काय परिस्थिती असेल, याची कल्पनाही करवत नाही. स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू समजणाऱ्या या हिंस्र श्वापदांना जरब बसविणे आवश्यक होते. सुलतानांच्या राजवटीत किती स्त्रिया भ्रष्ट झाल्या, बाटविल्या, विकल्या व मारल्या याची नोंदच नाही. या जुलमी मानसिकतेची राख करण्यास नृसिंहानेच जन्म घेणे आवश्यक होते. जिजाऊंचे डोहाळेदेखील शौर्याचे होते. त्यांना वाटे घोड्यावर बसून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात फिरावे, गडकिल्ले सर करावे, महिषासुरमर्दिनीसम वाघावर बसून यवनांचा नाश करावा, हत्तीची सवारी करावी, उंच उंच भगवा ध्वज उभारावा, शस्त्र चालविणे शिकावे. थोडक्यात काय तर गर्भारपणात जिजाबाईंचा स्वराज्याचा ध्यास अधिकच वाढला होता. पोटातील गर्भावर त्यांच्या या विचारांचे गर्भसंस्कार नक्कीच होत असणार. शिवाई देवीच्या मंदिरात सतत त्या साकडे घालत होत्या की, मोगलांच्या अन्यायाने त्रस्त असलेल्या जनतेला मुक्त करण्यासाठी माझ्या पोटी नरवीर जन्माला येऊ दे. दृष्ट शक्तीची वाईट नजर आपल्या राष्ट्रावर, धर्मावर आजही आहेच; म्हणून प्रत्येक आईच्या मनात हिंदू धर्माबद्दलची आस्था जागृत असण्याची, राष्ट्रहिताचे भान असण्याची आजही गरज आहे.

जिजाऊ एक एक दिवस बाळाच्या आगमनाची वाट पाहत होत्या. जिजाऊची प्रार्थना शिवाई देवीने ऐकली आणि शिवनेरीवर स्वातंत्र्यपर्वाची सुरुवात झाली. फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ शिवनेरीवर, शिवाई देवीच्या कृपेने जिजाऊच्या पोटी पुत्ररत्न जन्माला आले. गडावर सनई चौघडा वाजू लागला, शिवनेरी आनंदला. शहाजी राजांना ही आनंदाची बातमी कळविण्यात आली. बाराव्या दिवशी बाळाचे बारसे करण्यात आले, शिवनेरीवर, शिवाई देवीच्या सहवासात जन्मलेल्या बाळाचे नाव ठेवले 'शिवाजी!' शिवनेरी, महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसूर्याचे जन्मस्थान. सह्याद्रीतील हा बुलंद दुर्ग चारही बाजूंनी देवस्थानांनी वेढलेला आहे. भीमाशंकर ज्योतिर्लिंग, लेण्याद्रीचा गणपती, निमगिरीचा खंडोबा, ओझरचा श्री गजानन यांच्या मध्यावर शिवनेरी! नाणेघाटाचा संरक्षक दुर्ग म्हणून ख्याती असलेल्या या दुर्गाची कथा अत्यंत प्रेरणादायी आहे. जुन्नर ही शकराजा नहपानाची राजधानी होती. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा नाश केला. जुन्नर व येथील सर्व परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नाणेघाट हा त्यावेळी व्यापारी मार्ग होता. या मार्गावरून फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक चालत असे. या व्यापारी मार्गावर लक्ष ठेवण्यासाठी या मार्गावर दुर्गांची निर्मिती करण्यात आली. सातवाहनाची सत्ता स्थिर झाली आणि त्यांनी या परिसरात अनेक ठिकाणी लेणी खोदवून घेतली. सातवाहनांनंतर शिवनेरी चालुक्य, राष्ट्रकूट या राजवटींच्या सत्तेखाली होता. मात्र, यादवांची सत्ता असताना शिवनेरीला गडाचे स्वरूप प्राप्त झाले. नंतर किल्ला बहमनी राजवटीखाली आला. यानंतर निजामशाहीत आणि पुढे किल्ला तसेच जुन्नर प्रांत मालोजी राजे भोसले यांच्याकडे आला. जुन्नर या गावापासून अवघ्या तीन कि.मी. अंतरावर शिवनेरी किल्ला आहे. गडावर जायला दोन मार्ग आहेत.

सातवाहनकालीन दगडी पायऱ्यांचा व दुसरा साखळीचा मार्ग. शिवनेरीवर जाताना शिवजन्मस्थळ पाहण्याची एक अनामिक ओढ मनात असते. ज्या गडावर शिवजन्म झाला, बाल शिवाजी घडले, खेळले, बागडले, शिकले, त्या भूमीवर आपण आहोत हा विचारच इतका सुखद असतो की, इतर जगापासून मन अलिप्त करून हा किल्ला पाहावा. महादरवाज्यातून आत गेलो की परवानगी दरवाजा लागतो. या दरवाज्याच्या कमानीवर कोरीव शिल्पे आहेत. त्यातील गरुड, हत्ती, वाघ किंवा सिंह असे काही आकार आपल्या लक्षात येतात. थोडं समोर गेलात की हत्ती दरवाजा व पीर दरवाजा आहे. गडाच्या अर्ध्यात शिपाई दरवाजा लागतो. येथून उजवीकडे गेलो की शिवाई देवीचे मंदिर आहे. किल्ल्यावरच्या मंदिरात एक अनामिक शांतता लाभते. त्या शांततेत शरीराची आत्म्याशी असलेली एकरूपता अनुभवता येते. पुढे थोड्या पायऱ्या आहेत. मग फाटक दरवाजा व कुलाबकर दरवाजा ओलांडून मुख्य गडात प्रवेश होतो.

शिवनेरीचा अंबरखाना खूप छान आहे. गडावर मुबलक पाणीही आहे; शिवाय वीजही आली आहे. गंगा व जमुना नावाची दोन पाण्याची टाकी आहेत. थोडं अजून चालत गेलात की समोर शिवकुंज आहे. तिथे जिजाऊ व बाल शिवाजी यांचा पुतळा आहे. शिवजन्मस्थळ असलेल्या इमारतीत खाली एक खोली आहे, त्यात पाळणा ठेवला आहे. आत प्रवेश नाही, पण जाळीतून आतलं दृश्य दिसतं. वर जायला एक अरुंद जीना आहे. वर गेल्यावर संपूर्ण गड व आसपासचा परिसर दिसतो. पूर्वीचे दगडी बांधकाम किती मजबूत व सर्वांगाने विचार करून करायचे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे किल्ल्यावरचे बांधकाम. महाराष्ट्रातील हे किल्ले स्थापत्य कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. गडावरील बदामी तलाव, कडेलोट करायची जागा, फडणीसांचे घर पाहून परतीच्या वाटेवर एक चौथरा लागतो; तो 'कोळी चौथरा' नावाने ओळखला जातो.

मोगलांनी केलेल्या अत्याचाराचे प्रतीक म्हणजे कोळी चौथरा. पुणे प्रांतातील कोळ्यांनी बंड केले. मोगलांनी त्यांचे हे बंड खोडून काढले. त्यांना बंदी केले. याच चौथऱ्याच्या ठिकाणी त्यांना शिक्षा केली. अनेकांचे शीर धडावेगळे करून आपल्या क्रूरतेचा परिचय करून दिला. या कोळी चौथऱ्याच्या आधी गडावर येण्याची एक चोरवाट आहे; तिला 'साखळी वाट' असेही म्हणतात. हा मार्ग खडतर आहे. शिवनेरी किल्ला नारायणगड, हरिश्चंद्रगड, जीवधन, राजमाची असा चारही बाजूने किल्ल्यांनी वेढला आहे. सह्याद्रीचे निसर्गसौंदर्य वर्णावे तेवढे कमीच आहे. सह्याद्रीचे कडे, त्यातील गडकिल्ल्यांच्या उल्लेखाशिवाय अपूर्ण आहेत. 'रांगडा' या शब्दाचा अर्थ अनुभवायचा असेल तर हे सह्यकडे सर करावे. शिवनेरी किल्ल्यावर तर प्रत्येकाने

पान ४ वरून

# वैशाखाच्याही अंतरंगी असतात...

वैशाखात आंबे उतरणली आले म्हणजे शेतातली माकडांची टोळी गावात घुसते. त्यांचा धिंगाणा प्रचंड असतो. एका बहाद्दराने माकडाची टोळी अंगणात येऊ नये म्हणून एक नामी युक्ती सुचवली, ती म्हणजे, मटण किंवा चिकन ह्यांच्या रस्स्यात पोळी भिजवून त्यांच्या टोळीमार्गात ठेवायची, असे केल्याने ते माकड ती पोळी हातात घेणार, तिचा वास घेणार आणि ती फेकून देणार, तुमच्याकडे पाहून दात ओठ खाणार आणि पुन्हा कधीच तुमच्या दारात नाही येणार. हे लॉजिक माझ्यासाठी नवे होते पण पुढे माझ्या मित्राने तो प्रयोग केला. त्याची फलश्रुती अशी झाली की, मटणाच्या रस्स्यात भिजलेली पोळी माकडाने उचलली आणि शांत बसून त्याने ती खाल्ली एवढाच काय तो फरक....! तर ह्या माकडांना पाहिलं की मला साधारणपणे मी अकरावी बारावीत असतांनाचे दोन प्रसंग आठवतात.

एकदा वैशाखात अशीच एक माकडाची टोळी अंगणात मस्ती करून गेली आणि टोळीसमोर निघून गेल्यावर एक माकडीन तिच्या पिलासह मागे रेंगाळली. त्या काळात आमच्या दारातील बदामाच्या सावलीत आम्ही शेजार पाजरची मुले पत्ते खेळत असू. ती माकडीन दोन दिवस आमच्या एक-दोन घरावर फिरत होती. तिला ऊन लागले असावे असा तर्क काढत आम्ही बोअरवेलच्या धारेने तिला भिजवले तीही अंगावर पाणी घेत निपचीत बसून राहिली. पाळीव प्राण्याला थोपटावे तसे थोपटले तरी ती निवांत बसून होती. मात्र पिल्लास तिने सोडले नाही. दोन दिवसानंतर तिला शोधत तिची टोळी आली तेव्हा ती आमच्या घरा शेजारच्या छतावर बसलेली होती. टोळीतील एक एक माकड आस्थेने चौकशी करावी तसे तिच्यापाशी येत होते तिच्या डोळ्याकडे बघत होते. हे सर्व पाहत असताना तिच्या डोळ्याला जखम झाली असून ती बहुदा एका डोळ्याने आंधळी झाल्याची जाणीव आम्हाला झाली. इतर माकडीने समोर येताच तिने तिचे पिल्लू त्यांच्या हवाली केले आणि टोळीतल्या थोराड माकडाने अक्षरशः तिच्या हाताला धरून तिला आपल्या मागे चालते केले. प्राण्यातील हा प्रेमाचा ओलावा अनुभवला. असाच एकदा वैशाख पौर्णिमेच्या दिवशी बदामाच्या सावलीत कॅरम खेळत असताना काही माकडे आली. त्यातील एका माकडणीचे पिल्लू मरण पावलेले होते, तरीही ती त्याला छातीला घेऊन या झाडावर उड्या मारत होती. तिचे पिल्लू तिच्यापासून दूर करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटले. मोकळ्या मैदानात आम्ही अगोदरच एक छोटे खाणी खड्डा खोदून ठेवला आणि चारपाच पोळ्या त्या माकडणीला दाखवून त्या तीन चार वेगळ्या जागी फेकल्या, ती त्या जमा करून खाण्यात गुंतली असताना आमच्यातील कोणी एकाने ते पिलू तिच्या पुढ्यातून हळूच उचलले आणि बाकी तीन चार जणांनी हातात काठ्या घेऊन ती माकडीण अंगावर येऊ लागली की काठ्या दाखवून तिला पिटाळून लावायचे हा डाव यशस्वी झाला. ते पिल्लू मातीखाली गेले. माकडीन तीन चार पोळ्या घेऊन निघून गेली. पोटाच्या आगीपुढे पोटचा गोळा ती विसरली असे आम्हाला वाटले. मात्र, त्यानंतर तीन चार दिवस ती त्या पिल्लू पुरलेल्या जागेवर उन्हात बसलेली आम्ही पाहत होतो, तीन चार दिवस ती आली आणि पुढे ती टोळी दिसली नाही. एकंदरीत वैशाखच ऊन कितीही असले तरी त्यांच्या पोटातही ओलाव्याचे असे काही टिपूस जपलेले असतातच नाही का?

पान ३ वरून

# पितृदेवो भव!



भारतीय परंपरेत विकसित झालेलं दिव्य विचारधन म्हणूनच धर्मराज युधिष्ठिरानं दिलेल्या उत्तरांकडे बघायला हवं. यक्ष विचारतो 'किंस्विद् गुरुतरं भूमेः किंस्विदुच्चतरं च खात्? किंस्विद् शीघ्रतरं वातात् किंस्विद् बहुतरं तृणात्?' पृथ्वीपेक्षा मोठा भार कोणाचा? आकाशाहून उंच काय? वायूहून वेगानं काय वाहतं गवतापेक्षा असीम विस्तृत असंख्य काय आहे? त्यावर युधिष्ठिराचं उत्तर आहे.

पृथ्वीहून मातेचा भार अधिक असतो आणि पिता आकाशाहून उंच असतो. मन वायूपेक्षा वेगानं वाहतं आणि चिंता ही गवतापेक्षा अधिक विस्तारलेली आणि अनंत असते. यातली गंमत बघा हं- आईपण ही एक भौतिक आणि मूर्त प्रक्रिया आहे. बाळंत होणारी बाई आणि तिच्या पोटी जन्माला येणारं मूल हे वास्तव आहे तर पितृत्व हा आईच्या शब्दांवरचा विश्वास, श्रद्धा आणि विसंबण्याची अमूर्तता आहे. आई सांगते म्हणून, त्यावर विश्वास ठेवून संबंधित बाळाचा पिता कोण ते, ते मूल, तो पुरुष आणि जग मान्य करतं.

धरणी ही मूर्त आहे आणि आकाश अमूर्त. पण हे दोन्ही असल्याखेरीज अस्तित्वाला अर्थच नसतो. जातक म्हणजे जन्माला आलेल्या प्रत्येक प्राणिमात्रांत आणि विशेष करून मानव प्राण्यात पित्याचं महत्त्व विशद करताना आपले शास्त्रकार म्हणतात. माझे प्रथम गुरू, माझे प्रत्यक्ष विघ्नहर्ता असे माझे पिता जर प्रसन्न असले तर सगळे देव प्रसन्न असतात. याच बरोबर आणखी एक श्लोक आपण नेहमी लक्षात ठेवावा असाच आहे.

माझे सख्खे नातेवाईक कोण कोण आहेत, याची एक सूचीच सुभाषितकार करतात. '**सत्यं माता पिता ज्ञानं धर्मो भ्राता दया सखा। शान्तिः पत्नी क्षमा पुत्रः षडेते मम बान्धवाः॥**' सत्य ही माझी माता आहे तर ज्ञान माझे पिता आहेत. (मनः) शांती ही माझी पत्नी असून क्षमा माझा पुत्र आहे, असे हे सहा माझे बांधव आहेत. या सुभाषितकारानंदेखील सत्याचा संबंध आईशी आणि ज्ञानासारख्या अमूर्त पण जगण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या पावित्र्याचा संबंध पित्याशी जोडलेला आहे.

आपल्याकडे आकाशातल्या बापाकडे करुणा भाकायची नसून आपला साक्षात बापच आकाशासारखा विस्तीर्ण आणि विशाल असल्याचा संस्कार आहे. या आपल्या भारतीय संस्काराचं कसोशीनं पालन करणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

पान ४ वरून

# कृष्णमनोगतः भावस्पर्शी कादंबरी

मैत्रेय स्वामीजींची जीवनशैली, त्यांचे कृष्णप्रेम, कृष्णगुणांची तादात्म्यता, त्यांची वैयक्तिक आध्यात्मिक साधना ह्यामुळेच स्वामींजीनी ही कादंबरी इतक्या साक्षीभावानं लिहिली असावी. त्यांच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष प्रसंग घडत असावेत असे वाटत राहते. स्वामीजींच्या भाषेत एक अनामिक गोडवा आणि लालित्य अवतरलेले आहे. कादंबरीतील प्रत्येक प्रसंग, घटना अशा काही शब्दबद्ध केलेल्या आहेत की वाचक त्या काळाचा, कथनकाचा, प्रसंगाचाच एक भाग, घटक होऊन समरसून जातो. स्वामीजींचे प्रसंग खुलवण्याचे कसब आणि लालित्य कौतुकास्पद आहे. जणू परकाया प्रवेश केलेल्या स्वामीजींच्या लेखणीतून हे कथ्य उतरले असावे इतके भावस्पर्शी जिवंत चित्रण झाले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. कादंबरी वाचून पूर्ण होतांना असे जाणवत राहते की स्वामीजी वाचकाच्या मनांत नकळत, कृष्णाची जीवनमूल्यांची बीजं सहजपणे रुजवून जातात. वाचक कृष्णमय होऊन, कृष्णाच्या रंगात पुरता न्हाऊन जातो ह्यातच कादंबरीचे यश दडलेले आहे. या कादंबरीतील नेमके कुठले प्रसंग अधिक भावपूर्ण उतरले आहेत, हे या समीक्षणात शब्दमर्यादेमुळे मांडता येणे अशक्य आहे. 'गागर में सागर' भरण्याइतकी माझी कुवत नाही हे मी जाणून आहे. जागोजागी कृष्णाने केलेली भाष्ये, चिंतन हे सारं कथन करायला, मांडायला माझं शब्द सामर्थ्य अपूर्ण आहे याची मला जाणीव आहे. वाचकांनी स्वतः वाचूनच त्याचा आस्वाद घ्यावा. तृप्तीच्या आनंदात डुबकी घ्यावी, इतके ते प्रवाही झालेलं आहे.

संपूर्ण कादंबरीभर सात्विकता, पावित्र्य आणि भक्तिभाव ओसंडून वाहताना जाणवतात. कृष्णावर लिहिलेली उच्च दर्जाचे समृद्ध लेखन असलेली ही प्रदीर्घ कादंबरी जगभरातील वाचकांच्या मनात अढळस्थान निर्माण करेल हे मात्र निश्चितच!

**कादंबरीचे नावः** कृष्णमनोगत
**लेखकः** मैत्रेय स्वामी
**प्रकाशनः** आत्मकला प्रकाशन, पुणे
**पृष्ठ संख्याः** ६७२
**मूल्यः** ७०० रूपये

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान

डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# मनोकायिक उपचार




ब्रें डा मॅपने म्हणतो- मन आणि काया सतत एकमेकांशी गुजगोष्टी करीत असतात. त्या कान देऊन ऐकल्या तर स्वतःला समजून घेण्यास मदत होते.

कधी विचार केलाय का की, आपल्या मनातल्या भावना आपल्या शरीराला आजारी करू शकतात? किंवा याच भावनांचा वापर करून आपण रोगांवर मातही करू शकतो?

संभाषण आणि संवाद हे कायम मानसिक स्वास्थ्याचे पायाभरणीचे दगड असतात. शरीरातील स्वायत्त मज्जासंस्थेचे शहाणीव मानवी वर्तन आणि भावना यांच्यातील सम्यक विकसन घडविते. त्यातून महत्वाचे शोध लागू शकतात. वैद्यकीय उपचारांच्या माध्यमातून द्विपक्षीय उत्तेजना (दोन्ही हातांना अथवा पायांना यांत्रिक उत्तेजना) आजकाल सहज शक्य झालीय. संवेदना आणि वर्तन यांना आपण शरीर विज्ञान आणि मनोविज्ञान या दोन पारड्यांमध्ये टाकले तर अवाजवी प्रतिक्रिया हा संरक्षणाचाच एक उत्क्रांत स्वभाव आहे हे पटते. पॉलीवेगल सिद्धांताच्या मदतीने आघातचे मज्जासंस्थेवर होणारे दुष्परिणाम आणि त्यातून बाहेर मार्ग काढण्याचे सुरक्षित रस्ते समजणे सोपे होते. हा दुहेरी मार्ग जखमा भरून काढण्याचा, प्रतिकूल परिस्थितीतून परत येण्याची क्षमता वाढविणारा ठरतो.

मनोकायिक नाते समजून घ्यायला प्रगत मानसशास्त्र आणि मज्जासंस्थेचे विज्ञान मदत करते. काही शास्त्राधार खाली दिलेले आहेत-

**१) सायकोन्यूरोइम्युनॉलॉजी -** वैद्यकशास्त्राची ही नवी शाखा भावनिक अवस्था (जसे की ताण) आणि मज्जासंस्थेच्या क्रियाकलापांचा रोगप्रतिकारक शक्तीवर होणाऱ्या प्रभावाशी संबंधित आहे, विशेषतः रोगाच्या सुरुवातीच्या काळाचा अभ्यास त्यामुळे संभवतो. कीएकॉट आणि ग्लासेर यांनी २००२ साली मानसिक तणाव आणि त्यांचा अंतःस्रावी प्रणालीवर होणारा परिणाम अभ्यासला. त्यांना आढळून आले की भावना, ताणतणाव आणि मेंदूच्या अंतर्गत होणाऱ्या घडामोडी प्रत्यक्षपणे मानवी रोगप्रतिकारक्षमतेवर परिणाम करीत असतात आणि त्यामुळे संसर्ग वाढण्याच्या शक्यता बळावतात. तणावग्रस्त माणसाच्या भुकेवर, निद्रेवर प्रभाव पडल्याने आजारपणाची भावना वाढीला लागते, याउलट सकारात्मक मानसिक अवस्था आनंद, कृतज्ञता यांच्या माध्यमातून रोगप्रतिकार प्रणाली विकसित करीत असते, हे संशोधन आहे बराक यांचे २००६ सालचे.

**२) पॉलीवेगल सिद्धांत -** स्टीफन पॉरजेस यांनी १९९४ साली मांडलेला हा सिद्धांत मानवी वॅगस मज्जातंतू ( जी मानवी शरीरातील अनैच्छिक कार्यांचे नियमन करण्यासाठी जबाबदार असते. आणि मेंदूला हृदय, फुफ्फुसे आणि पचनसंस्थेसह विविध अवयवांशी जोडणारा एक प्रमुख मार्ग म्हणून काम करते.) भावनांचे, शरीरविज्ञानाचे कार्य सुकर करण्यास कसे हातभार लावतात हे मांडतो. शरीरातील ग्रंथी सामाजिक आणि पर्यावरणीय उत्तेजनांशी कसे संवाद साधतात आणि त्याचा परिणाम शारीरिक स्वास्थ्य आणि जीवनाशैच्या सुधारण्यास कसा होतो हे या सिद्धांतातून नजरेस पडते. वॅगस मज्जातंतूची कार्यक्षमी वाढविण्यासाठी दीर्घश्वसन कामी येते आणि त्यातून भावनांचा समन्वय शक्य होतो.

**३) मूर्त अनुभूती सिद्धांत -** अनुभव शरीरामध्ये खोलवर रुजलेले असतात आणि जेव्हा शरीराचा भवतालाशी संवाद सुरु असतो, तेव्हा आपले विचार आणि भावना आकाराला येत असतात. उदा. आपण पॉवर पोज (झुंशी झेंशा) म्हणजे शक्तीची मुद्रा किंवा आत्मविश्वासू मुद्रा. अशी मुद्रा घेतो तेव्हा त्यांचा परिणाम अंतः स्रावांवर होत असतो.

**४) बायोसायकोसोशियल संरचना-** आरोग्य आणि आजार समजून घेण्यासाठी जैविक, मानसिक आणि सामाजिक घटकांचा एकत्रित विचार करणे येथे अभिप्रेत असते. हे मॉडेल मानवी आरोग्यावर अनेक घटकांचा कसा प्रभाव पडतो हे दर्शवते. जॉर्ज एंगेलने हे मॉडेल १९७७ मध्ये मांडले, ज्यामुळे आरोग्याकडे अधिक व्यापक दृष्टीकोनातून पाहण्याची गरज अधोरेखित झाली.

**जैविक घटक:** यात शरीर रचना, जैविक प्रक्रिया, आनुवंशिक घटक आणि इतर शारीरिक घटक यांचा समावेश होतो.

**मानसिक घटक:** यात विचार, भावना, वर्तणूक, आणि मानसिक प्रक्रियांचा समावेश होतो.

**सामाजिक घटक:** यात सामाजिक संबंध, संस्कृती, आर्थिक स्थिती आणि सामाजिक समर्थन यांचा समावेश होतो.

हे मॉडेल हा एक व्यापक दृष्टीकोन आहे: कारण ते केवळ शारीरिक आजार किंवा मानसिक समस्यांवर लक्ष केंद्रित न करता, तर व्यक्तीच्या संपूर्ण जीवनावर आणि आरोग्यावर होणाऱ्या विविध घटकांचा एकत्रित विचार करते. हे मॉडेल आजार आणि आरोग्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी उपयोगी आहे, या मॉडेलच्या मदतीने, डॉक्टर आणि आरोग्य सेवा पुरवणारे व्यक्तीला अधिक चांगल्या प्रकारे मदत करू शकतात, कारण ते त्यांच्या समस्येचे विविध पैलू समजून घेतात. आपण अनेकदा रोगांना फक्त शारीरिक समजतो. ताप आला तर गोळी, हाड मोडलं तर प्लास्टर!

**उदाहरण:** जर एखाद्या व्यक्तीला डोकेदुखी असेल, तर या मॉडेलनुसार, डोकेदुखीच्या कारणांमध्ये जैविक (उदा. ताण, डोकेदुखीची कारणे), मानसिक (उदा. चिंता, नैराश्य) आणि सामाजिक (उदा. कामाचा ताण, सामाजिक संबंध) घटक यांचा समावेश होऊ शकतो. हे मनोकायिक सिद्धांत आधुनिक उपचारपद्धतीचे मापके ठरवीत आहेत. कौशिक याला सर्वंकष दृष्टिकोन मानतात. शारीर प्रतिसादांशी मनाचे संवाद जवळचे असतात त्यामुळे व्यापक उपचार अधिक प्रभावी होतात. याची परिणीती हाकोमी सिद्धांतात, सोमॅटिक (शारीरिक) अनुभवात होते.

**शारीरिक अनुभव:** भयंकर आजार/ इतर त्रास, यांचे मूळ अनेकदा आपल्या मनात, आपल्या भावनिक तणावात दडलेले असते. पण खरे सत्य आहे की, मन आणि शरीर एकमेकांशी इतके जोडलेले आहेत, जणू एकाच साखळीची दोन टोकं! एका टोकाला ओढाताण पडला, तर दुसऱ्या टोकावरही परिणाम होतोच. जेव्हा आपण सतत तणावात, रागात किंवा चिंतेत असू, तेव्हा आपल्या शरीरात तणावाचे हार्मोन्स वाढतात. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि कर्करोग, संधिवात, मायग्रेन, मधुमेह, हृदयरोग यांसारखे आजार डोके वर काढू लागतात. पण जर आपण आनंदी, शांत आणि सकारात्मक असाल, तर आपले शरीरही निरोगी राहण्याची शक्यता वाढते.

सोमॅटिक म्हणजे शारीरिक, म्हणजेच शरीराशी संबंधित. ही थेरपी एक प्रकारची चिकित्सा आहे जी तणाव, दुखापत किंवा मानसिक समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरली जाते.

**(अ) शरीरात साठलेला तणाव:** अनेकदा लोक आपल्या भावना व्यक्त करू शकत नाहीत किंवा तणावाचा सामना करत नाहीत, त्यामुळे तो शरीरात साठून राहतो. सोमॅटिक एक्सपीरिअन्सिंग या तणावाला ओळखण्यास आणि कमी करण्यास मदत करते.

**(ब) जागरूकता:** या थेरपीमध्ये, तुम्हाला तुमच्या शरीरातील भावना आणि संवेदना जाणवण्यास शिकवले जाते, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या भावनांवर अधिक नियंत्रण ठेवता येते.

**उदाहरणे:**

(१) एखाद्या आघातानंतर शरीरात तणाव जाणवू शकतो. सोमॅटिक एक्सपीरिअन्सिंग तुम्हाला त्या तणावाचे कारण ओळखण्यास आणि त्यावर प्रतिक्रिया देण्यास मदत करते.

(२) स्नायू दुखणे, डोकेदुखी, किंवा थकवा यांसारख्या शारीरिक लक्षणांमुळे त्रास होत असेल, तर सोमॅटिक एक्सपीरिअन्सिंग तुम्हाला या लक्षणांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते.

**निष्कर्ष:** सोमॅटिक एक्सपीरिअन्सिंग एक शक्तिशाली शरीर-आधारित थेरपी आहे जी तुम्हाला तुमच्या भावना आणि संवेदनांशी जोडण्यास मदत करते, ज्यामुळे तुम्ही अधिक तणावमुक्त आणि शांत राहू शकता.

**भावी संशोधनाच्या दिशा-**

मनामध्ये आणि शरीरामध्ये कधी कधी क्लिष्ट संबंध असतात. रिबेलो- सांचेझ यांनी २०२२ साली केलेल्या संशोधनात खालील दिशा सुचविलेल्या आहेत-

**१) वैयक्तिक औषधोपचार -** सर्वसामान्य, रूढ उपचार न करता व्यक्तीच्या अनुवंशिकतेचा विचार करून रोगाच्या प्रतिबंध, निदान आणि उपचारांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयांचे मार्गदर्शन करण्यासाठी ही पद्धती वापरली जाते.

**२) सायकोन्यूरोइम्यूनोलॉजी -** हे मानसशास्त्रातील एक क्षेत्र आहे जे मानसशास्त्र, न्यूरोलॉजी, एंडोक्राइनोलॉजी आणि इम्यूनोलॉजी यांच्या परस्परसंवादाचा अभ्यास करते. शरीराचा मनावर कसा परिणाम होतो आणि मनाचा शरीरावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास करते. मनाचा शरीराच्या प्रक्रियांवर कसा परिणाम होतो हे समजून घेण्यासाठी सायकोन्यूरोइम्युनोलॉजी महत्त्वाची आहे. आरोग्य आणि रोगाच्या आकलनात मानवी आरोग्याच्या अनेक पैलूंचा समावेश केल्यास औषधांमध्ये सुधारणा होऊ शकतात.

**३) न्यूरोप्लास्टिसिटी बाबत संशोधन -** येथे मेंदूची अनुभवामुळे बदलण्याची आणि जुळवून घेण्याची क्षमता यांचे अध्ययन केले जाते. अनुभव, शिक्षण, आणि नुकसानीनंतरही मेंदू स्वतःला बदलू शकतो. न्यूरॉन्सची संख्या आणि आकार बदलणे, किंवा नवीन कनेक्शन तयार करणे. न्यूरल नेटवर्कची कार्यक्षमता बदलणे, ज्यामुळे विचार आणि भावनांवर परिणाम होतो.

**न्यूरोप्लास्टिसिटीचे महत्त्व:**

**शिक्षण:** न्यूरोप्लास्टिसिटीमुळे ज्ञान, कौशल्ये शिकणे शक्य.

**पुनर्प्राप्ती:** मेंदूच्या दुखापतीनंतर, न्यूरोप्लास्टिसिटीमुळे व्यक्तीला पुन्हा पूर्वीचे कार्यक्षम जीवन जगता येते.

**मानसिक आरोग्य:** न्यूरोप्लास्टिसिटीमुळे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.

**निष्कर्ष:** न्यूरोप्लास्टिसिटी ही मेंदूची एक अद्भुत क्षमता आहे, जी आपल्या जीवनात बदल घडवू शकते.

**४) अंकीय स्वास्थ्यदर्शक उपकरणे-** मोबाईल ॲप्स, शरीरावर परिधान करता येण्याजोगे तंत्रज्ञान, बायोफीडबॅक उपकरणे दिवसेंदिवस तंत्रज्ञानात क्रांती घडवून आणीत आहेत.

**५) ज्ञानाच्या अनेक शाखांचा सहयोग -** वैद्यकीय, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या समन्वयातून शरीर आणि मनाविषयी अधिकाधिक माहितीचा साठा खुल जा सिमसिम प्रमाणे हाती लागत आहे. विविध शास्त्रशाखांमधील नैपुण्य आणि प्रभुत्व यांचा वापर करून संशोधक जीवनातील क्षेमकल्याण वाढविण्यासाठी उपचारांची व्यापक संरचना विकसित करीत आहेत.

वर्तणूक औषध (बिहेव्हियरल मेडिसिन) नावाची एक आधुनिक उपचार पद्धती याच तत्त्वावर आधारित आहे. ही पद्धती केवळ औषधांवर नाही, तर आपल्या मनावर, भावनांवर आणि वर्तनावर काम करते. ही पद्धती आजाराला बायो-सायकोसोशल मॉडेलच्या नजरेतून पाहते. म्हणजे, आजार केवळ शरीरातल्या जैविक दोषांमुळे येत नाहीत, तर त्यामागे आपली मानसिक अवस्था आणि सामाजिक परिस्थिती यांचाही हात असतो. बिहेव्हियरल मेडिसिन या सगळ्या गोष्टींचा एकत्र विचार करते आणि रुग्णाला सकारात्मक विचार, शांत मन आणि निरोगी वर्तन शिकवते.

१९७३ मध्ये, ली बर्क यांनी त्यांच्या 'बायोफीडबॅक: बिहेव्हियरल मेडिसिन' या पुस्तकात हा शब्द पहिल्यांदा वापरला. युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हेनिया येथे ओव्हिड एफ. पोमेर्ल्यू आणि जॉन पॉल ब्रॅडी यांनी १९७३ मध्ये 'द सेंटर फॉर बिहेव्हियरल मेडिसिन' सुरू केलं. त्यानंतर १९७४ मध्ये स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी येथे विल्यम स्टीवर्ट अग्रास यांनी 'द लॅबोरेटरी फॉर द स्टडी ऑफ बिहेव्हियरल मेडिसिन' स्थापन केली.

१९७७ मध्ये येल युनिव्हर्सिटी येथील एका संमेलनात आणि नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसच्या बैठकीत या क्षेत्राच्या भविष्यावर सखोल चर्चा झाली. याच संमेलनात श्वार्ट्झ आणि व्हाइस या शास्त्रज्ञांनी बायोसायकोसोशल मॉडेलचा पाया घातला आणि वर्तनशास्त्र आणि बायोमेडिकल सायन्स यांचं एकत्रीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला. वर्तणूक औषध (बिहेव्हियरल मेडिसिन) मनोकायिक (सायकोसोमॅटिक) उपचारपद्धती आहे. मन आणि शरीराच्या सगळ्या प्रक्रिया अतूट आहेत. जर या दोघांमध्ये जरा जरी असंतुलन झालं, तर रोग डोके वर काढतात. या उपचार पद्धतीत काही खास तंत्रांचा वापर केला जातो, जे आपल्याला आपल्या मनावर आणि भावनांवर नियंत्रण ठेवायला शिकवतात. यात समावेश होतो:

**१) बायोफीडबॅक:** यात आपल्याला आपल्या शरीरातील प्रक्रिया, जसं हृदयाचे ठोके किंवा रक्तदाब, यांच्यावर नियंत्रण ठेवायला शिकवलं जातं.

**२) न्यूरोफीडबॅक:** जो मेंदूच्या लहरींचे मोजमाप करून सिग्नल तयार करतो ज्याचा उपयोग मेंदूच्या कार्याचे स्व-नियमन शिकवण्यासाठी केला जाऊ शकतो.

**३) स्वयंसूचना:** स्वतःला सकारात्मक सूचना देणं, जसं मी निरोगी आहे, मी आनंदी आहे.

**४) कल्पनाचित्र:** मनात सकारात्मक चित्र उभी करणं, जसं स्वतःला निरोगी, हसतं-खेळतं पाहणं.

**५) ध्यान आणि योग:** मन शांत ठेवण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी.

ही तंत्रं आपल्या मनाला आणि शरीराला एका लयीत आणतात आणि मनो-दैहिक रोगांवर यशस्वी उपचार करतात. खरं तर, ही तंत्रं आपल्याला आपल्या शरीराची आणि मनाची बलाढ्य शक्ती वापरायला शिकवतात! शास्त्रज्ञांना एक गोष्ट नक्कीच कळली आहे.आजारांमागे आपल्या भावनांचा आणि मानसिक अवस्थेचा मोठा हात असतो. केवळ कर्करोगच नाही तर ५० हून अधिक रोग भावनांमुळे उद्भवतात. सतत राग, भीती, तणाव किंवा दडपलेल्या भावना आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करतात आणि शरीरातील हार्मोन्सचं संतुलन बिघडवतात. यामुळे आपण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आजारी पडतो.

मनात राग, द्वेष किंवा तणाव आहे, तोपर्यंत आपलं शरीर पूर्णपणे निरोगी राहू शकत नाही. डॉ. बर्नी सिगेल म्हणतात, मनाची अवस्था बदलली की शरीराची अवस्था आपोआप बदलते.

---

साधता संवाद

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(बताशी)
भ्र. ९४०३०२९९७८

# चंदनाची उटी। नाना लाभे।।

(भाग-५२)

दे वा, तुझ्या कृपेने आणि माऊली-तुकोबांच्या आशिर्वादाने एकेका गोष्टींचा उलगडा होत चालला आहे, की माणूस हा मुळातच समाजशील प्राणी असल्याने तो समाजाशिवाय जगुच शकत नाही. मग या समाजातच मिसळून जगायचे असेल, तर जे सात्विक वृत्तीचे म्हणजे आपल्या बरोबरच इतरांच्याही अर्थात विश्वाच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या म्हणजेच संत सज्जनांच्या संगतीत का जगु नये? माऊलींनी पसायदानात सांगितल्याप्रमाणे **भुता परस्परे पडो मैत्र जीवांचे** अशाप्रकारच्या संगतीत नव्हे नव्हे अगदी त्यांचे दास होऊन आपलं आयुष्य घालवावं. म्हणजे आयुष्याचं चांगभलच होईल.

एकवेळ चांगभलं नाही झालं तरी चालेल पण आयुष्याचं वाटोळं तर नक्कीच होणार नाही. म्हणून तर 'मुर्खाचा मालक होण्यापेक्षा शहाण्यांचा नोकर व्हावं' असं म्हणतात ते याचसाठी. शहाण्यांच्या (संतांच्या) संगतीचा एक मात्र फायदा निश्चितच होतो आणि तो म्हणजे आपल्यातल्या नकारात्मक दृष्टिकोनाचं समूळ उच्चाटन होतं आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा उगम होतो. आणि एकदा अशी सकारात्मक (दैवी)दृष्टी प्राप्त झाली की, मग **विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ** हा अत्यंत सात्विक विचार मनात रूजु लागतो. 'भेदाभेद' ही शापित दृष्टीच नाहीशी होते. आणि याही पुढे जाऊन कुण्याही जीवाचा मत्सर आपल्याकडून घडत नाही.

इथे एक गोष्ट आपल्या लक्षात आली का, की ज्यांच्या सहवासात आपण आपलं हे आयुष्य घालवतो तशी आपली वृत्ती बदलते. दांभिकांच्या किंवा दुर्जनांची संगत लाभली तर आपली वृत्तीही तशीच होण्याची दाट शक्यता असते. वृत्ती सकारात्मक बदल होणं हे सोपं नसतं. त्यासाठी पूर्वसंचितही तसं असावं लागतं, आणि मुख्य म्हणजे विठ्ठलाची कृपाही असली पाहिजे. म्हणून तर नामदेवराय म्हणतात की, **जन्मोजन्मी आम्ही बहुपुण्य केले तेव्हा ह्या विठ्ठले कृपा केली** नामदेवरायांनी येथे 'त्या विठ्ठले' असे न म्हणता 'ह्या विठ्ठले' असे म्हटले आहे. म्हणजे हीच त्यांची आत्मानुभूती आहे. निर्गुण निराकारातला 'तो' जेव्हा सगुण साकारातला 'हा' होतो. तेव्हा ती खऱ्या अर्थाने ती असते आत्मानुभूती, ती असते आत्मप्रचिती. आणि ती फक्त आणि फक्त संत सज्जनांच्याच ठयी असते. म्हणून देवा, संतसंगतीच्या सवे मला तुझेच ध्यान लागावे. त्याशिवाय तो विश्वात चित्ताला समाधान देणारं अन्य दुजे कुणी नाही. आग्रहाचं हे सात्विक मागणं देवाकडे आपण मागितलं होतं.

**आता पुढे काय? तर...**

**संकटांची भिती। काळ दाखवतो।।**

**परी सांभाळतो। मज हरि ।।३।।**

काळाचं कोडं आजपर्यंत कुणालाही उलगडलं नाही. तो आपल्याच गतीने चालत राहतो. त्याची गती ना कुणी वाढवू शकतो ना कुणी कमी करू शकतो आणि ना कुणी थांबवूही शकतो. आपल्याला खूप वाटतं की, 'दुःख तर माझ्या पाचवीलाच पुजलं आहे. आता मोठ्या मुश्किलीने चार दिवस सुखाचे नशिबी आले आहेत तर काळाने माझ्या इथे कायमच मुक्कामाला थांबावे. किंवा नाहीच जमलं तर किमान सावकाश तरी चालावे तेवढीच सुखाची संगत लाभेल.

दुःखाच्या प्रसंगी वाटतं की, हा काळ माझ्या इथे थांबूच नये. किंवा चुटकी सरशी तो माझ्या इथून निघून जावा. पण तसं होत नाही. तुमचं सुख असो की दुःख असो काळ त्याच्या गतीनेच पुढे पुढे चालत असतो. त्याने किती काळ आपल्याशी संगत करावी हे आपले विधी लिखित प्रारब्ध भोग ठरवत असते.

काळ अतिशय निष्ठूर असतो. त्याला कुणाविषयी दया, माया नसते. नव्हे त्याचा तो विषयच नाही. तो विषय प्रारब्धाचा आहे. त्याचं एकच काम आहे की, हळूहळू तो कुणाच्याही नकळत प्रत्येकाला त्याच्या शाश्वत सत्याकडे म्हणजेच मृत्यूकडे घेऊन जात असतो. आणि हे शेवटपर्यंत आमच्या लक्षातच येत नाही. आणि जेव्हा येतं तेव्हा फार उशीर झालेला असतो. करायचं काय शिल्लक राहिलंय? याची भलीमोठी यादी समोर येते. म्हणूनच हा जीव 'पुनरपी जननम् पुनरपि मरणमच्या चक्रव्यूहात अडकतो. पण मृत्यू हे शाश्वत सत्य आहे हे ज्याला कळतं त्याला मरणाची भिती नसते. त्यामुळे काळ



कधीही आला तरी त्यांच्यासोबत जाण्यास ते सदैव सज्जच असतात. 'काय करायचं राहिलय?' हा शब्दच त्यांच्याकडे नसतो. त्यामुळे यादीचा तर प्रश्नच येत नाही. म्हणून ते 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्'च्या चक्रात अडकून पडत नाहीत. ते यातून मुक्त होतात कारण त्यांच्यावर हरिकृपा झालेली असते. म्हणून तर तुकाराम महाराज आम्हाला वेळोवेळी सावध करतात की,

**क्षणोक्षणी हाचि करावा विचार।**

**आयुष्य खातो काळ सावधान।।**

पण आम्ही मात्र काही केल्या सावध होत नाही. म्हणून पुन्हा पुन्हा जन्म- मरणाच्या चक्रात अडकून पडतो. संसारात संकटं ही येतच राहतात. त्यांना घाबरायचं नसतं तर खंबीरपणे सामोरं जायचं असतं. अर्थात हे वाटतं तेवढं सोपं नाही याची मलाही कल्पना आहे. ज्याच्यावर ते येतं त्यालाच ते कळतं. पण संकट हे काळानं टाकलेलं ते भितीचं जाळंच असतं. पण त्यात आपण अडकायचं नाही. मृत्यू यायचा तेव्हा येणारच आहे. पण हा काळ जो आपल्याला संकटांची भिती दाखवतो ना? तर त्याचा विचार करत बसून त्यात अडकलो तर भविष्यातील सुख समाधानाला आणि आनंदाला आपण मुकतो.

चांगलं हसतं खेळतं आयुष्य आपलं नासतं. यावर एकच उपाय आहे की, आयुष्य जगतांना निष्काम कर्म करून ते ईश्वरार्पण करावं आणि बिंधास्त जिवनाचा आनंद घेत घेत जगावं. आणि काळाला खडसावून सांगावं की, 'अरे तू संकटाची कितीही भिती दाखव, मी अजिबात भिणार नाही, की तुझ्या त्या संकटाला भिकही घालणार नाही. कारण आता माझा सांभाळ माझा हरि करतोय. पण त्यासाठी संत चरणांशी लिनतेनं समर्पित व्हावं लागतं. कारण...

**चालता बोलता । देई मज हात ।।**

**आणिकांची साथ । नको आता ।।४।।**

आता मी माझा उरलेच कुठंय? माझ्या मनाला संतसंग घडला, आणि मी सर्वस्व त्यांचाच झालोय. त्यांच्याच कृपेने देह जावो अथवा राहो पांडुरंगी दृढ भावो ।। हा भाव निश्चित झाला आहे. आणि विशेष म्हणजे आपण जर संतांच्या चरणी नतमस्तक झालो आणि त्यांची कृपा झाली की, आपला सारा भार ते वाहतात आणि आपण या संकटातून मुक्त होतो.

एकदा का संतकृपा झाली की, चालता बोलता ते **सदासर्वकाळ** आपल्याला हात देतात. **जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविशी हाती धरोनिया।।** मनी हाच भाव दृढ होतो. देवा आता जो सतांचा सहवास मला दिलास तो अखंडपणे तोच असु दे. त्याशिवाय कुणाचीही साथसंगत आता नकोय मला. म्या पामरावर एवढीच कृपा कर, की आणिक कसलेच मागणे नाही देवा तुझ्याकडे.

**स्थिरावला देह । चंद्रभागे तटी ।।**

**चंदनाची उटी । नाना लाभे ।।५।।**

अनंत जन्मीच्या पायपीटी नंतर हा नरजन्म लाभला आणि तोही सात्विक मातापित्यांच्या पोटी! त्यामुळे आजवर निरंतर तुझी मानसिक वारी करतो आहे. त्यामुळे माऊली-तुकोबा सह सर्व संतांचा संग घडला. त्यामुळेच तर सुरूवातीला तुझ्याकडेच मागणं मागितलं होतं देवा की, देहाने मी किती जरी काळानुरूप पांगळा झालो असलो तरी माझी बुद्धी मात्र चांगली शाबूत ठेव. तीला मात्र अहंकाराचा वारा कणभर देखील लागू नये. कारण हा अहंकाराचा वाराच माझ्या बुद्धीला पांगळा करून टाकेल.

बुद्धीच जर लुळी पांगळी झाली तर मग तूच सांग देवा की, माझ्या मनाला तुझा छंद कसा लागेल? आणि हे मी केव्हाच जाणले आहे. म्हणून तर तुझ्याकडे बुद्धी चांगली ठेव आणि त्याचबरोबर माझ्या ह्या चंचल मनाला फक्त तुझंच ध्यान लागु दे. कारण चित्ताला समाधान याशिवाय दुसरीकडे नाही हे मी केव्हाच जाणले आहे. म्हणून तर वारंवार तुझ्याकडे हेच मागणं मागत होतो. आणि मला विश्वास आहे की आता काळाने कितीही जरी भिती दाखवली तरी मी त्या काळाला यत्किंचितही घाबरणार नाही. कारण माझा सांभाळ करणार तू असताना मी कशाला त्या काळाला घाबरू? आता मला एक अनुभूती येते की, चालता बोलता तू मला खंबीर आधाराचा हात देतोयस. तर मग साथ मिळावी म्हणून आणिकांची कशाला याचना करीत बसू? खरं सांगू देवा संतां शिवाय आणि तुझ्या शिवाय आणिकांची साथ नकोच मला.

लक्ष चौऱ्यांशीचा फेरा करून आलेला हा जीवात्मा आहे. एवढ्या युगांच्या प्रवासाने जेवढा थकवा आला नाही तेवढा ह्या स्वार्थी आणि दांभिक जगाच्या त्रासाने खूप थकवाआलाय. खूप थकलोय रे देवा आता मी. संतसंग घडला नसता आणि तुझी भेट झाली नसती तर...हा नाना केव्हाच त्या काळाला शरण गेला असता. कालगुहेनं त्याला केव्हाच ह्या देहाला स्वाहा केलं असतं.

आता हा थकला भागला देह दाही दिशा तुडवू लागलाय. तर... तर नजरे समोर चंद्राभागेचा तट दिसू लागला आणि पावलांची गती वाढली. चंद्रभागे तटी हा देह जरा विसावला. तिचं तुडुंब भरलेलं विस्तिर्ण पात्र डोळा भरून पाहिलं अन् कृतार्थ झालो. लोचनातून इंद्रायणी-चंद्रभागा पाझरू लागल्या. देहाची अवस्था विदेही झाली की नाही ते मला माहित नाही पण हा देह तुझ्या चरणापाशी समर्पित होण्यासाठी सदैव असूसलेला आहे, हे मात्र खरंय.

ज्ञानाईची चित्राहुती चाखून क्षुधा-तृष्णेनं तृप्त होऊन आलेला मी, तुझ्याकडे काय मागु आता? खरं तर मागणंच मागायचं विसरून गेलोय. तुझ्या चरणांवर माथा टेकवला आणि तुझ्या पायाला लावलेली चंदनाच्या उटीचा लाभ मला (नानाला) मिळाला.

हे माझ्या किती जन्मांची पुण्याई फळाला आली कोण जाणे? पण हा अलभ्य लाभ केवळ संतांच्या संगतीमुळे व तुझ्या कृपेमुळे शक्य झाले आहे. हे मात्र आपणा सर्वांवरही अशीच कृपा असूद्यावी एवढीच माऊलींच्या व तुकोबांच्या चरणी प्रार्थना करतो आणि थांबतो. (लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे, ती अभंग रचना लेखकचीच आहे.)

# दहशतवादावर 'स्ट्राईक'

भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर'ने दहशतवादाचा कारखाना असलेल्या पाकिस्तानला जोरदार दणका दिला आणि पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत बदलाही घेतला. केवळ पाकव्याप्त काश्मिरातील दहशतवाद्यांची प्रशिक्षण केंद्रेच नाहीत, तर या दहशतवादी संघटनांच्या पाकिस्तानातील मुख्यालयांना भारतीय क्षेपणास्त्रांनी क्षणार्धात जमीनदोस्त करुन टाकले. त्यामुळे भारताची पोहोच केवळ सीमेपलीकडच्या दहशतवाद्यांच्या लाँचिंग पॅड्सपर्यंतच मर्यादित नसून, थेट दहशतवादी आकांच्या मुख्यालयांपर्यंत आहे, असा स्पष्ट संदेश 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून गेला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरच्या या विशेष ऑपरेशनच्या निमित्ताने पाकिस्तानातील दहशतवादाचे दाहक वास्तव...

नोंद
प्रतिनिधी



### भारत पाक युध्द - एक दृष्टिक्षेपः-

**१९४७ चे भारत-पाकिस्तान युद्ध -**

स्वातंत्र्यानंतर दोन्ही देशांतील हे पहिलेच युद्ध होते. जम्मू आणि काश्मीरच्या विलीनीकरणावरून पाकिस्तानच्या सैन्याने काश्मीरच्या काही भागांवर हल्ला केला आणि त्यांचा ताबा घेतला, ज्यामुळे महाराजांना भारतीय लष्करी मदत मिळविण्यासाठी काश्मीरचे भारतात विलीनीकरणाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीमुळे दोन तृतीयांश भाग भारताकडे राहिला, तर एक तृतीयांश भागावर पाकिस्तानने कब्जा मिळवला.

**१९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध -**

हे युद्ध पाकिस्तानच्या 'ऑपरेशन जिब्राल्टर'नंतर सुरू झाले, जे जम्मू आणि काश्मीरमध्ये घुसखोरी करून भारताच्या राजवटीविरुद्ध बंडखोरी करण्यासाठी केले गेले. भारताने पश्चिम पाकिस्तानवर लष्करी हल्ला करून त्याचे प्रत्युत्तर दिले. १७ दिवस चाललेल्या या युद्धात दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात चिलखती वाहने आणि रणगाडे वापरले गेले. पुढे ताश्कंद घोषणापत्रावर स्वाक्षरी करून युद्धविराम झाला.

**१९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध-**

हे युद्ध या पूर्व पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या राजकीय संकटामुळे उद्भवले. याचा शेवट स्वतंत्र बांगलादेशच्या निर्मितीत झाला. पाकिस्तानने भारताच्या पश्चिम सीमेवर अनेक ठिकाणी हल्ला केला. त्यानंतर भारतीय सैन्याने त्वरित प्रत्युत्तर दिले. या युद्धामुळे ९० हजारांहून अधिक पाकिस्तानी सैन्याने आत्मसमर्पण केले. पाकिस्तान पूर्व कमांडचे कमांडर लेफ्टनंट जनरल नियाझी यांनी दि. १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका आत्मसमर्पणाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली.

**१९९९ चे कारगिल युद्ध-**

१९९९च्या सुरुवातीला पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषा ओलांडून घुसखोरी केली. दोनच महिन्यांत भारतीय सैन्याने, घुसखोरांनी अतिक्रमण केलेल्या बहुतेक भूभाग परत मिळवला. आंतरराष्ट्रीय समुदायाने, पाकिस्तानवर राजनैतिक दबाव वाढवल्याने त्यांनी माघार घेतली.

**दहशतवादाचा क्रूर चेहरा लष्कर ए तोयबाः-**

भारतीय सैन्याच्या मिसाईल स्ट्राईकमध्ये 'लष्कर-ए-तोयबा'चे मुरीदके येथील मुख्यालय जमीनदोस्त करण्यात आले. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात पाकिस्तानमध्ये कुख्यात दहशतवादी आणि मुंबईच्या २६/११च्या हल्ल्याचा सूत्रधार हाफिज सईद याने या दहशतवादी संघटनेची स्थापना केली. ही संघटना संपूर्ण भारतीय उपखंडावर इस्लामचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. 'लष्कर-ए-तोयबा' सुरुवातीला पाकिस्तान आणि जम्मू आणि काश्मीर राज्यात कार्यरत होती. परंतु, २१व्या शतकाच्या पहिल्या दशकात या गटाने आपला विस्तार भारतात केला. संयुक्त राष्ट्र आणि भारतासह अनेक देशांनी 'लष्कर-ए-तोयबा'ला दहशतवादी संघटना घोषित केले आहे.

**सुरुवातीच्या कारवाया -**

१९९३ मध्ये 'लष्कर-ए-तोयबा'ने जम्मू आणि काश्मीरमध्ये पहिले आक्रमण केले. 'हिजबुल मुजाहिद्दीन'सोबत काम करून 'लष्कर-ए-तोयबा'ने देशातील हिंदू आणि शीखांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. १९९९ पासून या गटाने भारतीय सुरक्षा दलांवर आत्मघातकी हल्ले केले. दि. १३ डिसेंबर २००१ मध्ये 'लष्कर-ए-तोयबा'ने भारताच्या संसदेवर 'जैश-ए-मोहम्मद'बरोबर मिळून आत्मघातकी हल्ला केला होता. पुढे अमेरिकेच्या दबावाखाली पाकिस्तान सरकारने जानेवारी २००२ मध्ये 'लष्कर-ए-तोयबा'वर बंदी घालून त्याचा म्होरक्या हाफिज सईदला अटक केली. परंतु, काही महिन्यांनंतर त्याला सोडण्यातही आले. त्याने 'जमात-उद-दावा' नावाची एक धर्मदाय संस्था स्थापन केली, जी 'लष्कर-ए-तोयबा'बरोबर काम करू लागली.

**पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवाद्यांचे साटेलोटे-**

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये जखमी झालेल्या दहशतवाद्यांना रुग्णालयात भेटण्यासाठी आणि मृत दहशतवाद्यांच्या जनाजासाठी पाकिस्तानी सैन्याची आणि राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांचीही उपस्थिती लक्षणीय होती. १९९०च्या दशकात काश्मीरमध्ये 'लष्कर-ए-तोयबा'ने 'आयएसआय' आणि पाकिस्तानी लष्कराच्या मदतीनेच नियंत्रण रेषा ओलांडून भारतविरोधी दहशतवादी कारवाया सुरू केल्या.

**पाकपोषित जिहादी दहशतवाद-**

पाकिस्तानचे माजी राष्ट्रपती परवेझ मुशर्रफ यांनी कबूल केले होते की, पाकिस्तानने १९९०च्या दशकात काश्मीरमध्ये दहशतवाद घडवून आणण्यासाठी 'लष्कर-ए-तोयबा'सारख्या दहशतवादी गटांना पाठिंबा आणि प्रशिक्षणही दिले होते. २०१८ मध्ये पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी म्हटले की, २००८ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात 'लष्कर-ए-तोयबा'ने केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानी सरकारनेही महत्त्वाची भूमिका बजावली होती. जुलै २०१९ मध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान इमरान खान यांनी अमेरिकेच्या दौऱ्यात पाकिस्तानमध्ये सुमारे ३० हजार ते ४० हजार दहशतवादी सक्रिय असल्याची जाहीर कबुली दिली होती.

**जैशचे विष :-**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील बहावलपूर येथील 'जैश-ए-मोहम्मद'चे मुख्यालय जमीनदोस्त केले. कंदहार विमान अपरहरणाचा मुख्य सूत्रधार असलेल्या 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेची स्थापना मार्च २००० मध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादी मसूद अजहर याने केली. 'जैश-ए-मोहम्मद'चे मुख्य लक्ष्य काश्मीरला भारतापासून वेगळे करणे असले, तरीही अमेरिका आणि इतर पाश्चात्य देशांतील दहशतवादी कारवायांमध्येदेखील 'जैश-ए-मोहम्मद'चा हात असल्याचे मानले जाते. नंतर 'जैश-ए-मोहम्मद'ने स्वतःचे नाव बदलून 'खुद्दाम उल-इस्लाम' असे केले.

**'जैश'मध्ये फूट आणि पाकिस्तानी शहरांवर हल्ले -**

पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढल्याने जानेवारी २००२ मध्ये 'जैश'वर घालण्यात आलेली बंदी, ही केवळ धूळफेक होती. 'जैश'च्या दहशतवाद्यांनी 'खुद्दाम उल-इस्लाम' नावाने त्यांचे काम सुरूच ठेवले. पाकिस्तान सरकारने त्यावरही तोंडदेखली बंदी घातली. २००२ मध्ये 'जैश'ला 'बेकायदेशीर संघटना' घोषित करण्यात आल्यापासून 'अल-रहमत ट्रस्ट' नावाच्या धर्मदाय ट्रस्टच्या आडून त्यांनी कामकाज सुरू केले. पुढे 'जैश'मधील अंतर्गत संघर्षामुळे 'जमात-उल-फुरकान' ही एक नवीन संघटना अस्तित्वात आली.

अमेरिकेतील ९/११च्या हल्ल्यानंतर, पाकिस्तानचे अध्यक्ष मुशर्रफ यांनी दहशतवादाविरुद्धच्या युद्धात सामील होण्याचा निर्णय घेतल्याने 'जैश'ने मुशर्रफ यांच्या राजीनाम्याची मागणी केली. याशिवाय इस्लामाबाद, मुरी, तक्षशिला आणि बहावलपूर येथे हल्लेही करण्यात आले. नोव्हेंबर २००३ मध्ये झालेल्या हल्ल्यांनंतर पाकिस्तानने 'खुद्दाम-उल-इस्लाम'वरही बंदी घातली. यामुळे मसूद अझहर संतापला आणि त्याने दि. १४ डिसेंबर आणि दि. २५ डिसेंबर २००३ रोजी मुशर्रफच्या ताफ्यावर दोनदा हल्ला केला.

**'जैश'च्या दहशतवादी कारवाया-**

मसूद अजहरला मुक्त करण्यासाठी डिसेंबर १९९९ मध्ये कंदहार विमान अपहरण घडवण्यात आले होते. डिसेंबर २००१ मध्ये नवी दिल्लीतील भारतीय संसदेवर आत्मघातकी हल्ला करण्यासाठी 'जैश'ने 'लष्कर-ए-तोयबा'सोबत भागीदारी केल्याचा आरोप आहे. २००१ मध्ये काश्मीर विधानसभेवर झालेल्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधारही मसूद अजहरच होता. दि. १४ फेब्रुवारी रोजी काश्मीरमधील पुलवामा येथे 'जैश-ए-मोहम्मद'ने आत्मघातकी हल्ला केला, ज्यामध्ये ४२ भारतीय सैनिक जागीच हुतात्मा झाले.

**उरी आणि पुलवामा हल्लाः-**

१८ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तानातील 'जैश-ए-मोहम्मद'च्या चार दहशतवाद्यांनी जम्मू आणि काश्मीरमधील उरी शहराजवळील, भारतीय लष्कराच्या ब्रिगेड मुख्यालयावर हल्ला केला. या हल्ल्यात १९ भारतीय सैनिक ठार झाले. यात चारही दहशतवादी ठार झाले. या भ्याड हल्ल्याला प्रत्युत्तर देताना २८ सप्टेंबर रोजी, भारतीय लष्कराने पाकव्याप्त काश्मीरमध्ये अतिरेक्यांच्या लाँच-पॅडवर सर्जिकल स्ट्राईक केले. यामध्ये १५० दहशतवाद्यांना यमसदनी धाडण्यात आले.

**पुलवामाचे उत्तर एअर स्ट्राईकनेः-**

पुलवामा येथे दि. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी, जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर सुरक्षा कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनांवर आत्मघातकी दहशतवाद्याने हल्ला केला. या हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे ४६ जवान हुतात्मा झाले. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'ने स्वीकारली. या हल्ल्याच्या १२ दिवसानंतर दि. २६ फेब्रुवारी २०१९ रोजी, भारतीय हवाई दलाच्या विमानांनी बालाकोटमधील 'जैश-ए-मोहम्मद'च्या दहशतवादी तळावर हल्ला केला, त्यात सुमारे २००-३०० दहशतवादी मारले गेले.

**नापाक मुजाहिद्दीनः-**

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सैन्याने आजवरच्या भारतील दहशतवादी हल्ल्यांमध्ये हात असलेल्या पाकिस्तानस्थित अनेक दहशतवादी संघटनांच्या मुख्यालय आणि विविध प्रक्षिक्षणतळांना लक्ष्य केले. यामध्ये 'हिजबुल मुजाहिद्दीन'चे मुजफ्फराबाद येथील मुख्यालयही लक्ष्य करण्यात आले. 'हिजबुल-उल-मुजाहिद्दीन' अर्थात 'हिजबुल मुजाहिद्दीन' ही पाकिस्तानातील दहशतवादी संघटना १९८९ पासून काश्मीरमधील बंडखोरीमध्ये गुंतलेली असून, तिचे उद्दिष्ट काश्मीरला भारतापासून वेगळे करून त्याचे पाकिस्तानमध्ये विलीनीकरण करणे आहे.

१९९१ मध्ये 'तहरीक-ए-जिहाद-ए-इस्लामी' मध्ये विलीनीकरण झाल्यानंतर 'हिज्बुल-उल-मुजाहिद्दीन'च्या जिहाद्यांची संख्या वाढली. या संघटनेने काश्मीरमधील अनेक सशस्त्र हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे.

# मोदी आहेत, विसरणार नाहीत!

विविध प्रांतांतील असंतोष आणि बंडाळी आटोक्यात न ठेवू शकणाऱ्या पाकिस्तानी लष्करी नेतृत्वाने भारताची कुरापत काढण्याचे त्याला न पेलणारे वजन उचलल्यावर त्याचे तोंड फोडणारा ठोसा भारताने लगावला. वारंवार मार खाऊनही दहशतवादाला पोसण्याची पाकिस्तानची खुमखुमी कमी होत नसेल, तर त्या देशाचा सर्वनाश अटळ आहे. कारण, भारताचे नेतृत्व मोदींच्या हाती आहे, जे अशा देशविरोधी गोष्टी कदापि विसरणार नाहीत. नुकतीच 'चुटकीभर सिंदूर'ची खरी किंमत काय, ती पाकिस्तानला भारताने दाखवून दिली!




विशेष
प्रतिनिधी

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या एकंदर नऊ अड्ड्यांवर बुधवारी पहाटे 'सर्जिकल स्ट्राईक' करून भारताने पहलगाममधील नृशंस हत्याकांडाचा बदला घेतला. या लष्करी कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे सूचक आणि सुयोग्य नाव देण्यात आले होते. यात केवळ पाकव्याप्त काश्मीरमधीलच नव्हे, तर थेट पाकिस्तानच्या मुख्य भूमीवर असलेल्या दहशतवाद्यांच्या तळांवर क्षेपणास्त्रांनी अचूक हल्ला चढविण्यात आला आणि त्यात काही दहशतवाद्यांना ठार मारण्यात आले. पण, दहशतवाद्यांना ठार मारणे हा दुय्यम हेतू होता. दहशतवाद्यांना आपल्या देशात आश्रय दिल्यास तेथेही आम्ही त्यांना शोधून काढू आणि त्यांना अल्लाकडे पाठवून देऊ शकतो, हे भारताने साऱ्या जगाला दाखवून दिले.

पहलगाम हल्ल्यास जबाबदार दहशतवाद्यांना जगाच्या कानाकोपऱ्यातून शोधून काढून ठार मारू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर वचन दिले होते. मोदी अशा गोष्टी विसरत नसल्याने त्यांनी आपले वचन प्रत्यक्षात आणून पाकिस्तानला धडा शिकवला. यापूर्वी उरी आणि पुलवामा येथेही झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा मोदी यांनी हवाई हल्ले करून बदला घेतला होता. आता पहलगाममधील निष्पाप पर्यटकांच्या हत्येचा बदलाही त्यांनी घेतला. या कारवाईविरोधात कोणत्याही देशाने 'हूं की चूं' केलेले नाही. यावरून पाकिस्तान हा जगभरात किती तिरस्करणीय आणि एकाकी देश बनला आहे, ते स्पष्ट होते.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर लगेचच ऑपरेशन सिंदूरचे नियोजन सुरू करण्यात आले होते, ज्यामध्ये पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली एक बैठक बोलावण्यात आली होती. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्याकडे या संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व होते. ते सतत हवाई दल, नौदल आणि लष्कराच्या संपर्कात होते. पहलगाम हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुप्तचर संस्था आणि एनटीआरओसह पाकिस्तानमधील उच्च दर्जाच्या दहशतवादी तळांची ओळख पटवण्याची जबाबदारी अजित डोभाल यांना दिली होती. त्यांनी ही भूमिका ठोस पार पाडली.

या हल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे, पाकिस्तानला भारताविरोधात लष्करी प्रतिकारवाई करणे अवघड बनले आहे. कारण, एक तर भारताने पाकिस्तानच्या कोणत्याही लष्करी स्थळांवर किंवा आस्थापनांवर हल्ला चढविलेला नाही. तसेच, यात सामान्य नागरिकांचाही बळी गेलेला नाही. या हल्ल्यांचे लक्ष्य पाकव्याप्त काश्मीरमधील तळ असून तो प्रदेश म्हणजे पाकिस्तान नाही. त्यामुळे पाकिस्तानला त्यावर अधिकृतपणे तक्रारही करता येत नाही. मात्र, बहावलपूर, मुरीदके, सियालकोट वगैरे पाकिस्तानी भूमीवरील ज्या तळांवर भारताने हल्ले केले आहेत, तेथे नेमके काय आहे, हे पाकिस्तानला जगाला सांगताच येत नाही. कारण, ते दहशतवाद्यांचे प्रशिक्षण तळ आहेत. या हल्ल्यात नष्ट झालेली ही ठिकाणे ना रुग्णालये होती, ना शाळा, ना मशिदी, ना सरकारी आस्थापने. मग पाकिस्तान तक्रार तरी कशाची करणार होता?

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आंतरराष्ट्रीय सरहद्दीच्या १०० किमी आत असलेल्या ठिकाणांवर भारताकडून क्षेपणास्त्राने हल्ले होत असताना पाकिस्तानी हवाई दल काय झोपा काढत होते? आपल्या देशाच्या हवाई हद्दीचा भंग करून काही गोष्टी आत येत असताना पाकिस्तानी हवाई दलाकडून त्याला विरोध कसा झाला नाही, याचे उत्तरच पाकिस्तानी लष्कराकडे नाही. या क्षेपणास्त्रांना अडविण्यास ना पाकिस्तानी हवाई दलाची विमाने उडाली की त्यांनी आपली अस्त्रे डागली. यावरून पाकिस्तानी हवाई दल आणि लष्करही किती कुचकामी आहेत, ते साऱ्या जगाला कळून चुकले.

भारत हा हल्ला करू शकला, यामागे भारताची बाजू नैतिकदृष्ट्या योग्य होती, इतकेच कारण नाही. गेली ३५ वर्षे परकीय दहशतवादाचा बळी ठरलेल्या भारताने दहशतवादाविरोधात कसलीही तडजोड न करण्याचे धोरण स्वीकारले आहे. पूर्वीच्या काँग्रेस सरकारने हे धोरण निव्वळ कागदावरच ठेवले होते. केंद्रात नरेंद्र मोदी सत्तेवर येताच त्यांनी या समस्येचा खातमा करण्यासाठी भारतीय लष्कराला सुसज्ज आणि आधुनिक करण्याचा ध्यास घेतला. कोणत्याही वेळी युद्धाला सामोरे जाण्याची सज्जता भारतीय सैन्याकडे आज आहे, त्यामागे मोदी यांचे हे लष्कराच्या आधुनिकीकरणाचे प्रयत्न आहेत. काँग्रेसच्या काळात भारतीय सैनिकाला 'बुलेटप्रूफ जॅकेट'ही मिळत नव्हते.

मोदी यांनी जागतिक दर्जाच्या 'बुलेटप्रूफ जॅकेट'ची निर्मिती सुरू केली. अनेक हलक्या बंदुकांचे आणि 'एके-४७'सारख्या अत्याधुनिक रायफलींचे उत्पादनही भारतात सुरू करण्यात आले. जगातील सर्व अत्याधुनिक शस्त्रे आणि अस्त्रे आज भारताकडे आहेत. तसेच, भारतानेही स्वबळावर आपल्या गरजेनुरूप काही अस्त्रे विकसित केली आहेत. त्यात 'ब्रह्मोस', 'नाग', 'आकाश', 'पृथ्वी' यांसारखी क्षेपणास्त्रे, 'धृव' हे हलके लढाऊ हेलिकॉप्टर, 'तेजस' हे लडाऊ विमान यांसारख्या संरक्षण साहित्याचा समावेश आहे. एकेकाळी संरक्षण साहित्याचा निव्वळ आयातदार देश असलेला भारत आज हजारो कोटी डॉलर्सची अस्त्रे-शस्त्रे निर्यात करीत आहे.

अर्थात, युद्ध हे निव्वळ शस्त्रास्त्रांच्या जोरावर जिंकता येत नाही. त्याला राजनैतिक डावपेचांचीही जोड द्यावी लागते. त्या आघाडीवरही मोदी सरकारने नेत्रदीपक यश संपादन केले.

पाकिस्तान हा दहशतवादाची गंगोत्री आहे, हे मोदी यांनी साऱ्या जगाला दाखवून दिले. त्यात केवळ अमेरिका आणि युरोपीय देशच नसून, बहुसंख्य मुस्लीम देशांचाही समावेश आहे. पाकिस्तानविरोधी या कारवाईसाठी कतारने नुकताच भारताला पाठिंबा दिला. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी दोन दिवसांपूर्वीच मोदी यांना फोन करून पूर्ण पाठिंबा देऊ केला होता. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सर्व देशांनी पाकिस्तानच्या दहशतवादी धोरणाबद्दल त्याला धारेवर धरले होते. मोदी यांच्या या धूर्त आणि कार्यक्षम डावपेचांना परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या बुद्धिमत्तेची जोड लाभली आहे.

काँग्रेसच्या बोटचेप्या, खरेतर पाकिस्तानधार्जिण्या धोरणाच्या तुलनेत मोदी यांच्या जाज्वल्य राष्ट्रवादी परराष्ट्र आणि संरक्षण धोरणामुळेच भारत ही आशियातील विभागीय लष्करी महासत्ता म्हणून उदयाला येत आहे. मुंबईवर झालेला हल्ला हे शब्दशः छोटेखानी युद्धच होते. तरीही तत्कालीन काँग्रेस सरकारने पाकिस्तानविरोधात साधे बोटही उचलले नव्हते. उलट उरी लष्करी तळावरील हल्ला असो, पुलवामाचा जवानांवरील हल्ला असो की, आता पहलगाममधील पर्यटकांवरील हल्ला असो, मोदी यांनी प्रत्येक वेळी पाकिस्तानला रक्तबंबाळ करणारे प्रत्युत्तर दिले. इतका मार खाऊनही पाकिस्तानची दहशतवाद पोसण्याची खुमखुमी जिरत नसेल, तर त्या देशाचा सर्वनाश अटळ आहे. तो दोन प्रकारे होईल. पाकिस्तानातील बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा हे प्रांत आताच पाकिस्तानच्या विरोधात बंड करून उठले आहेत.

पाकिस्तानी लष्कराचे या प्रांतांवर कसलेही नियंत्रण उरलेले नाही. जोडीला सिंध प्रांतात पंजाब प्रांताविरोधात असंतोष खदखदतो आहेच. आता भारताने पाकिस्तानचे पाणी बंद केल्याने त्या असंतोषाचा स्फोट केव्हाही होऊ शकतो. पाकव्याप्त काश्मीरमधील जनताही पाकिस्तानच्या भेदभावाला कंटाळली असून, त्यांना भारतात सामील व्हायचे आहे.

दुसरीकडे पाकिस्तानने भारताविरोधात दहशतवादाचे धोरण कायम ठेवल्यास त्याला भारताकडून आजच्यासारखे सणसणीत प्रत्युत्तर मिळत राहील. एकंदरीतच पाकिस्तानचे भवितव्य अधांतरी बनले असून, येत्या दशकभरात हा देश जगाच्या नकाशावरून पुसून गेल्यास आश्चर्य वाटायला नको. 'चुटकीभर सिंदूर'ची किंमत त्याला आज कळली असेल!